

# विद्यार्थी सुरक्षितता व मुलींचे स्वसंरक्षण

## प्रशिक्षण मार्गदर्शिका

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.



# विद्यार्थी सुरक्षितता
# व
# मुलींचे स्वसंरक्षण

## प्रशिक्षण मार्गदर्शिका

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# विद्यार्थी सुरक्षितता व मुलींचे स्वसंरक्षण : प्रशिक्षण मार्गदर्शिका


- **प्रवर्तक** : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन.
- **प्रकाशक** : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **प्रेरणा** : **मा. रनजीत सिंह देओल (भा.प्र.से.)**
  प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र राज्य.
- **संकल्पना व मार्गदर्शन** : **मा. सचिन्द्र प्रताप सिंह (भा.प्र.से.)**
  आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.

  **मा. संजय यादव (भा.प्र.से.)**
  राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
- **संपादक** : **मा. राहूल रेखावार (भा.प्र.से.)**
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **सहसंपादक** : **डॉ. कमलादेवी आवटे**
  सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **कार्यकारी संपादक** : **श्रीम. वर्षाराणी भोपळे**
  उपसंचालक, समता विभाग,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **संपादन साहाय्य** : **श्रीम. सुजाता सावंत**
  कार्यक्रम अधिकारी, समता विभाग,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

  **श्रीम. प्रतिभा बरडे**
  अधीक्षक, समता विभाग,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **प्रथम आवृत्ती** : सप्टेंबर २०२५
- **मुद्रक** : रुना ग्राफिक्स, पुणे.



- © सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन.

# प्रस्तावना

बालकाच्या मूलभूत मानवी हक्कांचे संरक्षण व्हावे या दृष्टीने संयुक्त राष्ट्र संघाने बालहक्क संहिता जाहीर केली असून संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्व सदस्य राष्ट्रांनी ही संहिता स्वीकारली आहे. या संहितेनुसार सर्व बालकांना मूलभूत मानवी हक्क मिळविण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. यामध्ये प्रामुख्याने जीविताचा अधिकार, शारीरिक आणि बौद्‌धिक विकास करण्याचा अधिकार, कौटुंबिक सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनात सहभागी होण्याचा अधिकार तसेच बालकांच्या विकासावर घातक परिणाम होईल अशा प्रभावापासून संरक्षणाचा अधिकार इत्यादी महत्त्वाच्या अधिकारांचा समावेश आहे. महाराष्ट्रात बालकांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी बालहक्क संरक्षण कायदा २००५ अन्वये सन २००७ मध्ये बालहक्क संरक्षण आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. बालहक्क संरक्षण कायद्यानुसार सर्व बालकांच्या हक्कांचे संरक्षण करणे अभिप्रेत आहे.

शालेय विद्यार्थ्यांच्या शिक्षणाबरोबरच त्यांच्या शारीरिक, मानसिक, भावनिक व सामाजिक सुरक्षिततेचा मुद्‌दाही अत्यंत महत्त्वाचा आहे. अलीकडील काळात शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून काही घटना घडलेल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. शासनाने विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून वेळोवेळी शासन निर्णय व परिपत्रके निर्गमित केले आहेत. विद्यार्थ्यांची सुरक्षितता सर्वोपरी असल्याने शाळेशी निगडित प्रत्येक घटकाने सजग असणे गरजेचे आहे हा विचार करून 'विद्यार्थी सुरक्षितता व मुलींचे स्वसंरक्षण' ही प्रशिक्षण मार्गदर्शिका तयार करण्यात आली आहे. ही केवळ मार्गदर्शिका नसून कृतिपुस्तिका आहे.

या पुस्तिकेमध्ये बालकांचे हक्क म्हणजे काय?, बालकांच्या सुरक्षिततेसंदर्भात विविध शासन निर्णय, मार्गदर्शक सूचना यांची सविस्तर माहिती देण्यात आली आहे. बाल सुरक्षेचे मानसिक व सामाजिक पैलू, बालकांचे शोषण, कारणे, परिणाम व उपाय इ. ची माहिती देण्यात आली आहे. तंत्रज्ञान हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक झाला आहे. तंत्रज्ञानाचा वापर अनिवार्य आहे. तंत्रज्ञानाने मानवी जीवन सुकर झाले आहे. तसेच त्याचा गैरवापर करणाऱ्यांमुळे मानवी जीवितास व सुरक्षिततेस धोकाही निर्माण झाला आहे. तंत्रज्ञानाचे हे धोके लक्षात येऊन बालकाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने व्यापक उपायोजना सुचवण्यात आल्या आहेत. बालकाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने शालेय वातावरण व भौतिक सोयी सुविधा या माध्यमातून पालकाच्या सुरक्षिततेविषयी विस्तृत विवेचन या पुस्तिकेत करण्यात आले आहे. मुलींनी स्वतःचे संरक्षण स्वतः करावे या दृष्टीने स्वतंत्र प्रकरण या पुस्तिकेत देण्यात आले असून या माध्यमातून स्वसंरक्षणाच्या दृष्टीने मुली सक्षम होतील असा प्रयत्न करण्यात आला आहे. अनुचित घटना घडल्यानंतर शालेय प्रशासनाने अनुसरावयाची कार्यपद्‌धती देण्यात आली आहे. ही पुस्तिका शाळा स्तरावरील विविध समित्या, शाळेशी निगडित प्रत्येक मानवी घटक, विद्यार्थी, पालक, पर्यवेक्षीय अधिकारी या सर्वांना आपापली भूमिका प्रभावीपणे पार पाडण्यासाठी नक्कीच मार्गदर्शक ठरणार आहे.

**राहूल रेखावार (भा.प्र.से.)**
संचालक,
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
महाराष्ट्र, पुणे

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | मुख्य घटक | उपघटक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १. | बालकांचे हक्क | बालकांचे हक्क | १ |
| | | १.१ जगण्याचा हक्क | २ |
| | | १.२ सहभागाचा हक्क | ३ |
| | | १.३ विकासाचा हक्क | ४ |
| | | १.४ संरक्षणाचा हक्क | ५ |
| २. | बालकांच्या सुरक्षितते-संदर्भात कायदे | २.१ अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा - १९५६ | ७ |
| | | २.२ बालविवाह प्रतिबंध कायदा - २००६ | ८ |
| | | २.३ माहिती व तंत्रज्ञान सुधारित कायदा २००८ | ८ |
| | | २.४ बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार व अधिनियम २००९ | ८ |
| | | २.५ बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ (POCSO) | ८ |
| | | २.६ बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) कायदा - २०१५ | ११ |
| | | २.७ बालकामगार (प्रतिबंध व नियमन)- सुधारित कायदा - २०१६ (मूळ कायदा १९८६) | ११ |
| | | २.८ बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ (POCSO) व सुधारणा २०१९ | ११ |
| ३. | बालकांचे संरक्षण | ३.१ शारीरिक असुरक्षिततेचे स्वरूप, शारीरिक संरक्षण व शाळेने घ्यावयाच्या खबरदारीचे उपाय | १४ |
| | | ३.२ संरक्षण समस्या, आव्हाने आणि सुरक्षितता व प्रतिबंधात्मक उपाय : मानसिक आणि भावनिक | १८ |
| | | ३.३ बालकाची सामाजिक सुरक्षितता व संरक्षण | २१ |
| ४. | मुलींचे स्वसंरक्षण | ४.१ स्वसंरक्षण तंत्र | २३ |
| | | ४.२ प्रसंग व सुटका | ३५ |
| | | ४.३ जवळच्या वस्तूंचा सुटकेसाठी उपयोग | ४७ |
| ५. | बालसुरक्षेचे मानसिक व सामाजिक पैलू आणि बालकांचे शोषण | ५.१ बालसुरक्षेचे मानसिक व सामाजिक पैलू | ५० |
| | | ५.२ बालकांचे शोषणाचे प्रकार | ५५ |
| | | ५.३ समज व वास्तव | ५६ |
| | | ५.४ बालकांच्या शोषणाची प्रक्रिया | ५७ |
| | | ५.५ शोषणासंबंधीची लक्षणे | ५९ |
| | | ५.६ प्रतिबंधात्मक उपाययोजना - प्रबोधनात्मक कार्यक्रम | ६० |
| | | ५.७ वैयक्तिक सुरक्षा शिक्षण कार्यक्रम | ६१ |

| अ.क्र. | मुख्य घटक | उपघटक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| ६. | तंत्रज्ञान व बालकांची सुरक्षितता | ६.१ विविध तंत्रज्ञान माध्यमे यांचा वापर व सुरक्षितता | ६९ |
| | | ६.२ सायबर गुन्हे आणि बालके | ७२ |
| | | ६.३ बालकांच्या ई माध्यमे वापरासंदर्भात सजग पालकत्व | ७९ |
| ७. | शालेय वातावरण व विद्यार्थी सुरक्षितता | ७.१ शालेय भौतिक सुविधा व सुरक्षितता | ८३ |
| | | ७.२ विद्यार्थी वाहतूक व सुरक्षितता | ८५ |
| | | ७.३ आरोग्य आणि स्वच्छता व्यवस्थापन | ८६ |
| | | ७.४ शालेय वातावरणात बालकांना सुरक्षित वाटण्यासाठी उपाय | ८६ |
| | | ७.५ शाळा स्तर कृतिकार्यक्रम | ८७ |
| ८. | विद्यार्थी सुरक्षितता व शाळेतील विविध समित्या | ८.१ विद्यार्थी सुरक्षिततेमध्ये शाळा व्यवस्थापन समितीची (SMC) ची भूमिका | ८८ |
| | | ८.२ विद्यार्थी सुरक्षिततेमध्ये सखी सावित्री समितीची भूमिका | ९३ |
| | | ८.३ विद्यार्थी सुरक्षिततेमध्ये विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा विकसन समितीची भूमिका | ९५ |
| ९. | विद्यार्थी सुरक्षितता आणि मानवी घटकांची भूमिका, कार्ये व जबाबदारी | ९.१ शिक्षक भूमिका | ९७ |
| | | ९.२ मुख्याध्यापक भूमिका | १०२ |
| | | ९.३ पालक भूमिका | १०९ |
| | | ९.४ शिक्षकेतर कर्मचारी | ११० |
| | | ९.५ समुपदेशक | ११० |
| | | ९.६ पर्यवेक्षकीय यंत्रणा भूमिका | १११ |
| | | ९.७ अशासकीय सामाजिक संस्था NGO | ११२ |
| | | ९.८ पोलीस | ११६ |
| | | ९.९ दामिनी पथक | ११६ |
| | | ९.१० संस्थेचे संचालक मंडळ | ११८ |
| | | ९.११ जिल्हास्तरीय देखरेख | ११९ |
| | | ९.१२ राज्यस्तरीय देखरेख | ११९ |
| | | ९.१३ राष्ट्रीय स्तरावरील देखरेख | ११९ |
| १०. | अनुचित घटना घडल्यानंतर अनुसरावयाची कार्यपद्धती व पुनर्वसन | १०.१ अनुसूचित घटना घडल्यानंतर/समजल्यानंतर अनुसरावयाची कार्यपद्धती | १२० |
| | | १०.२ पुनर्वसन | १२३ |
| ११. | परिशिष्टे | ११.१ संदर्भ सूची | १२५ |
| | | ११.२ शासन निर्णय | १२६ |
| | | ११.३ शाळा सुरक्षा पाहणी नमुना | १२८ |

# १. बालकांचे हक्क

**प्रस्तावना :**

बालकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण व्हावे याकरिता संयुक्त राष्ट्रसंघाने सन १९८९ साली बालहक्कांसंदर्भात बाल हक्क संहिता स्वीकारली असून त्याद्वारे सर्व बालकांना मूलभूत मानवी हक्क मिळविण्याचा अधिकार बहाल केला आहे. जसे जीविताचा अधिकार, शारीरिक आणि बौद्धिक सुप्त गुणांचा विकास करण्याचा अधिकार, त्यांच्या विकासावर घातक परिणाम होईल अशा प्रभावापासून संरक्षणाचा अधिकार तसेच कौटुंबिक, सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनात सहभागी होण्याचा अधिकार इत्यादी. बालकांचे हक्क हे विशेष मानवी हक्क आहेत, जे १८ वर्षांखालील सर्व व्यक्तींना लागू आहेत. व्यक्तीची जात, धर्म, वंश, लिंग, रंग, भाषा आणि संपत्ती इत्यादींचा विचार न करता सर्व बालकांना हक्क देणे हे बालहक्क संहितेनुसार क्रमप्राप्त आहे. बालकांना विकासाची संधी मिळावी म्हणून प्रत्येक बालकाला कोणकोणत्या गोष्टी मिळाव्यात आणि कोणत्या गोष्टी बालकांसाठी टाळायला हव्यात हे बालहक्कांच्या स्वरूपात मांडले आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाने १९७९ ते १९८९ असा १० वर्षे वेगवेगळ्या राष्ट्रातील मुलांच्या स्थितीचा आढावा घेतला. त्यानंतर संयुक्त राष्ट्राच्या आमसभेत दिनांक २० नोव्हेंबर १९८९ रोजी बाल अधिकार संहितेला मान्यता दिली आणि म्हणून त्या दिवसापासून सर्व जगात २० नोव्हेंबर हा दिवस बाल अधिकार दिवस म्हणून ओळखला जातो.

**बालकांचे हक्क**




**जगण्याचा अधिकार :**
- जन्म घेण्याचा, जगण्याचा
- आहार आणि लसीकरणाचा
- आरोग्याच्या सुविधा आणि
- शुद्ध पाणी मिळण्याचा

**विकासाचा अधिकार :**
- शिक्षणाचा अधिकार
- खेळण्याचा अधिकार
- कौशल्य शिक्षणाचा अधिकार

**सहभागाचा अधिकार :**
- मत मांडण्याचा अधिकार
- तुमचे म्हणणे ऐकून घेण्याचा अधिकार

**संरक्षणाचा अधिकार :**
- अत्याचार • हिंसा • गुंडगिरी अथवा दादागिरी • बालमजुरी • बालविवाह • व्यसन • ऑनलाईन अत्याचार यांपासून सुरक्षा मिळण्याचा अधिकार

भारत सरकारने बाल अधिकार संहितेला मान्यता देण्यासाठी तीन वर्षांचा कालावधी घेतला. या तीन वर्षांत अनेक मुद्द्यांवर भूमिका घेताना त्याचे परिणाम काय होतील याचा विचार करण्यात आला. अखेर दिनांक ११ डिसेंबर १९९२ रोजी बाल अधिकार संहितेला मान्यता देण्यात आली. भारत हा देश बाल अधिकार मानणारा देश ठरला. ही संहिता १९६ देशांनी मान्य केली. महाराष्ट्रात बालकांच्या हक्कांचे संरक्षण, प्रचलन आणि रक्षण करण्यासाठी बाल हक्क संरक्षण कायदा २००५ (२००६ मधील ४) अन्वये जुलै २००७ मध्ये महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाची स्थापना करण्यात आली. हे स्वायत्त मंडळ म्हणून राज्यात काम करीत आहे.

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या ५४ कलमांच्या बाल अधिकार संहितेला भारत सरकारने मान्यता दिली. या ५४ कलमांपैकी.....

- १ ते ४२ कलमे मुलांचे निव्वळ अधिकार आहेत.
- ४३ ते ५४ कलमे मुलांचे अधिकार अबाधित रहावेत म्हणून त्या त्या राष्ट्रांनी काय करावे हे सांगणारी आहेत.

या ५४ कलमांची तीन आधारभूत तत्वे आहेत.

१) **भेदभावाला नकार :** प्रत्येक मुलाला वंश, लिंग, धर्म व भाषा, पालकांची राजकीय मते, आईवडील व पालकांची मते, श्रद्धा यांमुळे भेदभाव न होता त्यांचे हक्क मिळाले पाहिजेत.

२) **मुलांचे हित प्रथम :** खाजगी आणि सरकारी संस्था, न्यायालये, शासकीय अधिकारी मुलांबाबत निर्णय घेताना मुलांचे हक्क सर्वप्रथम पाहतील.

३) **मुलांचा सहभाग :** बालकांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासासाठी त्यांना जीवनाच्या सर्वच क्षेत्रात सहभागाचा हक्क मिळण्याची गरज आहे.

बाल हक्कांचे प्रामुख्याने चार व्यापक वर्गांत वर्गीकरण केले आहे. यामध्ये बालकांचे सर्व नागरी, राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक हक्क यांचा समावेश होतो.

### १.१) जगण्याचा हक्क :

सर्व बालकांना जगण्याचा हक्क प्राप्त आहे. याचा अर्थ केवळ श्वास घेणे, पाहणे, बोलणे, चालणे एवढ्यापुरताच मर्यादित नाही, तर बालक आनंदी राहणे, त्याच्या सभोवतालच्या वातावरणामध्ये समाधानाने राहणे म्हणजे जगण्याचा हक्क होय. जगण्याच्या हक्कांमध्ये प्रत्येक बालकाला खालील प्रकारचे हक्क प्राप्त आहेत.

- जीविताचा व विकासाचा हक्क.
- समाधानकारक आणि आवश्यक राहणीमान प्राप्त करण्याचा हक्क.

- परिणामकारक आरोग्य सेवा आणि उत्कृष्ट आरोग्याचा दर्जा प्राप्त करू शकणाऱ्या गोष्टी मिळण्याबाबतचा हक्क.
- विशेष सेवा प्राप्त करण्याचा हक्क ज्याद्वारे त्याचा आत्मसन्मान व प्रतिष्ठा जोपासली जाईल व तो स्वावलंबी राहून त्याचा समाजात कार्यक्षम वावर राहील.
- पालकांसोबत राहण्याचा हक्क
- जन्मत: लसीकरण
- जन्माची नोंदणी

**जगण्याच्या हक्कांमध्ये याही गोष्टी येतात.**

- गरीब आणि गरजू असल्यास शासनाच्या विशेष योजनांचा लाभ मिळण्याचा हक्क
- पालकांसोबत राहू शकत नसल्यास स्वत:च्या विशेष देखभालीचा आणि मदतीचा हक्क
- एकांत मिळण्याचा हक्क
- मुलांना त्याच्या हिताची माहिती जमा करण्याचा हक्क
- अपंगत्व असल्यास विशेष देखभालीचा आणि मदतीचा हक्क
- चांगल्या आरोग्य सुविधा, पोषक आहार आणि स्वच्छ पिण्याचे पाणी मिळण्याचा हक्क
- स्वत:च्या विकासासाठी भूमिका घेण्याचा आणि आपले मत मांडून विकास ठरविण्याचा हक्क

### १.२) सहभागाचा हक्क :

बालक समाजाचा महत्त्वपूर्ण घटक आहे. आजचा बालक उद्याचा नागरिक आहे म्हणून बालकाचे भविष्य, देशाच्या, समाजाच्या हिताच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. बालक सजग व जबाबदार नागरिक होईल हे पाहण्याची जबाबदारी वडीलधाऱ्यांची असली, तरी देखील रोजच्या जीवनात जगण्यासोबतच बालकाचा संतुलित विकास व्हायला पाहिजे. बालकाला स्वत:चे मत, भावना व विचार व्यक्त करण्याचा आणि कौटुंबिक, सांस्कृतिक व सामाजिक जीवनामध्ये सहभाग घेण्याचा हक्क प्राप्त आहे. खरं तर मुलांसोबत आपण मोठ्यांनी भागीदारी करणे अपेक्षित आहे, पण सहभाग कसा घ्यायचा आणि कोठे घ्यायचा हे स्पष्टपणे माहीत असायला हवे. सहभागाच्या हक्कांमध्ये खालील हक्कांचा समावेश होतो.

- बालकाच्या व्यक्तिमत्त्वावर परिणाम करणाऱ्या सर्व बाबींमध्ये भाग घेण्याचा हक्क.
- बालकांचा दृष्टिकोन ऐकण्याचा किंवा अनुभवण्याचा आणि इतर सदस्यांनी ते गंभीरपणे घेण्याचा हक्क.

- अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा हक्क.
- विचार सद्सद्विवेक बुद्धी आणि धर्म स्वातंत्र्य व्यक्त करण्याचा हक्क.
- एकत्र येण्याचा आणि शांततेत सभा घेण्याच्या स्वातंत्र्याचा हक्क.

### १.३) विकासाचा हक्क :

बालकाचा व्यक्तिमत्त्व विकास हा, त्या बालकाला वाढत्या वयात पालक, नातलग, शेजारी आणि शिक्षक यांच्याकडून कशी वागणूक मिळाली यावर सर्वस्वी अवलंबून असतो. बालकाला सर्व प्रकारच्या सुप्त गुणांचा भावनिक, मानसिक व शारीरिक विकास करण्याचा हक्क प्राप्त आहे. विकासाच्या हक्कांमध्ये खालील बालहक्कांचा समावेश होतो.

- मोफत प्राथमिक शिक्षण
- माध्यमिक शिक्षण व व्यवसाय प्रशिक्षणाची उपलब्धता.
- बालकांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास, उपजत गुण, प्रतिभा आणि भावनिक, मानसिक, शारीरिक कार्यक्षमता पूर्ण करू शकेल असे शिक्षण प्राप्त करण्याचा हक्क.
- मुक्त समाजजीवनात बालकाला एक कार्यक्षम नागरिक बनवू शकेल असे शिक्षण प्राप्त करण्याचा हक्क.
- फुरसतीच्या वेळात खेळ आणि सांस्कृतिक कलात्मक कार्यक्रमात भाग घेण्याची संधी.
- बालकांना संस्कृतीचा आनंद मिळविण्याची आणि भाषा वापरण्याची संधी.
- विशेष काळजीची आवश्यकता असणाऱ्या बालकांना इतरांच्या साहाय्याने विकास करण्याचा हक्क.
- संस्कृती, भाषा आणि धर्म स्वीकारण्याचा हक्क.
- अन्न, वस्त्र, निवारा आणि मूलभूत गरजा भागविण्याचा हक्क.
- आराम करण्याचा हक्क.
- विविध स्रोतांमधून माहिती प्राप्त करण्याचा हक्क.
- मूल स्वत:च्या हितसंबंधात मत देऊ शकते.
- मुलांना संघटना करण्याचा हक्क आणि संघटनेत भाग घेण्याचा हक्क.
- मुलांना सांस्कृतिक जीवन आणि कला यांत भाग घेण्याचा हक्क.

खरे तर मुले जसजशी मोठी होतात तसतसा त्यांचा सहभाग वेगवेगळ्या पातळ्यांवर वाढीस लागतो. फक्त आपण मोठ्या व्यक्तींनी त्यांच्यावर विश्वास ठेवायचा असतो आणि तिथेच आपण मोठी माणसे

कमी पडतो. कारण आपल्या दृष्टीने मुले लहान असतात. पण आपण हे विसरतो की मुले जबाबदारी घेऊ शकतात.

याशिवाय खालील बाबतीत आपण मुलांचा सहभाग घेऊ शकतो.

- मुलांनी कोणत्या शाळेत प्रवेश घ्यावा?
- मुलांनी आपले दिवसाचे नियोजन कसे करावे?
- मुलांनी किती वेळ Online असावे आणि काय पहावे?
- मुलांनी आपला आहार कसा ठेवावा?
- घरातील छोट्या छोट्या प्रक्रियेत आपण मुलांचा सहभाग घ्यायलाच हवा.

**ग्रामीण भागातील मुलांचा सहभाग कुठे कुठे शक्य आहे?**

- आपल्या गावचा विकास आराखडा तयार करताना
- गावात शाळेच्या, खेळाच्या मैदानाचे काम करताना.
- गावात पाण्याचे स्रोत तयार करताना.
- गावच्या बालसंरक्षण समितीमध्ये
- गावात बालविवाह होऊ नयेत म्हणून
- गावातील कोणतेही मूल बालमजूर होऊ नये म्हणून

**ग्रामीण आणि शहरी भागात मुलांमुलींच्या सहभागाने आपण पुढील गोष्टी करू शकतो.**

- आपल्या गावात–शहरात अशा कोणत्या जागा आहेत, जिथे मुलामुलींना जाण्यास भीती वाटते अशी ठिकाणे शोधणे.
- आपल्या शहरात कुठल्या कुठल्या ठिकाणी मुले कामाला जातात?
- आपल्या गावातील, वॉर्डातील कोणकोणत्या व्यक्तींची मुलामुलींना भीती वाटते?

## १.४) संरक्षणाचा हक्क :

घरामध्ये व आसपासच्या परिसरामध्ये बालक असुरक्षित असेल, तर त्याला तशा घराबद्दल आणि परिसराबद्दल आपुलकी वाटत नाही. प्रत्येक बालकाला दुर्लक्ष, शोषण, गैरवापर आणि त्याच्या विकासावर घातक परिणाम करणाऱ्या प्रभावांपासून संरक्षण प्राप्त करण्याचा हक्क आहे. संरक्षणाच्या हक्कामध्ये पुढील विशिष्ट बालहक्कांचा समावेश होतो.

- गंभीर परिस्थितीत व संरक्षणाच्या परिस्थितीत जसे बालक आपल्या कुटुंबापासून, घरांपासून दूर होतात.

- जेव्हा बालक कायद्याच्या विरुद्ध जातात किंवा कायद्याच्या कचाट्यात सापडतात.
- शोषणाच्या स्थितीत जसे बालमजुरी, अमली पदार्थांचा गैरवापर विक्री, लैंगिक शोषण किंवा निंदा, अपहरण. इ.
- इतर कोणत्याही प्रकारचा भेदभाव.

**भारताचे संविधान बाल अधिकारांबाबत या मुद्द्यांना प्राधान्य देते हे आपल्याला माहीत असायला हवं !**

- कलम ३९ (फ) स्वातंत्र्य आणि सन्मानाच्या वातावरणात निरोगी वाढीसाठी समान संधी.
- कलम १४ समानतेची वागणूक मिळणे.
- कलम १५ कोणत्याही प्रकारच्या भेदभावापासून संरक्षण.
- कलम २१ वैयक्तिक स्वातंत्र्याचा हक्क आणि कायद्याच्या योग्य प्रक्रियेचा हक्क.
- कलम २३ वेठबिगारी किंवा मानवी व्यापारापासून संरक्षण.
- कलम ४६ सामाजिक अन्याय आणि पिळवणुकीपासून संरक्षण.

❖❖❖

# २. बालकांच्या सुरक्षिततेसंदर्भात कायदे

**प्रस्तावना :**

बालकांना जगण्याचा, विकासाचा, सहभागाचा आणि संरक्षणाचा अधिकार आहे. बालकांच्या त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांच्या सर्व हक्कांचे रक्षण होणे महत्त्वाचे आहे. या अधिकारांमध्ये महत्त्वाचा अथवा कमी महत्त्वाचा असे फरक करता येत नाही. प्रत्येक अधिकाराची पूर्ती ही एकमेकांवर अवलंबून असते.

बालकांची सुरक्षितता ही त्यांच्या हक्कांच्या संरक्षणांवर अवलंबून आहे. सर्व बालकांना त्यांचे अधिकार उपभोगता येत असतील, तरच त्या समाजातील बालके सुरक्षित असतील. त्यांच्या हक्कांचे संरक्षण करणे म्हणजेच अत्याचार, सर्व प्रकारचे शोषण, इजा, दुर्लक्ष, शिक्षा यांपासून रक्षण करून त्यांना ते हक्क उपभोगण्यासाठी पोषक वातावरण निर्माण करणे.

बालकांच्या संरक्षणाची संपूर्ण जबाबदारी ही प्रौढांची आहे. त्यासाठी सजग व जाणीवपूर्वक सातत्यपूर्ण प्रयत्नांची गरज असते. समाजात मुलांसाठी संरक्षित जाळे तयार करणे गरजेचे आहे. समाजातील विविध घटक, शासकीय यंत्रणा, व अशासकीय संस्था, धोरणे, सोयी–सुविधा आणि कायदे या सर्वांच्या मदतीनेच संरक्षणाचे जाळे तयार होते. समाजातील विविध घटकांनी बालकांच्या बाबतीतील आपल्या जबाबदाऱ्या संवेदनशीलपणे पार पाडल्यास हे जाळे अधिक मजबूत आणि उपयोगी ठरू शकेल. त्यामुळे प्रत्येक बालक सुरक्षित राहण्यास मदत होईल.

त्यासाठी विविध धोरणे आखण्यात आली व कायदे तयार करण्यात आले आहेत. बालकांसाठी काम करणारी प्रत्येक संस्था, यंत्रणा आणि संघटना यांनी हे कायदे व त्यातील तरतुदी यांबाबत माहिती करून घेणे महत्त्वाचे आहे.

**बालकांचे हक्क व सुरक्षितता या संदर्भातील कायदे :**

बालकांशी संबंधीचे कायदे समजून घेण्यापूर्वी बालकाची व्याख्या जाणून घेऊ या. विविध कायद्यांमध्ये बालकांबाबतचा उल्लेख आपणांस आढळतो. प्रत्येक कायद्याच्या विषयानुरूप बालकांची व्याख्या ही स्पष्ट करण्यात आली आहे. ती व्याख्या त्या कायद्यात कोणत्या वयापर्यंतच्या बालकांसाठी हा कायदा लागू आहे हे स्पष्ट करते. उदाहरणार्थ : शिक्षणाचा हक्क या कायद्यात ६ ते १४ वयोगटातील बालकांच्या शिक्षणाबाबत सांगितले आहे. तर बालकामगार या कायद्यात १४ वर्षापर्यंतच्या बालकांना धोकादायक परिस्थितीत काम करता येणार नाही असे म्हटले आहे. भारतीय दंड संहितेमध्ये देखील अनेक ठिकाणी बालकांच्या बाबत वेगवेगळे संदर्भ आढळतात.

### २.१) अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ :

- स्त्रिया आणि बालकांचा अनैतिक व्यापार रोखण्यासाठी सदर कायदा पारित केला.

- लैंगिक शोषण, भीक मागणे, अवयव तस्करी करीता पळवून नेऊन त्यांची खरेदी–विक्री करणे, अमली पदार्थ व शस्त्रांचा व्यापर इ. प्रकारांना निर्बंध घालण्यासाठी हा कायदा संमत करण्यात आला.

## २.२) बालविवाह प्रतिबंध कायदा २००६ :

- कायदेशीररित्या मुलाचे वय २१ व मुलीचे वय १८ वर्षे पूर्ण असेल. या निर्धारित वयाच्या अगोदर विवाह झाल्यास तो बालविवाह समजला जातो या कायद्यातील कलमनुसार हा गुन्हा मानला आहे.
- ग्रामसेवक हा बालविवाह प्रतिबंध अधिकारी व अंगणवाडीताई सहायक अधिकारी आहेत. नागरी विभागामध्ये बालविकास प्रकल्प अधिकारी हे बालविवाह प्रतिबंध अधिकारी व अंगणवाडी पर्यवेक्षिका सहाय्यक अधिकारी आहेत.
- बालविवाहासाठी कारणीभूत समव्यक्ती कायद्याने शिक्षेस पात्र आहेत.

## २.३) माहिती व तंत्रज्ञान सुधारित कायदा २००८ : (मूळ कायदा २०००)

- इंटरनेटच्या माध्यमातून हॅकिंग, फिशिंग, अश्लिल मजकूर पाठविणे, डिजिटल पाठलाग, आर्थिक फसवणूक, मॉर्फिंग इ. गुन्हांच्या संदर्भात हा कायदा आहे.
- कलम ८१ (e) : फेक प्रोफाइल तयार करणे, खाजगी अवयवांचे फोटो प्रसारित करणे.
- ६६ (d) : फिशिंग, स्फुफिंग, ई–मेल, एसएमएस, कॉल यांद्वारे वैयक्तिक माहिती गोळा करणे.
- कलम ६७, ६७ (a) : एखाद्या व्यक्तीला बदनाम करण्यासाठी, त्रास देण्यासाठी, फोटो, माहिती, बदनामकारक शब्द, अश्लिल मजकूर प्रसारित करणे.
- कलम ६७ (b) : बालकांविषयी अश्लिल साहित्य

## २.४) बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ :

- ८६ व्या घटना दुरुस्तीनुसार ६ ते १४ वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणारा अधिनियम आहे.
- प्राथमिक शिक्षण हा बालकाचा मूलभूत अधिकार मानला आहे.
- या कायद्याने बालकास दिली जाणारी कोणतीही शारीरिक व मानसिक शिक्षा हा गुन्हा मानला आहे.

## २.५) बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ (POCSO) :

- लैंगिक अत्याचारापासून संरक्षण करण्यासाठी भारत सरकारने २०१२ साली पारित केला.
- भारतीय राज्य घटनेच्या २१ व्या कलमानुसार नागरिकांना बालकांच्या संरक्षणाची खात्री दिलेली आहे. देशाच्या बालसंरक्षण धोरणाचा भाग म्हणून हा कायदा संमत करण्यात आला.

| कायद्यातील कलम | कायद्यातील तरतुदी |
|---|---|
| **बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२**<br>**(Protection of Children from Sexual Offence Act 2012 - (POCSO Act 2012)** | 'पोक्सो कायदा' म्हणजेच लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२ हा बालकांचे लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण करण्यासाठी आणि अशा घटनांतील गुन्हेगारांना शिक्षा देण्यासाठी भारत सरकारने २०१२ साली पारित केला आहे.<br>भारतीय राज्यघटनेच्या कलम २१ नुसार नागरिकांना बालकांच्या संरक्षणाची खात्री दिलेली आहे. भारतातील बालकांवरील लैंगिक अत्याचार विरोधी कायदे देशाच्या बाल संरक्षण धोरणाचा भाग म्हणून अधिनियमित करण्यात आले आहेत. राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाच्या आकडेवारीनुसार एकूण बालकांपैकी २४% बालकांवर लैंगिक अत्याचार होतात. तसेच भारतीय दंड संहितेमध्ये या गुन्ह्याबाबतची व्याख्या ही गुन्ह्यांच्या स्वरूपाच्या मानाने त्रोटक होती. त्याचा फायदा गुन्हेगारालाच जास्त होत होता, त्यामुळे एक स्वतंत्र कायदा करण्याची गरज भासत होती. भारतीय संसदेने लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा विधेयक २०११ मध्ये पारित केले. २२ मे २०१२ रोजी त्याचे कायद्यात रूपांतर झाले.<br>कायदेशीर प्रक्रियेच्या दरम्यान प्रत्येक टप्प्यावर मुलांच्या हिताचे संरक्षण करणे. लैंगिक हल्ले, लैंगिक छळ आणि पोर्नोग्राफी अशा प्रकारच्या गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण करणे यासाठी एक मजबूत कायदेशीर चौकट पुरवण्याकरिता लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२ तयार करण्यात आला.<br>**बालक प्रथम या तत्त्वाचा अंगीकार :**<br>• मुलांना त्रास होणार नाही अशा पद्धतीने अहवाल देणे.<br>• पुराव्याची नोंद करणे.<br>• खास नेमण्यात आलेल्या विशेष न्यायालयांच्या मार्फत जलद गतीने खटले चालविणे.<br>**कायद्यानुसार गुन्ह्याची व्याप्ती :**<br>• कायदा मुले आणि मुली दोघांनाही लागू होतो. पोर्नोग्राफीच्या संदर्भात बालकांचा समावेश असलेली पोर्नोग्राफी पाहणे, जवळ बाळगणे हा सुद्धा या कायद्यान्वये गुन्हा ठरविण्यात आला आहे.<br>• बालकांच्या लैंगिक छळात सामील होणे. कायद्यानुसार गुन्हा आहे.<br>• केवळ अत्याचार करणाराच नव्हे तर **अत्याचाराची माहिती असूनही तक्रार दाखल न करणारी व्यक्तीसुद्धा या कायद्याद्वारे गुन्हेगार मानण्यात आलेली आहे.**<br>या कायद्यानुसार लैंगिक अपराधाच्या व्याख्येची व्याप्ती वाढविण्यात आली आहे.<br>• जसे की लैंगिक हेतूने<br>  ○ लिंग किंवा शरीराच्या कोणत्याही अवयवांचा वापर<br>  ○ इतर कोणत्याही वस्तूंचा वापर करणे. |

| कायद्यातील कलम | कायद्यातील तरतुदी |
|---|---|
| | ❍ दुसऱ्या व्यक्तीस तसे मुलासोबत करावयास लावणे.<br>❍ बालकास आपले अवयव दाखविण्यास सांगणे.<br>❍ कोणत्याही प्रकारच्या अश्लील साहित्याचा वापर करणे.<br>❍ कोणत्याही प्रकारचे अश्लील साहित्य तयार करणे.<br>❍ बालकास लज्जा वाटेल असे बोलणे. |

**महत्त्वाचे :**

१) कायद्यानुसार जर अपराध संस्थात्मक अथवा बालकांची सुरक्षेची जबाबदारी असलेल्या व्यक्तीकडून घडल्यास तो गंभीर अपराध मानला जाईल.

२) कायद्यानुसार गुन्हा घडल्यास व घडल्याचे अवगत झाल्यास त्याची माहिती प्रशासन/पोलीस/बाल कल्याण समिती/चाईल्ड लाईन यांना देणे बंधनकारक आहे.

३) बळी पडलेल्या बालकास सहायक व्यक्ती बाल कल्याण समितीमार्फत देण्यात येते, जी बालकास पूर्ण साहाय्य करेल.

४) पीडित व्यक्तीस आर्थिक साहाय्य महिला बालविकास विभागाकडून दिले जाते.

**अपराध घडल्यास काय कराल? :**

**१. जर अपराध शाळेत घडल्यास :**

अ) बालकास धीर द्या. तुझी यात काही चूक नाही हा विश्वास द्या.

ब) अपराधी कितीही जवळचा असला तरी आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क करा. त्यांना सदर घटना सविस्तर सांगा.

क) वरिष्ठांनी त्याबाबत योग्य ती कार्यवाही केली आहे याची खात्री करा. (पोलिसांना किंवा इतर यंत्रणांना कळवा.)

ड) वरिष्ठांनी दखल न घेतल्यास त्याबाबत दूरध्वनी क्रमांक १०० द्वारे किंवा पोलीस ठाण्यात जाऊन पोलिसांना माहिती द्या. तालुका अथवा जिल्हा स्तरावरील वरिष्ठांना कळवा.

इ) बालकाबद्दलची माहिती गुप्त राहील याची काळजी घ्या.

फ) अपराधी व्यक्तीचा बालकाशी संपर्क येऊ देऊ नका.

ग) शक्य असल्यास समुपदेशकाची मदत घ्या, जेणेकरून बालकावरील मानसिक ताण कमी होईल.

**२. जर अपराध शाळेबाहेर घडल्यास :**

अ) अपराध जर घरी किंवा आजूबाजूस घडला असेल, तर ताबडतोब आपल्या वरिष्ठांना, बालकाच्या पालकांस किंवा बालकास सुरक्षित वाटेल, त्याचा विश्वास असेल अशा व्यक्तीस कळवा. कोणाकडून मदत मिळू शकते त्याबद्दल माहिती द्या. (पोलीस, १०९८ चाईल्ड लाईन, बाल कल्याण समिती, बाल संरक्षण कक्ष)

ब) गावातील पोलीस पाटील यांना माहिती द्या.

क) तसेच गावातील बाल संरक्षण समितीस सांगून बालकास सर्वतोपरी मदत करण्याचे आवाहन करा.

## २.६ ) बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) कायदा २०१५ :

ज्या बालकाच्या हातून गुन्हा घडलेला आहे, अशा बालकांचे संरक्षण व सामाजिक पुनर्वसनाची प्रक्रिया राबविणेबाबत हा कायदा आहे. जेणेकरून बालकास सुरक्षित वाटावे याकरिता कलम–१, कलम–३१, कलम–२(१४), कलम–२९, कलम–१०, व कायद्यातील प्रकरण ७ मधील तरतुदी महत्त्वाच्या आहेत.

## २.७) बालकामगार (प्रतिबंध व नियम) सुधारित कायदा २०१६ (मूळ कायदा १९८६) :

- बालमजुरी समस्या सोडवण्यासाठी तसेच अशिक्षित व बेरोजगार बालकांकडून कमी पैशात काम करून घेणे यासारख्या समस्या सोडवण्यासाठी हा कायदा संमत करण्यात आला.
- १५ ते १८ वयाच्या बालकांना धोकादायक उद्योगधंदे सोडून इतर ठिकाणी अटीच्या अधीन राहून काम करता येते. या कायद्यानुसार काम करणाऱ्या बालकासोबत क्रूरता झाल्यास अपराध समजला जातो.
- १४ वर्षापर्यंतच्या कोणत्याही बालकास काम करण्यास बंदी आहे.
- या कायद्याचा भंग झाल्यास खालील ठिकाणी तक्रार करता येते.
- चाईल्ड हेल्पलाईन १०९८
- पोलीस १००
- जिल्हा बाल संरक्षण कक्ष
- जिल्हा कामगार अधिकारी
- बालकामगार प्रथा विरोधी कृतीदल
- बाल कल्याण समिती
- जिल्हा कामगार अधिकारी
- जिल्हा विधीसेवा प्राधिकरण

## २.८) बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम (POCSO) सुधारणा, २०१९ :

हे विधेयक २०१२ च्या लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण कायद्यात सुधारणा करेल.

- **लिंगभेदक लैंगिक अत्याचार :**

  या विधेयकात किमान शिक्षा सात वर्षांवरून दहा वर्षांपर्यंत वाढवली आहे. त्यात असेही म्हटले आहे की, जर एखाद्या व्यक्तीने १६ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलावर लिंगभेदक लैंगिक अत्याचार केला तर त्याला २० वर्ष ते जन्मठेपेची शिक्षा आणि दंडाची तरतूद आहे.

- **तीव्र लैंगिक अत्याचार :**

  'तीव्र लैंगिक अत्याचार' मध्ये अशा प्रकरणांचा समावेश होतो. जिथे अत्याचारामुळे बालकांच्या लैंगिक अवयवांना दुखापत होते, या विधेयकात तीव्र लैंगिक अत्याचाराच्या एकूण अर्थामध्ये आणखी दोन गुन्हे जोडले गेले आहेत.

  १) नैसर्गिक आपत्तीच्या वेळी लैंगिक अत्याचार होणे.

  २) लवकर लैंगिक परिपक्वता प्राप्त करण्यासाठी बालकाला कोणतेही संप्रेरक किंवा रासायनिक पदार्थ देणे.

- **पोर्नोग्राफिक हेतू :**

  या कायद्याअंतर्गत, जर एखादी व्यक्ती लैंगिक समाधानासाठी कोणत्याही प्रकारच्या माध्यमात बालकांचा वापर करते तर ती व्यक्ती पोर्नोग्राफिक हेतूंसाठी बालकांचा वापर केल्याबद्दल दोषी ठरते. हा कायदा अशा व्यक्तींना दंड करतो जे पोर्नोग्राफीसाठी बालकांचा वापर करतात.

- **अश्लील साहित्याचा साठा :**

  या कायद्यानुसार व्यावसायिक हेतूंसाठी अश्लील साहित्य साठविण्यास तीन वर्षांची शिक्षा, दंड किंवा दोन्ही शिक्षा आहेत. या विधेयकात बालकांशी संबंधित अश्लील साहित्य साठवण्यावर आणखी दोन गुन्हे समाविष्ट आहेत.

  १) बालकांशी संबंधित अश्लील सामग्रीची तक्रार न करणे, ती नष्ट करणे किंवा ती हटवणे.

  २) अशी सामग्री प्रदर्शित करणे, वितरित करणे किंवा प्रसारित करणे.

### POCSO कायद्याची ठळक वैशिष्ट्ये आणि त्यातील सुधारणा :

**या कायद्याची आणि त्यातील सुधारणांची ठळक वैशिष्ट्ये :**

- हा कायदा लिंगनिरपेक्ष आहे आणि बालकांच्या निरोगी, भावनिक, बौद्धिक, शारीरिक आणि सामाजिक विकासाची खात्री देण्यासाठी प्रत्येक टप्प्यावर बालकाचे सर्वोत्तम हित आणि कल्याण महत्त्वाचे मानतो.
- या कायद्यात लैंगिक शोषणाचे वेगवेगळे प्रकार परिभाषित केले आहेत. ज्यामध्ये लिंगभेद, लैंगिक छळ आणि पोर्नोग्राफी यांचा समावेश आहे. काही परिस्थितीत जेव्हा अत्याचारित मूल मानसिकदृष्ट्या आजारी असते किंवा जेव्हा कुटुंबातील सदस्य, पोलीस अधिकारी, डॉक्टर किंवा शिक्षक यासारख्या विश्वासू किंवा अधिकाराच्या पदावर असलेल्या व्यक्तीकडून अत्याचार केला जातो तेव्हा लैंगिक अत्याचार 'तीव्र' असल्याचे मानले जाते.

- या कायद्यात, लैंगिक हेतूंसाठी मुलांची तस्करी करणाऱ्यांनाही कायद्याच्या तरतुदींनुसार शिक्षा होऊ शकते. या कायद्यात गुन्ह्याच्या गंभीरतेनुसार जास्तीत जास्त जन्मठेपेची शिक्षा आणि दंड अशी शिक्षा देण्यात आली आहे.
- या कायद्यानुसार 'बाल पोर्नोग्राफी' म्हणजे एखाद्या बालकाला लैंगिकदृष्ट्या स्पष्ट वर्तन दाखवणे ज्यामध्ये छायाचित्रे, डिजिटल, व्हिडिओ किंवा संगणकाद्वारे तयार केलेल्या प्रतिमा दाखवणे तसेच त्यांमध्ये बालकांचा वापर करणे इ. समावेश होतो. इत्यादींचा समावेश होतो.

❖❖❖

# ३. बालकांचे संरक्षण

**प्रस्तावना :**

बालकांचे जीवन सुरक्षित, समृद्ध व सशक्त बनवणे हे प्रत्येक समाजाची व शासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. बालकांना केवळ संरक्षणच नव्हे, तर त्यांचा आत्मसन्मान, विकास, सहभाग आणि सशक्तता याचा अधिकार आहे. त्यांच्या सर्वांगीण कल्याणासाठी केवळ शारीरिक सुरक्षा नव्हे तर मानसिक, भावनिक, सामाजिक आणि शैक्षणिक सुरक्षिततेचाही समावेश होतो.

प्रत्येक बालकाचा विकास सुसंवादात्मक, सहानुभूतीपूर्ण आणि सशक्त वातावरणात होणे आवश्यक आहे. बालकांना त्यांच्या हक्कांची जाणीव असणे आणि त्या हक्कांचे समाजाने संरक्षण करणे ही प्रक्रिया एकत्रितपणे घडते. ही जबाबदारी शाळा, कुटुंब, समाज, स्थानिक प्रशासन, शासकीय, अशासकीय संस्था आणि सर्व नागरिकांची आहे.

या प्रकरणामध्ये बालकांच्या संरक्षणाशी संबंधित धोरणे, उपाययोजना, शाळा स्तरावर होणारी अंमलबजावणी आणि जबाबदाऱ्या याचे विस्तृत स्वरूप मांडले आहे. शाळांमध्ये सुरक्षित आणि अनुकूल वातावरण निर्माण करण्यासाठी कायदेशीर चौकट, संस्थात्मक भूमिका, तसेच शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांचे सहभाग याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे.

बालकांच्या संरक्षणासाठी आवश्यक ती सजगता, समज, कृती आणि सहकार्य हीच खरी गुंतवणूक आहे जी त्यांच्या सशक्त भविष्यासाठी अत्यंत मोलाची आहे.

## ३.१) शारीरिक सुरक्षिततेचे स्वरूप, शारीरिक संरक्षण व शाळेने घ्यावयाच्या खबरदारीचे उपाय :

### ३.१.१) शारीरिक असुरक्षिततेचे स्वरूप :

- शाळेच्या परिसरात जसे की स्वच्छतागृह, प्रयोगशाळा अंधाऱ्या व पडीक जागा (खोल्या इत्यादी ठिकाणी बालकांवर लैंगिक अत्याचार होऊ शकतात.
- शाळा सुटल्यानंतर घरी जाताना निर्मनुष्य/निर्जन ठिकाणी बालकांवर लैंगिक अत्याचार होऊ शकतात.
- शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या आपसांत झालेल्या छोट्या, मोठ्या भांडणांचा बदला घेण्याच्या हेतूने शाळेतून घरी जाताना मारहाण किंवा प्राणघातक हल्ला होऊ शकतो.
- शाळेच्या परिसरात बालकांसोबत छेडछाड होऊ शकते.
- एकतर्फी प्रेमातून ॲसिड हल्ला, चाकू हल्ला किंवा इतर स्वरूपाचा प्राणघातक हल्ला होऊ शकतो.

- शाळेच्या किंवा बाह्य यंत्रणेमार्फत शाळेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून बालकांना अश्लील व्हिडिओ दाखवून तशा प्रकारचे अश्लील कृत्य बालकासोबत होऊ शकते.
- शाळेच्या शालेय परिसरात आणि शाळेबाहेरच्या परिसरात चॉकलेट, खाऊ देण्याच्या बहाण्याने लैंगिक अत्याचार होऊ शकतात.
- खाजगी शिकवणीच्या ठिकाणी बालकांवर होणारे लैंगिक अत्याचार.
- शाळेव्यतिरिक्तच्या वेळेत बालकाचा ताबा अन्य व्यक्तीकडे दिल्याने बालकांचे शोषण होऊ शकते.

**उपाय :**

१) शारीरिक सदृढतेसाठी त्यासाठी पारंपरिक व्यायाम, कवायती, शारीरिक–बलवर्धक खेळ बालकांना करायला लावणे.

२) विनाशस्त्र युद्ध कला यामध्ये महिलांच्या रोजच्या पेहरावातील वस्तूंच्या साहाय्याने स्वसंरक्षण (ओढणीपासून बचाव) करणे.

- हात सोडवणे.
- केस सोडवणे.
- मिठी सोडवणे.
- गळा सोडवणे.
- बुक्की, चापट स्वसंरक्षण
- चाकू हल्ला बचाव
- काठी हल्ला बचा
- तलवार/कोयता हल्ला बचाव

यासर्व गोष्टींपासून बचाव केल्यानंतर प्राथमिक हल्ला करणे. जेणेकरून त्या असुरक्षित वातावरणातून स्वत:चा बचाव/सुटका करता येईल.

३) प्रतिकाराच्या पद्धती शिकवणे :

- कराटे, मार्शल आर्ट इ.
- प्रतिकारासाठी सशक्त मन व शरीर जागरुकता, सजगता निर्माण करणे, आत्मविश्वास निर्माण करणे.
- स्वतःच्या शरीराची शारीरिक ठेवण जशी आहे तशी स्वीकारणे. स्त्री/मुलगी आहोत म्हणून नकारात्मक भावना न ठेवणे, शरीरात होणाऱ्या बदलांविषयी शास्त्रीय माहिती मिळविणे, पौगंडावस्थेतील बदलांसंदर्भात ज्ञान देणे.)
- लाठी–काठी प्रशिक्षण देणे, चाकू हल्ला बचाव, ॲसिड हल्ला बचाव प्रशिक्षण देणे.
- शाळांतून मुलांना सोडताना पालकांची खात्री करून सोडणे.

- कोणत्याही अनोळखी व्यक्तीकडून कोणताही खाऊ/इतर अमिषाला बळी पडू नये म्हणून पालक आणि शिक्षकांनी खबरदारी घ्यावी.
- शाळेमध्ये स्काऊट–गाईडची स्थापना करावी जेणेकरून मुलांना स्वसंरक्षणाचे कौशल्य तसेच इतर आपत्कालीन प्रसंगी आवश्यक कौशल्य शिकण्यास मदत होईल.
- बालकांमध्ये संकटकालीन परिस्थितीमध्ये हेल्पलाईन नंबर वापराविषयी जागरुकता निर्माण करणे.

  उदा. १) पोलिसांच्या मदतीसाठी – ११२

  २) पोक्सो – १०९८

  ३) शाळेतील कार्यालय नंबर

  ४) चिराग ॲपबाबत माहिती

### ३.१.२) शोषणासंदर्भातील लक्षणे :

स्वत:वरती झालेल्या शोषणाला प्रत्येक मूल वेगळ्या प्रतिक्रिया, प्रतिसाद देते, हे जाणून घेणे आवश्यक आहे. शोषण झाल्यानंतर लगेच दिसून येणाऱ्या लक्षणांपैकी काही लक्षणे बालकामध्ये आढळून आल्यास त्याला तातडीची मदत मिळवून देता येईल.

- **धक्का :** ज्या व्यक्तीवर आपण विश्वास ठेवला, प्रेम केले त्यानेच आपले शोषण केले या सत्याचा शोध लागल्यानंतर बालकाला जबर मानसिक धक्का बसतो. त्यामुळे ते प्रचंड तणावाखाली येते.
- **गोंधळ :** अनेकदा शोषणकर्ता बालकाच्या ओळखीचा, त्याचा नातलग असल्यामुळे त्याच्याकडून बालकाच्या विश्वासाला तडा गेल्यानंतर ते गोंधळून जाते.
- **अपराधीपणा आणि लाज :** संकटग्रस्त/संकटसदृश्य परिस्थितीत बालकाला असुरक्षित जाणवते. मात्र प्रतिकार करण्याऐवजी बालक स्वत:ला दोषी मानते. अपराधीपणा व लाज या कारणाने बालक तणावग्रस्त होते.
- **राग :** सुरक्षा आणि विश्वासावरती झालेल्या समूळ आघाताला दिलेली एक बचावात्मक प्रतिक्रिया म्हणून शोषित मुलांमध्ये तीव्र स्वरूपाचा राग, चीड निर्माण होते.
- **भीती :** शोषण झाल्यानंतर मुलाला आजूबाजूचा समाज, सार्वजनिक ठिकाणच्या गर्दीची अचानकपणे भीती वाटायला लागते. पुन्हा शोषण होण्याचे व इतरांना शोषणाविषयी कळण्याचे भय वाटते.
- **सामाजिक :** एकलकोंडेपणा, समाजापासून दूर राहणे, वाढलेला वैरभाव, आक्रमकता, वरवरचे सुखप्रद वर्तन, कार्यक्षमतेत जबरदस्त परिवर्तन.

- **दु:ख :** मुलाला तीव्र स्वरूपाचे दु:ख किंवा नैराश्य जाणवू शकते.
- **लैंगिक :** लैंगिक वर्तन, लवकर लैंगिक क्रिया करणे, लैंगिक शिव्या असलेल्या भाषेचा उपयोग करणे.
- **वैद्यकीय :** मनोशारीरिक आजार, लैंगिक भागात दुखणे, सूज येणे, वारंवार मूत्र संक्रमण होणे, लैंगिक रूपाने होणारे संक्रमण.
- **मनोवैज्ञानिक :** खाण्यात बिघाड, चिंता, उदासीनता, नैराश्य, आत्महत्येचा प्रयत्न.

### ३.१.३) बालकांचे शारीरिक संरक्षण

बालकांचे शारीरिक संरक्षण ही अत्यंत महत्त्वाची जबाबदारी आहे. शाळा, महाविद्यालये आणि पालकांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना केल्या पाहिजेत. शाळेचे वातावरण सुरक्षित आणि संरक्षित असल्यास बालक आत्मविश्वासाने शिकू शकतात आणि त्यांचा सर्वांगीण विकास होऊ शकतो. शिक्षणाबरोबरच सुरक्षितता हेही शाळेचे प्रमुख उद्दिष्ट असायला हवे.

शाळा हे विद्यार्थ्यांसाठी केवळ शिक्षणाचे ठिकाण नसून, तेथे त्यांची सुरक्षिततादेखील तितकीच महत्त्वाची असते. बालके शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या सुरक्षित असतील, तरच ते आनंदाने आणि निर्भयपणे शिक्षण घेऊ शकतात. त्यामुळे शाळांनी विद्यार्थ्यांच्या शारीरिक संरक्षणासाठी काही महत्त्वाच्या खबरदारीच्या उपाययोजना करणे गरजेचे आहे.

**शाळेने घ्यावयाच्या खबरदारीचे उपाय :**

#### १) सुरक्षित शालेय परिसर :

- शाळेच्या गेटवर सुरक्षारक्षक तैनात करावेत.
- शाळेत प्रवेश आणि निर्गमासाठी ठरावीक वेळापत्रक असावे.
- शाळेच्या आवारात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावे.
- आपत्तीच्या प्रसंगी मदत मिळण्यासाठी इमरर्जन्सी अलार्म आणि हेल्पलाइन क्रमांक उपलब्ध असावेत.

#### २) वाहतुकीची सुरक्षितता :

- शाळेच्या बस आणि वाहनांची नियमित तपासणी करावी.
- सुरक्षित प्रवासासाठी विद्यार्थ्यांमध्ये वाहतुकीच्या नियमांबाबत जागरूकता निर्माण करावी.
- वाहनचालक आणि सहायक यांची चारित्र्य पडताळणी करूनच नेमणूक करावी. विद्यार्थी वाहतुकीच्या बसमध्ये किमान एक महिला सहायक असावी.

### ३) स्वसंरक्षणविषयक प्रशिक्षण :

- बालकांना स्वसंरक्षण (Self-defence) विषयक प्रशिक्षण द्यावे.
- आत्मरक्षातंत्र, त्वरित प्रतिसाद आणि धोक्याच्या परिस्थितीत करावयाच्या कृतीबाबत नियम शिकवावेत.
- घर, शाळा, सार्वजनिक ठिकाणे याठिकाणी आग, भूकंप, पूर यासारख्या आपत्तीच्या वेळी कोणती काळजी घ्यावी याचे शिक्षण द्यावे.
- असुरक्षित वातावरणात किंवा संशयास्पद परिस्थितीत स्वतःचे रक्षण करण्यासाठी बालकाने मोठ्याने ओरडणे, चावा घेणे इत्यादी उपाय करावेत. तसेच पालक, शिक्षक किंवा विश्वासू व्यक्तीशी तातडीने संपर्क साधण्याविषयी जागरूकता निर्माण करावी.
- शाळेमध्ये उपलब्ध असलेल्या प्रथमोपचार पेटीचे प्राथमिक ज्ञान द्यावे.
- शाळा आणि खेळाच्या ठिकाणी सुरक्षितता सुनिश्चित करावी. जसे की धोकादायक वस्तूपासून दूर ठेवणे, खेळाचे सुरक्षित साधन उपलब्ध करून देणे.
- मानसोपचार तज्ज्ञ आणि समुपदेशक उपलब्ध करून द्यावेत.
- बालकांना कोणतेही गैरवर्तन सहन न करता ठामपणे नकार देण्यास सांगावे.

### ४) गैरवर्तन आणि छळाविरोधी कठोर धोरण :

- शाळेत छेडछाड, रॅगिंग आणि मारहाण रोखण्यासाठी कठोर नियम लागू करावेत.
- बालक आणि शिक्षक यांच्यात विश्वासाचे नाते निर्माण करावे, जेणेकरून बालक कुठलीही तक्रार न घाबरता करू शकतील.

### ५) आरोग्य आणि स्वच्छता :

- बालकाचे आरोग्य सुदृढ राहण्यासाठी संतुलित आहाराचे महत्त्व सांगून योग, व्यायाम, मैदानी खेळ इत्यादीचे आयोजन करावे तसेच शालेय पोषण आहाराचा दर्जा उत्तम राखावा.
- स्वच्छ पिण्याचे पाणी आणि स्वच्छतागृहांची सोय करावी.
- शाळेच्या परिसरात स्वच्छता राखण्यासाठी नियमित स्वच्छता मोहीम राबवावी.
- विद्यार्थ्यांच्या सुदृढ आरोग्यासाठी आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करावीत.
- किशोरावस्थेतील/पौगंडावस्थेतील बालकांमध्ये शारीरिक बदलांबाबत जागृती निर्माण करावी.
- प्रत्येक शालेय इमारतीमध्ये सॅनिटरी पॅड व्हेंडींग मशीनची उपलब्धता असावी.

## ३.२) संरक्षण समस्या, आव्हाने आणि सुरक्षितता व प्रतिबंधात्मक उपाय : मानसिक आणि भावनिक

मानसिक व भावनिक आरोग्य शारीरिक आरोग्याइतकेच महत्त्वाचे आहे. बालक वाढीच्या वेगवेगळ्या

टप्प्यांतून जात असताना त्यांच्यामध्ये आमूलाग्र शारीरिक, मानसिक व भावनिक बदल होत असतात. मानसिक व भावनिक स्वास्थ्य हे बालकांच्या वाढ व विकासात महत्त्वाची भूमिका निभावते.

## भाग १ : वयोगटानुसार मानसिक व भावनिक आरोग्य समस्या आणि आव्हाने

### १) पायाभूत स्तर (पूर्वप्राथमिक ते इ. दुसरी)

**समस्या :** कुटुंबापासून विभक्त होण्याची भीती, भावनिक अवलंबित्व, भावना व्यक्त करण्यात अडचण, अस्थिर कौटुंबिक वातावरण, हिंसेचा अनुभव, भावनिक आधाराचा अभाव.

#### सुरक्षितता आणि प्रतिबंधात्मक उपाय :

- सुरक्षित आणि निकोप वातावरण निर्माण करावे.
- पालकांचा बालकांसोबत सकारात्मक संवाद प्रस्थापित करून विश्वासाचे नाते निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावेत.
- बालकांना भावभावनांचे समायोजन करण्यास मदत करावी.

### २) पूर्वतयारी स्तर (इ. तिसरी ते पाचवी)

**समस्या :** आत्मसन्मानाचा अभाव, समवयस्कांचा दबाव, अभ्यासाचा तणाव, छळ (बुलिंग), लिंग भेदभाव, भावना व्यक्त करण्यातील समस्या, वाढलेला स्क्रिन टाइम.

#### सुरक्षितता आणि प्रतिबंधात्मक उपाय :

- बालकांना भावनांबद्दल मोकळेपणाने बोलण्यास प्रवृत्त करणे.
- अभ्यासातून येणारा मानसिक तणाव हाताळण्यासाठी खेळांच्या माध्यमातून तणाव व्यवस्थापनाची विविध साधने शिकवणे. (योग, प्राणायाम, मैदानी खेळ इत्यादी.)
- सामाजिक संवाद आणि ऑनलाइन कृतींवर लक्ष ठेवा.
- पालकांचा बालकांसोबत सकारात्मक संवाद प्रस्थापित करून विश्वासाचे नाते निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावेत.

### ३) पूर्वमाध्यमिक स्तर (इ. सहावी ते आठवी)

**समस्या :** मूड स्वींगस्, स्व-ओळख संकोच, शरीर प्रतिमेबद्दल न्यूनगंड (बॉडी शेमींग), समवयस्क दबाव, लैंगिक आकर्षण, लैंगिक शोषण, ऑनलाइन छळ, इतरांशी तुलना.

#### सुरक्षितता आणि प्रतिबंधात्मक उपाय :

- बालकांची शारीरिक, मानसिक सकारात्मकता आणि आत्मस्वीकृती वाढवण्यासाठी समुपदेशन करणे. स्वओळख निर्माण करण्यासाठी, स्वतःची बलस्थाने ओळखण्यासाठी बालकास विविध उपक्रमांच्या माध्यमातून मदत करणे.

- बालकांमध्ये इंटरनेटच्या सुरक्षित वापराबाबत जाणीवजागृती निर्माण करणे.
- मनःस्वास्थ्यासाठी छंद जोपासण्यास चालना देणे.
- मानसिक व भावनिक तणाव हाताळण्यासाठी तणाव व्यवस्थापनाची विविध साधने शिकवणे. (योग, प्राणायाम, मैदानी खेळ, आवडीची कला–छंद जोपासणे इत्यादी.)
- पालकांचा बालकांसोबत सकारात्मक संवाद प्रस्थापित करून विश्वासाचे नाते निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे. यासाठी पालक समुपदेशनाचे सत्र आयोजित करणे.

### ४) माध्यमिक स्तर (इ. नववी ते बारावी)

**समस्या :** चिंता, नैराश्य, नातेसंबंधांतील तणाव, करिअरचा दबाव, सामाजिक अपेक्षा, प्रेमसंबंधातून येणारे तणाव, व्यसनाधीनतेचा धोका. असुरक्षित लैगिंक संबंध, पोर्नोग्राफीमधील सहभाग, पॉर्न ॲडीक्शन इ.

**सुरक्षितता आणि प्रतिबंधात्मक उपाय :**

- मानसिक व भावनिक आरोग्यासाठी समुपदेशन उपलब्ध करून द्यावे.
- करिअर आणि शैक्षणिक मार्गदर्शक मेळावे आयोजित करावेत.
- संमती, वैयक्तिक सीमारेषा आणि आत्मसंरक्षण याविषयी संवाद साधावा.
- वेळोवेळी मुलांच्या मानसिक व भावनिक आरोग्याविषयी पालकांशी संवाद साधावा.
- समाज माध्यमातील साधनांचा सुरक्षित वापर व होणारी फसवणूक याबाबत जागरूकता निर्माण करावी. पालकांचा बालकांसोबत सकारात्मक संवाद प्रस्थापित करून विश्वासाचे नाते निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावेत.

बाल्यावस्थेपासून मानसिक व भावनिक आरोग्याला प्राधान्य दिल्यास बालक आत्मविश्वासाने, स्थिरतेने आणि आनंदाने जीवन जगू शकेल. कुटुंब, शिक्षक आणि समाजाने एकत्र येऊन सुरक्षित, विश्वासार्ह वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. या प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या अंमलबजावणीमुळे प्रत्येक बालकाचे जीवन सुरक्षित आणि आनंदी होईल.

मानसिक आरोग्य बालकांच्या विचार, भावना आणि कृतीवर परिणाम करते. त्यामुळे चांगले मानसिक व भावनिक आरोग्य म्हणजे नेमके काय हे बालकांना समजावणे आवश्यक आहे.

### चांगल्या मानसिक व भावनिक आरोग्याची वैशिष्ट्ये :

- सुरक्षित निवड करणे.
- वैयक्तिक उद्दिष्टे गाठणे.
- निरोगी नातेसंबंध विकसित करणे.

- ताणतणावाचा योग्य पद्धतीने सामना करणे.
- आव्हानांचा सामना करणे.
- जीवनाचा आनंद घेणे
- सहानुभूती दाखवण्याची क्षमता राखणे.
- आपल्या भावना योग्य मार्गाने व्यक्त करणे व भावनांचे समायोजन करणे.

**मानसिक व भावनिक आरोग्य राखण्याचे मार्ग :**

- नियमित व्यायाम
- पुरेशी झोप
- संतुलित आहार
- योग, प्राणायाम यांसारख्या तणाव व्यवस्थापन कृती
- नवीन कौशल्ये शिकणे व छंद जोपासणे.
- नवीन कलाज्ञान प्राप्त करणे.

## ३.३) बालकाची सामाजिक सुरक्षितता व संरक्षण :

बालकांच्या सर्वांगीण विकासाकरिता व सर्वंकष वाढीसाठी सुरक्षित सामाजिक वातावरणाची अत्यंत आवश्यकता असते. बालक ज्या समाजाचा घटक आहे, त्या समाजव्यवस्थेबद्दल सुरक्षित व सहज भावना बालकांच्या मनात निर्माण झाल्यास बालकाच्या विकासात सकारात्मक परिणाम दिसून येईल.

याकरिता सामाजिक सुरक्षितता हा घटक बालकाच्या सुरक्षितता व विकासातील आवश्यक व परिणामकारक घटक आहे, मात्र बदलत्या सामाजिक व्यवस्था आणि आव्हांनामुळे बालकाच्या सामाजिक सुरक्षिततेमध्ये अनेक अडथळे/समस्या येतात.

**बालकांच्या सामाजिक सुरक्षिततेमध्ये येणारे अडथळे/समस्या :**

- लिंग भेदभावातून निर्माण होणाऱ्या सामाजिक समस्या. जसे – बालविवाह, स्त्रीभ्रूण हत्या, हुंडा पद्धती इ.
- मुलीकडे पाहण्याचा संकुचित व रुढीवादी दृष्टिकोन आणि यामुळे खालावलेली मुलींची सामाजिक पातळी, शिक्षण व व्यवसायातील मुलींचे अल्प प्रमाण.
- समाजातील आर्थिक विषमतेमुळे बालकांचे विशेषतः मुलींचे होणारे शोषण.
- लैंगिक अत्याचार घटनांबाबत संकुचित सामाजिक धारणा आणि त्यातून अत्याचाराची घटना दडपण्यासाठी वाढत जाणारे गुन्हे.

- जातीवाद, धार्मिक तेढ, गुंडगिरी, दडपशाही यांमुळे निर्माण होणारी सामाजिक तेढ व वाढती गुन्हेगारी व त्यातून बालकांच्या सुरक्षितवरील होणारा प्रभाव व परिणाम.
- समाजाच्या अवाजवी अपेक्षांचे बालकांवरील ओझे व त्यातून निर्माण होणारे तणावयुक्त वातावरण.
- बालकामगार, त्यांचे खालावलेले जीवनमान आणि कामाच्या ठिकाणी होणारे शोषण.
- बालकांची अवैध व बेकायदेशीर तस्करी, त्यांच्या अवयवांची अवैध तस्करी.
- अमली पदार्थांची अवैध विक्री व त्यासाठी होणारा बालकांचा वापर तसेच बालकांमार्फत अंमली पदार्थांचा होणारा वापर.
- पोर्नोग्राफीमध्ये होणारा बालकांचा बेकायदेशीर वापर.
- इंटरनेटच्या माध्यमातून सोशल मीडियावरून होणारी बालकांची विशेषत: मुलींची छळवणूक.

अशा अनेक सामाजिक सुरक्षेसंदर्भात येणाऱ्या समस्या मुलांच्या सामाजिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम करत असतात, मात्र पुढील उपाययोजना लक्षात घेऊन त्याची काटेकोर अंमलबजावणी झाल्यास बालकाची सामाजिक सुरक्षितता साध्य करता येईल.

**बालकांचे सामाजिक संरक्षण व स्व-संरक्षण उपाययोजना :**

- लिंगसमभाव निर्माण व्हावा यासाठी सामाजिक व शालेय स्तरावर विविध उपक्रम राबविणे.
- समाजातील आदर्श व्यक्तिमत्त्व असणाऱ्या व्यक्तींची मुलाखत, भेट, परिसंवाद व चर्चासत्रांचे आयोजन करणे.
- समाजातील अनिष्ट रुढी, प्रथा, परंपरा, अज्ञान याविषयी उद्‌बोधनातून जागरूकता निर्माण करण्यासाठी पथनाट्य, वादविवाद व एकांकिका इ. उपक्रमांचे आयोजन करावे.
- विविध सामाजिक समस्यांवर चर्चासत्रे आयोजित करून बालकांमध्ये सामाजिक प्रश्नाविषयी संवेदनशीलता निर्माण करणे.
- बालकांना त्यांच्या मूलभूत अधिकारांचे महत्त्व पटवून देणे.
- समाजामध्ये व्यसनाधीनता रोखण्यासाठी उद्‌बोधनात्मक विविध उपक्रमांचे आयोजन करणे.
- बालक अनुकरणप्रिय असल्यामुळे त्याच्या सभोवतालचे वातावरण पोषक राहील यासाठी प्रयत्न करणे. (शाळा/गावात सार्वजनिक वाचनालये, मैदाने इ. सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.)
- १००% बालके शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी प्रयत्न करावेत. मुलींचे शिक्षणाचे प्रमाण वाढण्यासाठी विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून द्यावा.

❖❖❖

# ४. मुलींचे स्व-संरक्षण

**प्रस्तावना :**

आजच्या बदलत्या सामाजिक व डिजिटल जीवनशैलीत बालकांच्या सुरक्षिततेसमोरील आव्हाने अधिक गुंतागुंतीची होत आहेत. सार्वजनिक ठिकाणी, शाळा परिसरात किंवा घरी असतानाही बालकांना छळ, हिंसा, लैंगिक शोषण, शारीरिक आक्रमण किंवा भावनिक त्रास यांसारख्या प्रसंगांना सामोरे जावे लागू शकते. त्यामुळे त्यांच्या संरक्षणासाठी फक्त कायदे किंवा मोठ्यांचे मार्गदर्शन पुरेसे नाही, तर स्वत:चा बचाव करण्याचे कौशल्यही बालकांमध्ये असणे गरजेचे ठरते. त्यातही मुलींनी स्व–संरक्षणाची तंत्रे आत्मसात करणे आवश्यक आहे.

स्व–संरक्षण म्हणजे केवळ शारीरिक बचाव नव्हे, तर संकट ओळखणे, प्रसंगानुरूप निर्णय घेणे, आत्मविश्वासाने वागणे आणि आवश्यक असल्यास परिस्थितीचा प्रतिकार करणे– हे सगळेच त्यामध्ये अंतर्भूत असते. मार्शल आर्ट्ससारखी तंत्रे केवळ लढा देण्याची कला शिकवत नाहीत, तर संयम, शिस्त, मानसिक स्थैर्य आणि आत्मभानही विकसित करतात.

या प्रकरणात विविध स्व–संरक्षण पद्धती, त्यामागील तत्वज्ञान, शारीरिक–मानसिक क्षमतांचे संवर्धन आणि स्वसंरक्षणाचे मूलभूत तंत्र यांचा समावेश आहे. बालकांना सुरक्षित आणि सक्षम बनवण्यासाठी शाळा, पालक, शिक्षक आणि समाज यांनी प्रशिक्षणासची गरज ओळखून त्याची योग्य अंमलबजावणी करणे काळाची गरज आहे.

या प्रकरणाचा उद्देश मुलींना केवळ शारीरिक स्वसंरक्षण शिकवणे नसून त्यांच्यामध्ये आत्मविश्वास, सजगता आणि सशक्त निर्णयक्षमता निर्माण करणे आहे – जेणेकरून प्रत्येक मुली आपली सुरक्षितता स्वत: हातात घेऊ शकतील.

## ४.१) स्वसंरक्षण तंत्र

**शाळेतील मुलींच्या स्वसंरक्षणासाठी मुलींची भूमिका :** शाळेतील मुलींनी स्वत:च्या सुरक्षिततेसाठी जागरूक आणि सक्षम होणे गरजेचे आहे यासाठी त्यांनी पुढील गोष्टींचे पालन करावे.

### १) आत्मविश्वास आणि सतर्कता :

- कुठल्याही परिस्थितीत घाबरू नये आणि आत्मविश्वास ठेवावा.
- शाळेच्या परिसरात, बसमध्ये किंवा प्रवास करताना नेहमी सतर्क राहावे आणि एखादी व्यक्ती अथवा घटनेमुळे असुरक्षित वाटल्यास तात्काळ मदत घ्यावी.
- आपत्कालीन परिस्थितीत संदेश किंवा आवाज उठवण्याचे धाडस करावे.

## २) स्वसंरक्षण कौशल्ये आत्मसात करणे :

- स्वसंरक्षण (Self-defence) विषयक प्रशिक्षणात सहभागी होणे. उदा. कराटे, तायक्वांदो, मार्शल आर्ट इत्यादी.

## ३) सुरक्षित स्पर्श, असुरक्षित स्पर्श यांची ओळख :

- सुरक्षित स्पर्श, असुरक्षित स्पर्श यातील फरक ओळखणे.
- कुणीही गैरवर्तन केल्यास गप्प न राहता शिक्षक, पालक किंवा विश्वासू व्यक्तींना सांगणे.
- संकोच किंवा भीती न बाळगता मदतीसाठी पुढे येणे.

## ४) सोशल मीडिया आणि सायबर सुरक्षा :

- अनोळखी लोकांशी ऑनलाइन संवाद टाळावा आणि वैयक्तिक माहिती शेअर करू नये. कोणताही संशयास्पद मेसेज, फोटो किंवा व्यक्ती आढळल्यास पालक किंवा शिक्षकांना तात्काळ कळवावे.
- सायबर छळ झाल्यास (Cyber bullying) संबंधित हेल्पलाइन नंबरशी संपर्क साधावा.

## ५) आत्मरक्षणासाठी महत्त्वाच्या गोष्टी :

- हेल्पलाइन नंबर लक्षात ठेवणे :

  १) महिला हेल्पलाइन : १०९१

  २) पोलीस : १००

  ३) बालसुरक्षा हेल्पलाइन : १०९८
- स्वतः सोबत त्वरित मदतीसाठी पेपर स्प्रे किंवा अलार्म बाळगणे.
- आपत्कालीन परिस्थितीत जोरात ओरडून किंवा लोकांचे लक्ष वेधून मदत मागणे.

## ६) शाळेतील नियमांचे पालन करणे आणि सुरक्षा उपायांमध्ये सहभागी होणे :

- शाळेच्या सुरक्षा नियमांचे पालन करणे आणि जर काही त्रुटी आढळल्यास शिक्षक किंवा मुख्याध्यापकांना कळवणे.
- शाळेतील बालसुरक्षा समितीमध्ये (Child Protection Committee) सक्रिय सहभाग घेणे.
- शाळा, घर आणि प्रवास यामध्ये आपली सुरक्षितता कशी राखता येईल यावर विचार करून अभिव्यक्त होणे व गरजेनुसार कृती करणे.

## ७) धाडस आणि सामंजस्य :

- कोणत्याही प्रकारच्या छळाला घाबरून न जाता, योग्य लोकांकडे मदतीसाठी जाण्याची हिंमत ठेवणे.

- इतर मुलींनाही स्वसंरक्षण आणि सुरक्षिततेबाबत जागरूक करणे.
- एखादा मित्र किंवा मैत्रिणीला असुरक्षित वाटत असेल, तर त्याला/तिला आधार देणे आणि योग्य ठिकाणी मदत मिळवून देणे.

स्वसंरक्षणाच्या तंत्राकडे 'आक्रमणाची सज्जता' म्हणून न पाहता अंगचटीला येऊन हल्लेखोराच्या संभाव्य हल्ल्यांपासून स्वत:चा बचाव करण्याची पूर्वतयारी म्हणून पाहिले पाहिजे.

मनुष्याच्या केसापासून ते पायापर्यंत हल्ला करण्याची नाजूक भाग, मर्मस्थाने कोणती आहेत हे पाहून कोठे ठोसा अथवा फटका मारायची, इजा करायची याचा विचार करणे आवश्यक आहे.

### ४.१.१) शरीराची मर्मस्थाने व इजा :

आक्रमणकर्त्यांवर प्रतिआघात करता येतो. मानवी शरीराचे खूप भाग नाजूक आहेत. उदा. डोळे, नाक, कान, कानशील, मान, कंठ यांसारख्या मर्मस्थानांवर आघात झाल्यास होणाऱ्या वेदनांमुळे आक्रमणकर्ता नामोहरम होऊ शकतो, डोळ्यांवर केलेल्या आघातामुळे त्याला तात्पुरते किंवा कायमचे आंधळेपणा येऊ शकतो. नाकावरील आघातामुळे त्याच्या डोळ्यातून पाणी येते, झिणझिण्या येतात. कानांवर केलेले आघाताने कानातील पडद्याला इजा पोहोचते किंवा कानशिलावर मारल्यावरसुद्धा आक्रमणकर्त्याचा सुद्धा तोल जाऊ शकतो. कंठावर आघात केला तर असह्य वेदना होतात. मानेच्या मागे मणक्यावर आघात केल्यास जबरदस्त दुखापत होऊ शकते. हल्लेखोराला होणाऱ्या इजेचा विचार कधीही करू नये व आपला प्रतिकार करणे थांबवू नये.

तसेच शरीराच्या अंतर्गत भागात सुद्धा अनेक मर्मस्थाने आहेत. उदा. बरगडी, कॉलर बोन, पोटातील आतडी, किडनी, मूत्राशय, अंडाशय इत्यादी ठिकाणी आघात केल्यास अंतर्गत रक्तस्राव होतो, मोठ्या प्रमाणावर वेदना होतात व आक्रमण/अत्याचार करणारा नामोहरम होतो. आपल्या शरीरातील प्रत्येक सांधादेखील नाजूक असतो. या सांध्यांना त्यांच्या नैसर्गिक हालचालींच्या विरुद्ध दिशेला वळल्यास जीवघेण्या वेदना होतात.

### ४.१.२) स्वसंरक्षणाच्या पद्धती :

वरील पार्श्वभूमी लक्षात घेऊन अत्याचाराला प्रतिकार करण्यासाठी स्वसंरक्षणाचे डावपेच शिकावे व सातत्याने त्यांचा सराव करावा. स्वसंरक्षण करण्यासाठी पुढील गोष्टींची माहिती करून घेतली तर येणाऱ्या प्रसंगाला तोंड देता येईल.

#### ४.१.२.१) वार करणे :

आक्रमण/हल्ला होताना किंवा झाल्यावर त्वरित प्रति आक्रमण/प्रतिहल्ला करणे महत्त्वाचे असते. त्यासाठीची कृती सोपी व प्रभावी आहे आणि प्रात्यक्षिक अतिशय सोपे व उपयुक्त आहे. स्वसंरक्षणासाठी प्रत्येक वेळी काही साधन व हत्यार जवळ असतेच असे नाही. मात्र हात, बोटे,

तळहात व पाय यांसारख्या अवयवांचा शस्त्रासारखा वापर करून स्वत:चा बचाव करता येतो. मूठ, बोटे व तळहात या अवयवांद्वारे बचाव करण्याच्या पद्धती पुढे दिल्या आहेत.

## १) मूठ :

- **ठोसा :**

  हाताची मूठ घट्ट वळावी. वळलेल्या बोटांच्या मधल्या पेरावर बाहेरच्या बाजूला अंगठा वाकवून ठेवावा व चेहरा, छाती अथवा पोटात खाली ठोसा मारावा.





- **उलट्या मुठीचा ठोसा (बॅक फिस्ट) :**

  आकृतीत दाखवल्याप्रमाणे हाताची मूठ वळवावी व आघात करावा.

- **हातोड्यासारखी मूठ (हॅमर फिस्ट) :**

  हाताची मूठ वळून अंगठा वरच्या बाजूला असेल अशा स्थितीत करंगळीच्या बाजूने हातोड्यासारखा प्रहार करावा.




- **हातोड्यासारखी उलटी मूठ (रिव्हर्स हॅमर फिस्ट) :**

  आकृतीप्रमाणे हाताची मूठ वळून अंगठ्याच्या बाजूने हातोड्यासारखा प्रहार करावा.



## २) बोटे :

- **प्राणी, पक्षी यांच्या पंजासारखा बोटांचा वापर (क्लो हँड स्ट्राइक) :**



पंजाने बोचकारणे किंवा नरडी पकडणे. हाताची चारही बोटे एकत्र करून आतल्या बाजूला वळवावी व बोटे व अंगठा यांचा एकत्रित चिमट्यासारखा वापर करावा. अशा पद्धतीने कंठ पकडता येतो व कंठावर आघात करता येतो.

## ३) तळहात :



- **तळहाताची कड (नाइफ एज/चॉप) :**

हाताची बोटे चिकटवून अंगठा किंचित वाकवून करंगळी ते मनगट यांमधला पंजाचा भाग ताठ करावा. हा भाग शस्त्रासारखा वापरता येतो. असा वार उजवीकडून डावीकडे करताना तळहात वरच्या बाजूला असतो.

- **तळहाताची कडेची आतील बाजू (इनसाइड नाइफ एज) :**



नाइफ एजप्रमाणे हाताची स्थिती असावी. फक्त तळहात खालच्या बाजूला ठेवावा. आपला उजवा हात असेल, तर डाव्या खांद्यापासून फिरवून प्रतिस्पर्ध्याच्या उजव्या बाजूवर वार करावा.



- **तळव्याने प्रहार करणे (हिल ऑफ हँड स्ट्राइक) :**

तळव्याच्या खालील भागाने आघात करावा. त्यावेळी बोटे जास्तीत जास्त मागे ठेवावीत.

- **तळव्याने आघात करणे (पाम हँड स्ट्राइक) :**



आकृतीत दाखवल्याप्रमाणे हाताच्या तळव्याने आघात करावा. हाताचे तळवे थोडेसे वाकवून कानावर दोन्ही हात एकसाथ ठेवून कानावर मारा करावा.



### ४.१.२.२) वार अडवणे :

वार अडवताना मनुष्याचे हात प्रतिक्षिप्त क्रियांप्रमाणे पुढे येतात व वार अडवले जातात, परंतु योग्य व शास्त्रीय पद्धतीने जर वार अडवले, तर त्यासाठी कमीत कमी ताकद लावून वार अडवले जाऊ शकतात.

#### १) वरच्या बाजूला वार अडवणे (अप्पर ब्लॉक) :

आक्रमणकर्त्याने वरून केलेल्या आघाताला हाताच्या पंजा उघडा ठेवून अडवावे. त्यावेळी उजवा किंवा डावा हात वेगाने डोक्यापासून ५–६ इंच वर उचलावा व वार अडवताना आक्रमण कर्त्याच्या मनगटापाशी आपला हात न्यावा. बचाव करताना हाताने मनगट पकडण्याचा प्रयत्न करावा. हाताच्या मुठीत किंवा मुठीनेसुद्धा असा आघात अडवता येतो.



#### २) मध्ये वार अडवणे (मिडल ब्लॉक) :

चेहऱ्यावर किंवा छातीवर केलेल्या वाराला हात चेहऱ्यापर्यंत वर घेऊन कोपरामधून वाकवून होणाऱ्या आघाताची दिशा बदलावी. म्हणजे आघातामधील ताकदीची दिशा बदलली जाते.





#### ३) खालच्या बाजूला वार अडवणे (लोअर ब्लॉक) :


आक्रमणकर्त्याने शस्त्राने पोटावर केलेला वार आकृतीत दाखवल्याप्रमाणे अडवावा. त्यासाठी आपला एक हात दुसऱ्या हाताच्या खांद्यापासून जोराने खालच्या बाजूला घ्यावा व केलेल्या आघाताची दिशा बदलावी. चाकूचे आकारमान किती आहे त्यावरून ठरेल.



### ४) दोन्ही हातांनी वार अडवणे (बोथ हँड लॉक) :



आक्रमणकर्त्याने वरून किंवा खालून केलेला हाताचा वार आपल्या दोन्ही हातांनी अडवावा. आपले दोन्ही हात मनगटाजवळ क्रॉस करून तयार होणाऱ्या बेचक्यात समोरच्याचे वार अडवावे. चाकूचे आकारमान किती आहे त्यावरून ठरेल.




## ४.१.२.३) प्रतिस्पर्ध्यावर ताबा मिळवणे :

हाताचे मनगट विशिष्ट तऱ्हेने वाकवून प्रतिस्पर्ध्यावर सहजगत्या ताबा मिळवता येतो.

### १) आक्रमकाचा पंजा पकडणे (वन हँड आउटसाइड रिस्ट लॉक) :

आपली बोटे व अंगठा यांच्या साहाय्याने आक्रमकाच्या हाताच्या वरच्या भागावर म्हणजे तळहाताच्या विरुद्ध बाजूस पकडून बाहेरच्या बाजूस आक्रमकाच्या मनगटाचा सांधा वाकवावा.






### २) मनगटातून हात वाकवणे (वन हँड इनसाइस रिस्ट लॉक) :

आक्रमकाच्या बोटांच्या बाजूने त्याचा पंजा पकडावा. आपली बोटे आत आक्रमकाच्या तळहातावर व अंगठा आक्रमकाच्या हाताच्या बाहेरच्या भागावर पकडून हात खाली घेत आक्रमकाचा तळहात आकाशाकडे करत आतील बाजूस आक्रमकाच्या मनगटाचा सांधा वाकवावा.







### ३) मनगटातून हात बाहेर वाकवणे (टू हँड आउटसाइड रिस्ट लॉक) :

आपली बोटे आत व अंगठा आक्रमकाच्या हाताच्या वरच्या भागावर म्हणजे तळहाताच्या विरुद्ध बाजूस पकडावा. मनगटाचा सांधा बाहेरच्या बाजूला वाकवण्यासाठी दुसऱ्या हाताची मदत घ्यावी.

आक्रमणकर्त्याच्या उजव्या हाताला आपल्या डाव्या हाताने वरून पकडावे आणि आक्रमकाच्या मनगटाचा सांधा बाहेरच्या बाजूला वाकवावा.




### ४) दोन्ही हातांनी मनगट वाकवणे (टू हँड इनसाइड रिस्ट लॉक) :


आक्रमकाच्या बोटांच्या बाजूने त्यांचा पंजा पकडावा. आपली बोटे आत व अंगठा आक्रमकाच्या हाताच्या वरच्या भागावर असावा. मनगटाचा सांधा आतल्या बाजूला वाकवण्यासाठी दुसऱ्या हाताची मदत घ्यावी. आक्रमणकर्त्याच्या उजव्या हाताला आपल्या उजव्या हातानेच पकडावे.

### ५) मनगटातून हात खाली वाकवणे (डाउनवर्ड रिस्ट लॉक) :

आक्रमणकर्त्याने जर आपली कॉलर/गळा पकडला असेल, तर दोन्ही हातांनी त्याचे मनगट घट्ट पकडून ते समोर व खालच्या बाजूला वाकवावे.









### ६) दोन्ही हात पकडल्यानंतर किंवा एक हात पकडल्यानंतर :

हात आतील बाजूने किंवा बाहेरील बाजूने फिरवून आक्रमणकर्त्याच्या हाताला आतल्या बाजूने दाबावे म्हणजे हाताची पकड सुटेल.





## ४.१.२.३) सुरक्षित पद्धतीने खाली पडणे :

अनेकदा बचाव करताना ताकद कमी असल्यामुळे, अडखळल्यामुळे वा आक्रमणकर्त्याने ढकलल्यामुळे किंवा अन्य कारणाने बचावकर्ता खाली जमीनीवर पडू शकतो, मात्र पडण्याचे तंत्र माहीत असेल तर खाली पडताना होणारी दुखापत टाळता येईल किंवा दुखापतीची तीव्रता कमी करता येईल.


१) पुढे पडणे

२) पाठीमागे पडणे


३) पुढे कोलांटी उडी मारून पडणे

## १) पुढे पडणे (फॉरवर्ड ब्रेकफॉल) :

- सरळ उभे रहावे. दोन्ही पायांच्या टाचा हळूहळू उचलून पुढे तोल घालवावा.




- पडत असताना दोन्ही हातांचे पंजे उघडून जमिनीकडे वळवून हातांचा फक्त पंजापासून कोपरांपर्यंतचा भाग टेकवावा. तोंड, छाती व पोट यांचा जमिनीला स्पर्श होऊ देऊ नये.




- जमिनीवर दोन्ही हात ९० अंशाइतके वाकलेले असावेत.

**महत्त्वाचे मुद्दे :**

- डोके वर ठेवावे. जमिनीवर आपटू देऊ नये.
- जमिनीवर हात टेकवण्याच्यावेळी ते जोरात आपटावेत. त्यामुळे निर्माण होणारा हादरा सर्व शरीरात विभागला जातो.

## २) मागे पडणे (बॅकवर्ड ब्रेकफॉल) :

- ताठ उभे राहून दोन्ही हातांचे पंजे उघडून दोन्ही हात जमिनीला समांतर समोर धरावे.
- हळूहळू खाली बसायला लागावे. त्यावेळी दोन्ही हात आतल्या बाजूस वाकवून हनुवटी छातीला टेकवावी व अंदाज घेत जमिनीपासून साधारणपणे एक फुटावर आल्यानंतर शरीर पाठीमागे झोकून द्यावे.



(१) (२)



(३) (४)


- पडत असताना सुरुवातीला पृष्ठभाग, मग कंबर व पाठ या क्रमाने शरीराचे भाग जमिनीवर टेकवावेत. त्या सुमारास दुमडलेले दोन्ही हात समोर उचलावेत व दोन्ही पायदेखील सरळ करून वर उचलावेत.

**महत्त्वाचे मुद्दे :**


- डोके थोडे वर ठेवावे, म्हणजे जमिनीवर आपटणार नाही.
- खाली बसताना जोरात हिप्स आपटतील असे बसू नये.

## ३) पुढे कोलांटी उडी मारून पडणे (फॉरवर्ड रोलिंग) :

- सरळ उभे राहून कोणतेही एक पाऊल जमिनीवर पुढे टाकावे. पावलाच्या विरुद्ध हात जमिनीवर टेकवावा. दुसरा हात टेकवलेल्या हाताच्या व पावलाच्या मधून न्यावा व त्याच हाताचा खांदा जमिनीवर टेकवून सुरक्षित खाली पडावे.



(१) (२) (३)



(४) (५)


- सुरुवातीला हाताचा पंजा, नंतर कोपर, त्यानंतर खांदे, पाठ व कंबर याप्रमाणे संपूर्ण बाजू वर्तुळाकार टेकवत कोलांटी उडी मारावी.
- चित्रात दाखवल्याप्रमाणे उजव्या पायाची करंगळी व टाच यांमधील कड व त्याच्या शेजारी डाव्या पायाचा तळवा लांब टेकवावा. याच वेळी डावा हात पोटाजवळ घ्यावा व उजवा हात वर्तुळाकार गती घेऊन फिरवून शरीरापासून अंदाजे ४५ अंशावर जोरात आपटावा.

**महत्त्वाचे मुद्दे :**

- या कोलांटी उडीचा डाव्या व उजव्या बाजूने सराव करावा.
- पडत असताना खांदाच टेकवावा. मान टेकवू नये.

### ४) बाजूला कुशीवर पडणे (साईड फॉल) :

- सुरुवातीला डावा हात व डावा पाय पुढील बाजूने उजवीकडे न्यावा.
- उजव्या पायावर हळूहळू बसावयास सुरुवात करावी त्यावेळी उजवा हा पोटाची धरावा व हनुवटी उजव्या खांद्याला टेकवावी आणि डावीकडे स्वतःचा तोंड घालवावा.




- मागे पडतेवेळी प्रमाणेच सुरुवातीला कमर व मग पाठ या क्रमाने शरीराचे भाग टेकवावे व ४५ अंशामध्ये डाव्या हाताचा पंजा व संपूर्ण हात गादीवर जोरदार आपटावा

**महत्त्वाचे मुद्दे :**

१) डावा हात व पाय उजवीकडे जास्त जास्त नेल्याबरोबर आपण डावीकडे आपोआप पडतो.

२) कडेला पडावयाचे असल्यामुळे शरीर वळवून पाठीवर पडू नये कडेलाच पडावे.

३) याप्रमाणेच बरोबर उलट क्रिया करून उजवीकडे पडावे याप्रमाणे दोन्ही बाजूंनी पडायची सवय करावी.

## ४.२) प्रसंग व सुटका

### प्रसंगानुरूप सुटका करून घेण्याचे काही प्रकार


हाताचे मनगट विशिष्ट तऱ्हेने वाकवून प्रतिस्पर्ध्यावर सहजगत्या ताबा मिळवता येतो. याला फारशी ताकद लागत नाही. मात्र स्वसंरक्षण करताना सर्व हालचाली अतीशय जलदगतीने कराव्या लागतात

अन्यथा प्रतिस्पर्धा सावध होऊन अंग चोरून घेतो. किरकोळ दिसणाऱ्या गोष्टींचा सातत्याने सराव केला तरच स्वसंरक्षण करताना जलद व प्रभावी हालचाली होऊ शकतात.


घडलेल्या घटनांवरून आक्रमणकर्ता कोणकोणत्या पद्धतींनी आक्रमण करतो हे लक्षात येते. उदा., हात पकडणे, खांद्यावर हात ठेवणे, कमरेत हात टाकणे, पुढून मिठी मारणे, मागून मिठी मारणे, गळा पकडणे इत्यादी. अशा आक्रमणाच्या वेळी स्वतःची सुटका करून घेण्याच्या काही पद्धती पुढे दिल्या आहेत.

### १) मागून कमरेला मिठी मारली असता :

- उजव्या किंवा डाव्या हाताची मूठ वळल्यानंतर अनामिका, मधले बोट यांची जी हाडे आहेत, ती आक्रमणकर्त्याच्या तळहाताच्या मागील बाजूस पंजावर दाबून ठेवून खाली–वर रगडावी. रगडणे सहन न झाल्यास मिठी सुटते. किल्ली व मोबाइलचाही अशा वेळी उपयोग करता येतो किंवा नखाने ओरबडावे व डोक्याच्या मागच्या बाजूने हनुवटी व नाकावर प्रहार करावा.



- उजवा किंवा डावा पाय समोर उचलून जोरात आक्रमणकर्त्याला गुडघ्यावर मारावा व आक्रमणकर्त्याच्या खालच्या संवेदनशील (अवघड) भागावर मारावा. बचावकर्त्याने पायाला चौडा न वापरता टाचेने प्रहार करावा.



- उजवा किंवा डावा पाय उचलून नडगीला घासून टाच आक्रमणकर्त्याच्या पायाच्या पंजावर मारावी व आक्रमणकर्त्याच्या खालच्या संवेदनशील (अवघड) भागावर मारावा.



- कोपर आक्रमणकर्त्याच्या बरगडीत किंवा चेहऱ्यावर मारावे.



- डोके डाव्या बाजूला करून उजव्या मुठीचा वार आक्रमणकर्त्याच्या नाकावर करावा.



- कमरेतून डाव्या किंवा उजव्या बाजूला सरकून उजव्या किंवा डाव्या पायाने आक्रमणकर्त्याच्या अवघड जागी मारावे.
- थोडे पुढे झुकून मागे असलेल्या आक्रमणकर्त्याच्या नाकावर डोके मारावे.

### २) मागून मान पकडली असता :

- आक्रमणकर्त्याने डाव्या हाताने मागून मान पकडली, तर आक्रमणकर्त्याच्या पायावर स्टँप करावा.
- उजव्या हाताने कोपर बरगडीत मारावे व त्याने ज्या हाताने गळा पकडला असेल त्या बाजूच्या हाताने जमल्यास त्याचे केस ओढावे.



### ३) उजवा हात कमरेवर ठेवला असता :

- आक्रमणकर्त्याच्या उजव्या हातावरून डावा हात फिरवून लॉक करावा व उजव्या हाताने त्याची हनुवटी मागे ढकलावी.
- आक्रमणकर्त्याच्या नाकावर तळहाताने मारावे.
- किंवा उजव्या हाताची बोटे डोळ्यात घालावी.



(१)



(२)



(३)



(४)

- किंवा उजव्या हाताने कानशिलावर मारावे.
- किंवा नाक व ओठांच्या मधल्या जागेत उलट्या चॉपने हल्ला करावा. त्याचबरोबर गुडघा अवघड जागी मारावा. याच पद्धतीने दुसऱ्या हाताने कृती करावी.

### ४) पुढून कमरेला मिठी घातली असता :

- दोन्ही तळहात एकाच वेळी त्वेषाने आक्रमणकर्त्याच्या कानावर मारावेत किंवा तळहातांचे कप करून मारावे.



- **थंब एज :** अंगठ्याच्या बाजूने उलटी मूठ करून आक्रमणकर्त्याच्या कानशिलांवर त्वेषाने एकाच वेळी दोन्ही हाताने मारावे.





- उजवा पाय उचलून तळपायाने आक्रमणकर्त्याच्या डाव्या गुडघ्यावर आघात करावा. याच पद्धतीने डाव्या पायानेही आघात करता येतो.



- उजवा किंवा डावा पाय आक्रमणकर्त्याच्या नडगीला घासत टाचेचा आघात उजव्या किंवा डाव्या पायाच्या पंजावर करावा.
- उजवा किंवा डावा गुडघा आक्रमणकर्त्याच्या अवघड जागी मारावा.
- **क्लो हँड :** हाताची चारही बोटे एकत्र करून आपल्या बाजूला वळवावीत. बोटे व अंगठा यांचा वापर करून आक्रमणकर्त्याचा कंठ पकडावा.





- एका तळहाताच्या गादीने किंवा दोन्ही हातांनी आक्रमणकर्त्याच्या हनुवटीला मागे त्वेषाने ढकलावे.




- आक्रमणकर्त्याच्या डोळ्यांत बोटे घालावी किंवा तळहाताने आक्रमणकर्त्याच्या नाकावर/कानांवर जोरात मारावे.





## ५) पुढील बाजूने वर उचलले असता :


आक्रमणकर्त्याने पुढील बाजूने कमरेला पकडून वर उचलले तर शरीराची कुठल्याही भागाची हालचाल करता येत नाही, परंतु दोन्ही हात मोकळे असतात, त्या दोन्ही हातांचे कप करून आक्रमणकर्त्याच्या कानांवर एकाच वेळी त्वेषाने मारावे किंवा थंब एज करून मारावे.



## ६) समोरून गळा पकडला व मारले असता :

आक्रमणकर्त्याने समोरून डाव्या हाताने गळा पकडून उजव्या हाताने वार केला असता अप्पर ब्लॉकचा वापर करून डाव्या हाताने आक्रमणकर्त्याचा उजवा हात वर ब्लॉक करावा. उजव्या

हाताने त्याच्या डाव्या हाताला आऊट रिस्ट लॉक करून ब्लॉक केलेल्या हाताने त्याचा क्लो हँडद्वारे गळा (कंठ)पकडावा.






## ७) भिंतीपाशी किंवा लिफ्टमध्ये जखडले असता :

भिंतीपाशी किंवा लिफ्टमध्ये आक्रमणकर्त्याने दोन्ही खांदे पकडून जखडले असता दोन्ही हातांनी मिडल ब्लॉक करावा. आक्रमणकर्त्याच्या हातामधून हात घेऊन बाहेरच्या बाजूला त्याचे हात ढकलावे. त्याच वेळी आपला गुडघा आक्रमणकर्त्याच्या अवघड जागी मारावा. त्यानंतर दोन्ही हातांनी आक्रमणकर्त्याच्या मानेवर चॉप मारावा.



## ८) भिंतीपाशी किंवा लिफ्टमध्ये जखडले असता :

डाव्या हाताने इनसाइड रिस्ट लॉक करून, गुडघा अवघड जागी मारावा व हाताने बरगडीवर नकल पंच मारावे.



(१)




(२)



(३)

पुढील काही आकृत्यांमध्ये नकल पंच कसा मारावा हे आपल्याला कळेल.





## ९) बागेत बाकावर बसले असता :

आक्रमणकर्ता बागेत शेजारी येऊन बसला व मांडीवर हात ठेवला, तर ज्या मांडीवर हात ठेवला त्याच हाताने इनसाइड रिस्ट लॉक करून पटकन उठून दुसऱ्या हाताने आक्रमण करणाऱ्याची हनुवटी ढकलावी किंवा तळहाताने स्टँप करावा.

(१)



(२)



(३)



(४)



## १०) आक्रमणकर्त्याने हाताने गळा/कॉलर पकडली तर :

आक्रमणकर्त्याने डाव्या हाताने गळ/कॉलर पकडली, तर उजव्या हाताने आक्रमणकर्त्याचे मनगट पकडून कोपरापर्यंतचा हात आक्रमणकर्त्याच्या कोपरावर दाबावा व सुटका करून घ्यावी.


(१)



(२)




(३)




## ११) ऑफिसमध्ये काम करत असताना :

ऑफिसमध्ये काम करत असताना आक्रमणकर्त्याने बाजूला उभे राहून खांद्यावर हात ठेवल्यास आपला डावा हात आक्रमणकर्त्याच्या उजव्या हातावरून गोल फिरवून लॉक करावा. त्याचक्षणी उभे राहून उजव्या हाताने त्याची हनुवटी मागे ढकलावी व गुडघा अवघड जागी मारावा.

(१)



(२)



(३)



ऑफिसमध्ये काम करत असताना टेबलाच्या पलीकडून जर आक्रमणकर्त्याने कपड्यांना हात घातला, तर डाव्या हाताने आउटसाइड रिस्ट लॉक करून पटकन उभे राहावे व परिस्थितीनुरूप जवळ असलेली वस्तू फेकून मारावी.



## ४.३) जवळच्या वस्तूंचा सुटकेसाठी उपयोग :
## स्वसंरक्षणासाठी आपल्या जवळच्या वस्तूंचा उपयोग

स्त्रीला प्रत्येक वेळी शस्त्र बाळगणे शक्य नाही; परंतु प्रत्येक स्त्रीकडे तिच्या ज्या वैयक्तिक वस्तू असतात, त्यांचा वापर करून प्रसंगानुरूप सुटका करून घेणे शक्य होते. अशा वस्तू म्हणजे किल्ली, पेन, पेन्सिल, छत्री, डबा, पर्स इत्यादी. या वस्तूंचा वापर करून स्वत:च्या सुटकेसाठी प्रतिआक्रमण कसे करावे व वरील वस्तूंचा शस्त्र म्हणून कसा उपयोग करावा हे पुढे दिले आहे.

### १) आक्रमणकर्त्याने पुढून कमरेला मिठी घातली किंवा गळा पकडला :

अशा वेळी एका हातात असलेली छत्री वर घेऊन दुसऱ्या हाताने पकडून दोन्ही हातांनी धरून आक्रमणकर्त्याच्या नाकावर मारावी.




### २) समोरून दोन्ही हातांनी गळा किंवा खांदे पकडले असता :

छत्री एका हातामधून दोन्ही हातांत धरून हँडलच्या विरुद्ध असलेल्या बाजूने आक्रमणकर्त्याच्या हनुवटीखाली कंठावर आघात करावा व लगेच छत्री फिरवून उजव्या हातातील हँडल आक्रमणकर्त्याच्या डाव्या कानशिलावर मारावे.



### ३) उभे असताना आक्रमणकर्त्याने आपल्या डाव्या खांद्यावर हात ठेवला असता :

उजव्या हातातील छत्रीने चेहऱ्यावर आघात करावा किंवा त्याच्या चेहऱ्यासमोर छत्री उघडावी व उजव्या पायाच्या गुडघ्याने अवघड जागी मारावे.



### ४) मागून मिठी घातल्यास :


पुढे आलेल्या आक्रमणकर्त्याच्या हातांवर किल्ली रगडली तर सहज सुटका करून घेता येते. याच पद्धतीने **पेन्सिल,** पेन यांचा वापर करता येतो.



### ५) पुढून गळा किंवा खांदे पकडले तर :

पेन, पेन्सिल, कंगवा यांचा वापर करता येतो. आक्रमणकर्त्याच्या डोळ्यांमध्ये पेन, पेन्सिल खुपसल्यास किंवा नाकावर कंगवा त्वेषाने फिरवल्यास आक्रमणकर्त्यापासून सुटका होऊ शकते. तसेच पेन/कंगवा घट्ट धरून वार केल्यास देखील सुटका होऊ शकते.





वरीलप्रमाणे स्वसंरक्षणाची तंत्रे वापरून मुली स्वत:चे संरक्षण करू शकतात.

❖❖❖

# ५. बालसुरक्षेचे मानसिक व सामाजिक पैलू आणि बालकांचे शोषण

**प्रस्तावना :**

महिला व बाल कल्याण विकास मंत्रालयाने २००७ साली राष्ट्रीय संशोधन सर्वेक्षण प्रकाशित केले त्यानुसार बालकांच्या शोषणाचा व त्यांच्याशी गैरवर्तन/अत्याचार केले जाण्याच्या ४०% घटना या ५ ते १२ वयोगटातील बालकांशी निगडित आहेत. त्या अत्याचारांमध्ये प्रामुख्याने शारीरिक, लैंगिक मानसिक, भावनिक अत्याचारांचा समावेश होतो. या संशोधनाच्या अभ्यासानुसार असे दिसून आले की ५०% घटनांत शोषण करणारी व्यक्ती ही बालकाच्या विश्वासातील आणि संगोपनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण व्यक्ती असते.

सद्य:स्थितीत बालकांना विविध प्रकारच्या शोषणाला सामोरे जावे लागत आहे. अनेक ठिकाणी पालक, शिक्षक मुलांना शारीरिक शिक्षा करतात. जाती-धर्मांच्या भेदभावामुळे अनेक बाबींपासून मुले वंचित राहतात. मुलींना जन्मापूर्वी किंवा जन्मानंतर जीवे मारणे, मुलामुलींची कुटुंबात, समाजात अवहेलना करणे, त्याचबरोबर बालविवाह, लैंगिक शोषण व अन्य विविध प्रकारच्या शोषणाला बालकांस सामोरे जावे लागते. अशा घटनांना बळी पडलेली बालके तुमच्या शाळेतही असू शकतात. बहुतेक समाजांत असा समज झालेला आहे की, बालके ही पालकांची खाजगी संपत्ती आहे. स्वत:चे विचार मांडणे, चांगल्या-वाईटाची निवड करणे, स्वत:चे निर्णय घेणे या क्षमता लहान बालकांमध्ये नसतात, असा समज आहे. त्यांना समजून घेऊन मदत करण्याऐवजी त्यांच्यावर मोठ्यांचे विचार लादले जातात. बालक अत्याचारास सामोरे जाते, मात्र त्या अत्याचारांना विरोध करण्यास ते समर्थ नसते. बालकाच्या संगोपनात त्याच्या विश्वासातील, अधिकारस्थानी असलेल्या एखाद्या व्यक्तीकडून आरोग्य, अस्तित्व, विकास आणि आत्मसन्मानाला प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष धोका निर्माण होतो त्याला बालशोषण म्हटले आहे.

कोणताही धर्म, वय, वंश, लिंग वा सामाजिक आर्थिक स्तरातील बालक हे शोषणाला व अवहेलनेला बळी पडू शकते. विविध कारणांमुळे आपल्या समाजातील दुर्बल आणि नाजूक घटकांमध्ये बालकांचा समावेश होतो. बालकांचे सबलीकरण करण्यासाठी आणि शोषणाच्या विविध प्रकारांपासून त्यांचे रक्षण करण्यासाठी त्यांना अधिकार देण्यात आले आहेत. त्यासाठी आपण बाल शोषणाचे प्रकार व स्वरूप जाणून घेऊ.

## ५.१) बाल सुरक्षेचे मानसिक व सामाजिक पैलू :

शाळांमध्ये मुलांची शारीरिक सुरक्षितता जशी महत्त्वाची आहे, तशीच मानसिक सुरक्षिततादेखील महत्त्वाची आहे. हिंसाचाराचे बळी ठरलेली मुले, तसेच हिंसाचार पाहणारी मुले पोस्टट्रॉमॅटिक स्ट्रेस डिसऑर्डर (PTSD) ची सतत लक्षणे दाखवतात. या लक्षणांमध्ये नैराश्य, विघटनशील प्रतिक्रिया आणि असहाय्यतेची भावना, स्वतःच्या भावनांवर नियंत्रण नसणे, आक्रमकता, अनाहूत विचार आणि फ्लॅशबॅक यांचा समावेश आहे.

मानसिक–सामाजिक गैरवर्तनाचा प्रकार मुलाच्या स्वतःच्या आणि वैयक्तिक सुरक्षिततेच्या भावनेला नष्ट करतो. शारीरिक शिक्षा मुलाच्या स्वातंत्र्य आणि स्व प्रतिष्ठेला धक्का पोहोचवते, मुलाच्या शैक्षणिक प्रवाहात अडथळा निर्माण करते. शारीरिक शिक्षेच्या भीतीमुळे मुले शाळा टाळण्याची किंवा पूर्णपणे शाळा सोडण्याची शक्यता वाढते. शारीरिक शिक्षा ही सन्मानाने जगण्याच्या अधिकाराचे उल्लंघन करणारी आहे.

शाळेने विद्यार्थ्यांना योग्य वातावरण प्रदान करावे जेणेकरून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा संपूर्ण विकास होईल आणि त्यांच्या प्रतिभेचा विकास आणि समृद्धी होईल. निर्भय वातावरणात सर्जनशील मानव विकसित करण्यासाठी शाळा व शिक्षकांना शारीरिक शिक्षेऐवजी पर्यायी धोरणे अवलंबण्यास प्रोत्साहित करणे गरजेचे आहे.

### १) शारीरिक शिक्षा :

बालकाच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क कायदा २००९ च्या तरतुदींनुसार, शारीरिक शिक्षा ही शारीरिक शिक्षा, मानसिक छळ किंवा भेदभाव म्हणून ओळखली जाऊ शकते. लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायद्यानुसार शारीरिक शिक्षेमध्ये सर्व प्रकारचे लैंगिक गुन्हे समाविष्ट असतील. याचा अर्थ असा की जर कायदा, २०१२ आणि (सुधारणा) कायदा, २०१९ मध्ये परिभाषित केलेले लैंगिक शोषणाचे कृत्य एखाद्या मुलावर शारीरिक शिक्षेचे साधन म्हणून केले गेले तर, कायदा, २०१२ आणि (सुधारणा) कायदा, २०१९ च्या उल्लंघनाच्या तरतुदी देखील गुन्हेगाराविरुद्ध लागू होतील.

'शारीरिक शिक्षा' म्हणजे अशी कोणतीही कृती जी मुलाला वेदना, दुखापत आणि अस्वस्थता निर्माण करू शकते ज्यामध्ये हाताने किंवा काठीने/काठीने मुलाला शारीरिक इजा करणे, मुलांना अस्वस्थ करणारी स्थिती धारण करण्यास भाग पाडणे, उदा. बेंचवर उभे राहणे किंवा पायांनी कान धरणे, वर्गात, ग्रंथालयात किंवा शाळेतील कोणत्याही बंद जागेत डांबणे इ.

'मानसिक छळ' म्हणजे मुलाच्या मानसिक आरोग्यासाठी हानिकारक असलेली कोणतीही शारीरिक नसलेली वागणूक उदा. मुलाची प्रतिष्ठा दुखावणारी किंवा कमी करणारी व्यंगचित्रे, अपमानास्पद विशेषणे वापरून नावे ठेवणे आणि शिवीगाळ करणे, धमकावणे, मुलावर अपमानास्पद टिप्पणी करणे, बालकाच्या कौटुंबिक पार्श्वभूमीवर किंवा पालकांच्या व्यवसायावर मुलाची थट्टा करणे, शिक्षकांच्या शैक्षणिक कामगिरीच्या अपेक्षा पूर्ण करण्यात अक्षमतेमुळे वर्गात मुलाला कमी लेखणे इ.

'भेदभाव' म्हणजे कोणत्याही बालकाच्या जाती, लिंग, व्यवसाय किंवा प्रदेशामुळे आणि शुल्क न भरल्यामुळे किंवा शिक्षण हक्क कायदा, २००९ अंतर्गत वंचित गटांना किंवा समाजातील कमकुवत घटकांना २५% आरक्षणाअंतर्गत प्रवेश मिळालेला विद्यार्थी असल्याने त्याच्याबद्दल

पूर्वग्रहदूषित दृष्टिकोन आणि वर्तन. ते सुप्त, प्रकट, उघड किंवा सूक्ष्म असू शकते. त्यात खालील गोष्टींचा समावेश आहे परंतु हे तेवढ्यापुरते मर्यादित नाही.

१) विशिष्ट सामाजिक गट किंवा लिंग किंवा क्षमता/अपंगत्वाविरुद्‌ध कमी लेखून सामाजिक दृष्टिकोन आणि समुदायाचे पूर्वग्रह शाळेत आणणे.

२) जात, समुदाय किंवा लिंग इ. पूर्वग्रहांवर आधारित शाळांमध्ये वेगवेगळ्या जबाबदाऱ्या देणे आणि बसण्याची व्यवस्था करणे.

३) जात किंवा समुदायाच्या पूर्वग्रहांवर आधारित शैक्षणिक क्षमतेवर भाष्य करणे.

४) जात, समुदाय, धर्म किंवा लिंगाच्या आधारावर मुलाला किंवा मुलांच्या गटाला मध्यान्ह भोजन किंवा ग्रंथालयाची पुस्तके, गणवेश किंवा क्रीडा सुविधा नाकारणे.

५) जाणूनबुजून दुर्लक्ष करणे.

बालशिक्षण हक्क कायद्याच्या कलम ८ आणि ९ मध्ये सर्व संबंधितांवर हे सुनिश्चित करण्याचे कर्तव्य आहे की दुर्बल घटकातील किंवा वंचित गटातील कोणत्याही मुलाशी भेदभाव केला जाणार नाही. कोणत्याही कारणास्तव प्राथमिक शिक्षण घेण्यापासून आणि पूर्ण करण्यापासून रोखले गेले. मानव संसाधन विकास मंत्रालय, शालेय शिक्षण आणि साक्षरता विभागाने शिक्षण हक्क कायद्याच्या कलम ८ आणि ९ च्या अंमलबजावणीसाठी तपशीलवार मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. ज्यात इतर गोष्टींबरोबरच असे म्हटले आहे की–

१) शाळेतील सर्व व्यक्ती आणि अधिकाऱ्यांना दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील कोणत्याही मुलाला त्रास देण्यास किंवा त्यांचा छळ करण्यास शाळा प्रतिबंधित करेल.

२) वर्गात तोंडी किंवा अन्य मार्गाने विद्यार्थ्यांच्या समुदायाची, जातींची किंवा जमातींची नावे घोषित करू नयेत.

३) अशा विद्यार्थ्यांना वर्गात राखीव श्रेणी म्हणून लेबल करू नये.

४) वर्गात कामगिरी कमी असल्याचे कारण म्हणून सामाजिक, आर्थिक किंवा इतर पार्श्वभूमी दर्शविणारी अपमानास्पद टिप्पणी करू नये.

५) अशा विद्यार्थ्यांना शिक्षकांना भेटण्यासाठी इतर विद्यार्थ्यांपेक्षा वेगळा वेळ देऊ नये.

६) खेळ आणि इतर सुविधा वापरताना त्यांना वेगळे करू नये.

### २) धमकावणे आणि वेगळे करणे :

धमकी देणे हे थेट धमकी देणाऱ्याकडून पीडितापर्यंत असू शकते (उदा. शारीरिक धमकी किंवा हल्ले, शाब्दिक गैरवर्तन, मालमत्तेचे नुकसान) किंवा ते अप्रत्यक्ष असू शकते (उदा. दुर्भावनापूर्ण अफवा पसरवून). त्यात सायबर–गुंडगिरी (उदा., पीडिताला किंवा इतरांना अप्रिय

एसएमएस संदेश, छायाचित्रे किंवा ईमेल पाठवणे) देखील समाविष्ट असू शकते. ज्याला धमकी दिली जाते त्याच्यावर गंभीर हानिकारक परिणाम होतात. त्याचे परिणाम तात्कालिक किंवा दीर्घकालीन देखील असू शकतात. प्रत्येक धमकीच्या परिस्थितीत, सामान्यतः तीन प्रमुख पक्ष असतात : पीडित, धमकी देणारा किंवा धमकी देणारे. या तिन्ही पक्षांपैकी प्रत्येकावर धमकीचा नकारात्मक परिणाम होतो. धमकी आणि रॅगिंगच्या कोणत्याही अनिष्ट प्रकाराला रोखण्याची जबाबदारी शाळेतील प्रत्येक घटकाची वैयक्तिक व सामुदायिक जबाबदारी आहे. ज्यामध्ये संस्थेचे प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक आणि स्थानिक समुदाय यांचा समावेश आहे. शाळांमध्ये गुंडगिरीच्या समस्येला पद्धतशीर रोखणे आवश्यक आहे.

**शाळांमध्ये छळ आणि रॅगिंग रोखण्यासाठी मार्गदर्शक तत्वे, नियम : (डी.ओ. क्र.१२-१९/२०१२-आरएमएसए-आय) सीबीएसई हे शाळा विचारात घेऊ शकतील. या मार्गदर्शक तत्वानुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करता येईल.**

१) ''शाळेच्या आवारात छळवणूक सक्त मनाई आहे आणि असे कोणतेही कृत्य केल्यास संबंधित नियमानुसार शिक्षा दिली जाईल'' असा संदेश शाळेच्या माहितीपत्रकात आणि शाळेने प्रसारित केलेल्या इतर मार्गदर्शक तत्वांमध्ये स्पष्टपणे नमूद केला पाहिजे.

२) शाळांनी एक मैत्रीपूर्ण आणि सकारात्मक शालेय वातावरण निर्माण केले पाहिजे जिथे शिक्षण शांततेत होऊ शकेल. त्यांनी विद्यार्थी, शाळा प्रशासन आणि कुटुंबांमध्ये विश्वासाचे आणि आदरयुक्त नाते निर्माण केले पाहिजे. विद्यार्थ्यांना कोणत्याही अनुचित घटनेबद्दल तक्रार करण्यासाठी त्यांना एक गोपनीय, विश्वासार्ह व सहज सुलभ मार्ग उपलब्ध करून दिला पाहिजे. तक्रारींची दखल घेऊन योग्य ती कारवाई आणि कार्यवाही करण्यासाठी संरचना आणि कार्यपद्धती तयार करणे आवश्यक आहे.

शाळेत विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा विकसन समिती स्थापन करून या समितीच्या नियमित आढावा बैठका आयोजित केल्या जाव्यात. या समितीच्या जबाबदाऱ्यांमध्ये खालील बाबींचा प्रामुख्याने समावेश असेल :

१) शालेय छळ प्रतिबंधक योजनेचा विकास आणि आढावा.

२) गुंडगिरी प्रतिबंधक कार्यक्रमांचा विकास आणि अंमलबजावणी.

३) कर्मचारी, विद्यार्थी आणि पालकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम विकसित करणे व प्रशिक्षण आयोजित करणे.

४) विविध कार्यक्रमांद्वारे जागरूकता निर्माण करणे.

५) शाळेत अनुचित प्रकार होऊ नये म्हणून सतर्क राहणे. अनुचित प्रकार घडल्यास तात्काळ कारवाई करणे.

६) समितीच्या सदस्यांची नावे आणि संपर्क क्रमांक शाळेच्या आवारात सर्वत्र स्पष्टपणे प्रदर्शित केले पाहिजेत.

७) प्राथमिक, माध्यमिक आणि माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांसाठी समुपदेशकाची व्यवस्था शक्य असेल तिथे करता येईल. निवासी शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी एकत्र घालवलेल्या वेळेमुळे गुंडगिरी आणि रॅगिंगच्या घटना घडण्याची शक्यता जास्त असते, त्यामुळे बोर्डिंग आणि निवासी शाळांमधील समुपदेशक आणि वॉर्डन यांनी अशा प्रकारबाबत अतिशय सावध असणे गरजेचे आहे.

**शाळांमध्ये छळ आणि रॅगिंग रोखण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे, नियम : (डी.ओ. क्र.१२-१९/२०१२-आरएमएसए-आय) सीबीएसई :**

१) विद्यार्थ्यांशी संवाद सहानुभूतीपूर्वक असला पाहिजे. शाळा व्यवस्थापन मॉनिटर/पीअर एज्युकेटर नियुक्त करावीत. शाळा निरीक्षकांना धोकादायक परिस्थितींसाठी पूर्णपणे प्रशिक्षित केले पाहिजे. त्यांनी गुंडगिरीच्या प्रकरणांचे तक्रार निवारण धमकी न देता विनम्र पद्धतीने करावे.

२) शालेय शिक्षणाच्या सुरुवातीच्या काळातच योग्य दृष्टिकोन निर्माण होतो म्हणूनच, विद्यार्थ्यांना मानवी हक्क, लोकशाही मूल्ये, विविधता आणि समानतेचा आदर आणि इतरांच्या गोपनीयतेचा आणि प्रतिष्ठेचा आदर याबद्दल संवेदनशील बनवणे आवश्यक आहे. छळवणुकीच्या समस्या आणि परिमाणांबद्दल विद्यार्थी, कर्मचारी आणि पालकांना शिक्षित करण्यासाठी आणि समाज विकसित करण्यासाठी शाळांनी पुढाकार घेतला पाहिजे.

३) किशोरावस्था शिक्षण, मूल्य शिक्षण, मानवी हक्क, लिंग, संवेदनशील आणि जागरूकता प्रदान करण्यासाठी शाळांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे.

४) सकारात्मक आत्मसन्मान निर्माण करणे, सहानुभूती, परस्पर संवाद कौशल्ये निर्माण करणे, ताणतणाव आणि भावनांचे समायोजन करणे आणि समवयस्कांच्या दबावाचा प्रतिकार करणे यासह जीवन कौशल्यांचे शिक्षण या काळात जाणीवपूर्वक घेतले पाहिजे.

५) भूमिका-नाट्ये, पथनाट्य, गट-चर्चा, वादविवाद, शाळांमध्ये विशेष सभा, पोस्टर स्पर्धा इत्यादी उपक्रम सदृढ वातावरण निर्मितीसाठी राबवले जाऊ शकतात. छळवणूक विरोधी मोहिमा आणि प्रशिक्षण कार्यक्रम देखील आयोजित केले जावेत.

६) मुलांच्या भावनिक आणि मानसिक आरोग्यात कौटुंबिक पार्श्वभूमी आणि मूल्ये खूप महत्त्वाची भूमिका बजावतात. पालक शिक्षक बैठकांमध्ये आणि इतर विविध शालेय समित्यांमध्ये प्रतिनिधित्व करताना पालकांची भूमिका बळकट केली पाहिजे. समाजाचे

मार्गदर्शन आणि संवेदनशीलता देखील आवश्यक भूमिका पार पडतील यासाठी समाज घटकांना देखील प्रतिबंधात्मक प्रयत्नांमध्ये शाळेला पाठिंबा देण्यासाठी प्रेरित केले पाहिजे.

७) प्रतिबंधात्मक पद्धतीं इतक्याच हस्तक्षेपाच्या पद्धती देखील महत्त्वाच्या आहेत. गुंडगिरीच्या प्रकरणांना आळा देण्यासाठी शाळांनी एक प्रक्रिया निश्चित करून त्याचे पालन करावे. यासाठी प्रशासनाची जबाबदारी आणि अधिकार निश्चित केले पाहिजेत. निष्पक्ष चौकशी प्रक्रियेचे पालन करून घेतलेल्या शाळेच्या निर्णयाची अंमलबजावणी काटेकोर होईल याबाबत दक्ष राहणे गरजेचे आहे.

८) छळानंतरचे वातावरण शांत करणे ही शाळेची जबाबदारी आहे. पीडित/छळ करणाऱ्याला दोषी ठरवले जाऊ नये आणि त्याला/तिला बदलाची संधी मिळवून द्यावी.

९) प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि विश्वासाचे वातावरण निर्माण करणे आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या समस्या मांडण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देणे खूप महत्वाचे आहे. विद्यार्थ्यांना अत्याचाराची तक्रार करता येईल अशी एक गुप्त अहवाल प्रणाली स्थापित केली जावी. शाळेने तक्रार/सूचना पेटी ठेवावी आणि प्राप्त होणाऱ्या अभिप्रायाचे नियमितपणे निरीक्षण करावे. आवश्यक मुद्द्यांवर चर्चा केली पाहिजे आणि योग्यरित्या त्यांचे निराकरण केले पाहिजे.

१०) शिक्षकांनी समस्या ओळखण्यासाठी त्यांच्याशी संवाद साधला पाहिजे. शाळेच्या नैतिक आणि प्रशासकीय रचनेचा भाग म्हणून, सतत होणाऱ्या गुंडगिरीविरुद्धच्या मोहिमेत सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी आणि पालकांना सहभागी करून घ्यावे.

## ५.२) बालकांच्या शोषणाचे प्रकार :

**शारीरिक शोषण**

बालकास मारहाण करणे, चटके देणे, धक्का देणे, शरीराला इजा करणे तसेच एखाद्या बालकाचे आर्थिक फायद्यासाठी भावनिक, शारीरिक शोषण करून पिळवणूक करणे अशा प्रकारच्या कृतीचा समावेश शारीरिक शोषणात होतो.

**भावनिक शोषण**

बौद्धिक दृष्टीने एकमेकांची तुलना करणे, डिवचणे, मुलांना कमी लेखणे, अपमानास्पद बोलणे, मुलांना सतत नावे ठेवणे इ. प्रकारच्या कृतींचा समावेश भावनिक शोषणात येतो.

**लैंगिक शोषण**

शक्तिशाली असलेली एखादी व्यक्ती स्वत:च्या लैंगिक संतुष्टीकरिता बालकाचा वापर करून घेत असेल, तर त्याला बाल लैंगिक शोषण संबोधले जाते.

**बाल लैंगिक शोषणाच्या कृतींचे दोन प्रकारांत वर्गीकरण करू शकतो.**

**स्पर्शात समावेश असलेले लैंगिक शोषण**

लिंगाचा योनीप्रवेश करणे किंवा संभोग करणे, बालकाच्या खाजगी अवयवाला स्पर्श करणे किंवा स्वत:च्या खाजगी अवयवांना स्पर्श करायला लावणे, तसेच असा कोणताही स्पर्श जो खाजगी अवयवांव्यतिरिक्त शरीराच्या कोणत्याही अवयवांना लैंगिक सुख मिळविण्याच्या हेतूने केला जातो.

**स्पर्शरहित लैंगिक शोषण**

मुलांना नग्न पाहणे, मुलांना खाजगी अवयव दाखविणे, अश्लील चित्रफितीसाठी बालकाचा उपयोग करणे, अश्लील ध्वनिचित्रफीत दाखविणे. लैंगिक संबंधांविषयी मुलांसोबत ऑनलाईन चॅटींग करणे. त्यावरून विनोद निर्मिती करणे यांसारख्या वर्तनाचा स्पर्शरहित शोषणात समावेश होतो.

बालकावरील शोषणाचे स्वरूप व प्रकार आपण पाहिले, त्यासंदर्भाने प्रचलित पूर्वग्रह आणि कल्पनांविषयी अधिक सुस्पष्टता आणणे महत्त्वाचे आहे. आपण त्या संबंधीचे काही समज व वास्तवता समजून घेऊ.

**शोषण होण्याची अधिक शक्यता असण्याची कारणे :**

- वैवाहिक भांडणतंटे, आर्थिक अस्थिरता, घरातील एखाद्या सदस्याचे दीर्घकालीन आजारपण, कुटुंबामध्ये नव्या बाळाचे आगमन यांसारख्या गोष्टीसुद्धा शोषणाची शक्यता वाढवू शकतात.
- शारीरिक किंवा मानसिक अपंगत्व असणारी बालके.
- शोषणाचे इतर प्रकार अनुभवलेल्या मुलांवरती लैंगिक शोषण होण्याची शक्यता अधिक असते. ज्या मुलांचे शारीरिक शोषण झालेले असते त्यांचे लैंगिक शोषण होण्याची शक्यता अधिक असते. मुलांना जेव्हा अनेक प्रकारच्या शोषणांचा सामना करावा लागतो तेव्हा त्या मुलांना बहुतपीडित असे संबोधले जाते.
- आई वडिलांना पारखी झालेली मुले – अनाथ, आईवडिलांपासून वेगळी झालेली, हरवलेली, घर सोडून पळून गेलेली, रस्त्यावरची मुले, बालमजूर, संस्थाश्रित मुले.
- मोठ्यांविषयी अवास्तविक भीती बाळगतात अशी बालके.

## ५.३) समज व वास्तव :

- समज : **अनेकदा बालकाचे लैंगिक शोषण करणाऱ्या व्यक्ती अनोळखी असतात.**

अ) **वास्तव :** आजवर झालेल्या अभ्यासांतून असे स्पष्ट झाले आहे, की बहुतेक ठिकाणी मुलांच्या चांगल्या परिचयातील आणि विश्वासू व्यक्ती त्यांचे लैंगिक शोषण करतात. २००७ साली बाल

शोषणावर झालेला राष्ट्रीय संशोधन अभ्यास हे नमूद करतो, की **५०%** शोषित मुले ही शोषण करणाऱ्या व्यक्तींच्या चांगल्या प्रकारे परिचित असतात.

- समज : **बालकाचे लैंगिक शोषण केवळ पुरुषांकडूनच केले जाते.**

ब) वास्तव : हा एक समज आहे, की लैंगिक भावना, इच्छा या फक्त पुरुषांनाच असतात. महिलांच्या सुसंस्कृतपणामुळे त्या कधीच लैंगिक संबंधांसाठी प्रयत्न करीत नाहीत अशा पूर्वापार चालत आलेल्या समजुतीमुळे तो निर्माण झालेला आहे. आपल्या दृष्टीने त्यांना लैंगिक इच्छा नसतात, असल्या तरी आपल्या कुटुंब सदस्यांच्या कल्याणासाठी त्या बांधील असल्यामुळे त्यांनी त्यांचा त्याग केलेला असतो. खरेतर शोषणकर्ता हा पुरुष, महिला, तृतीयपंथी यांच्यापैकी कोणीही असू शकतो. परंतू बहुतांशी लैंगिक शोषणकर्ते हे पुरूष असल्याचे अभ्यासातून पुढे आले आहे.

- समज : **मोठे झाल्यानंतर बालक त्याच्यावर झालेले लैंगिक शोषण विसरतील.**

क) वास्तव : 'क्षमा करा आणि विसरून जा' यावरती अतूट श्रद्धा आहे. मुले ही खूप निरागस असतात. शोषणाचा अर्थ कळण्याएवढी त्यांना समज नसते. त्यामुळे अशा घटना ते विसरतात यांसारखे अनेक समज आपल्याकडे प्रचलित आहेत. त्यांना शोषणाची घटना आणि तिचे संदर्भ सुस्पष्टपणे आठवत नसले, तरी त्या शोषणाचा काही अंशी दुष्परिणाम त्यांच्यावर निश्चितपणे होतो. वेळीच उपचार घेतले न गेल्यास शोषणाचा तरुणपणी/मोठेपणी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या काही पैलूंवरती ठळक परिणाम दिसून येतो.

- समज : **जेथे आई बाबा दोघेही कामावर जातात तीच बालके बहुतेकदा शोषणाला बळी पडतात.**

ड) वास्तव : वरील विधान सत्य नाही. मुलांच्या पालकांपैकी एखादा पालक पूर्णवेळ घरी असूनसुद्धा त्या मुलाचे लैंगिक शोषण झालेले आहे. या गैरसमजुतीच्या मुळाशी पुरुषप्रधान समाजाने रुजविलेली भेदभावकारक, अन्यायकारक शिकवण आढळून येते. महिलेने घराकडे लक्ष देणे आणि पुरुषाने कामाकरिता बाहेर जाणे आवश्यक आहे. आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण असलेल्या महिलेला आपल्या समाजात कमी लेखले जाते. तिचे मानसिक खच्चीकरण करण्याचा प्रयत्न केला जातो. शोषणाच्या तीव्रतेवरून लक्ष हटविण्यासाठी काम करणाऱ्या या पालकांना त्याकरिता जबाबदार ठरवून शोषण करणाऱ्याच्या दोषाचे ओझे संरक्षण कर्त्यावर लादणे हा तुलनेने सोपा पर्याय समजला जातो.

## ५.४) बालकाच्या शोषणाची प्रक्रिया :

बालकाला शोषण प्रक्रियेचे जर पुरेसे ज्ञान असेल तर, अनुचित वर्तन, धोक्याची पूर्वसूचना देणारे प्रसंग वेळेत ओळखणे आणि त्यावर योग्य ती कार्यवाही करणे सोपे होईल. त्यामुळे प्रत्यक्ष शोषण सुरू होण्याच्या प्रक्रियेला अटकाव घालता येईल.

**बालकाच्या शोषणाची प्रक्रिया सर्वसाधारण पुढीलप्रमाणे घडते :**

१) **बालकाची निवड करणे :** सर्वप्रथम शोषणकर्ता बालकाच्या दुर्बलतेचा ठाव घेतो. त्याची दुखरी नस ओळखून बालकाची भावनिक गरज समजून, स्वभावविशेष लक्षात घेऊन त्यानुसार तो नियोजन करतो.

२) **बालकाचा विश्वास संपादन करणे :** त्यानंतर शोषणकर्ता बालकाचा विश्वास संपादन करतो. त्यासाठी बालकाचे निरीक्षण करून, त्याच्याविषयीची माहिती गोळा करून तो त्याच्या गरजाा जाणून घेतो. त्यांची पूर्ती करण्याचे मार्ग शोधून काढतो. याकरिता बालकाच्या पालकांसोबत तो अगदी बेमालूमपणे मिसळून जातो.

३) **बालकांच्या गरजा भागविणे :** बालकाची आणि त्याच्या कुटुंबाची दुखरी नस सापडल्यानंतर त्याचे आई, बाबा, शिक्षक, पालक अशा एखाद्या व्यक्तीच्या भूमिकेत शोषणकर्ता शिरतो आणि त्या विशिष्ट व्यक्तिरेखेला साजेशी अशी कृती करतो. तो मुलाला चॉकलेट, खाऊ, कपडे, आकर्षक खेळणी देतो, लाड पुरवितो, कौतुक करतो. या गोष्टी करत मुलाच्या गरजा पूर्ण करून शोषणकर्ता त्याच्या आयुष्यात मानाचे स्थान मिळवितो.

एखाद्या विशिष्ट बालकाप्रति जास्तीची आस्था दाखविते, तेव्हा अशा व्यक्तीला ओळखून त्याविषयी पालकांना सजग करता येऊ शकते.

४) **बालकासोबत एकांत निर्माण करणे :** बालकाशी तयार झालेल्या विशेष, खास नात्याचा फायदा घेऊन शोषणकर्ता अशी परिस्थिती, प्रसंग निर्माण करतो जिथे त्या दोघांव्यतिरिक्त इतर कुणीही नसेल. त्यांना मिळालेल्या एकांतामुळे त्यांच्यातील हे विशेष नाते खुलण्यास, बहरण्यास अजून मदत होते. बालकाची देखभाल करणे, अभ्यास घेणे, शिकविणे, बाहेर सहलीला घेऊन जाणे यांसारख्या प्रसंगातून हा एकांत मिळविला जातो.

५) **शोषणासाठी वातावरण निर्मिती करणे :** बालक आणि शोषणकर्त्यामध्ये घट्ट नाते निर्माण झाल्यानंतर सुरुवातीला भावना उत्तेजित करणारे स्पर्श बालकाला करायला लावतो. या विषयासंबंधीची लाज आणि नकारात्मकता दूर करण्यासाठी जवळीक निर्माण करतो.

६) **नात्याची सगळी सूत्रे आपल्या हातात घेणे :** शोषणकर्ता याकरिता बालकाला दोषी ठरवून नात्यातील गुप्तता कायम राहील आणि बालक याविरुद्ध आपले तोंड उघडणार नाही याकडे आपले सर्व लक्ष केंद्रित करतो. शोषण कर्त्याने वारंवार धमक्या दिल्यामुळे बालक अशा नात्यामध्ये पुरते अडकते. हे नाते गमावल्यामुळे किंवा याविषयी सर्वांना कळल्यामुळे आपली नाचक्की होईल, आपण सर्वांसाठी अधिकच नकोसे होऊ असा विचार बालकाच्या मनात येऊ शकतो.

**शोषण झाल्यानंतर बालक तातडीने मदत मागत नाही त्याचे कारण पुढीलप्रमाणे –**

- बालकाला सांगितले जाते, की यात त्याची चूक आहे.
- माझ्या बोलण्यावर कुणाचाही विश्वास बसणार नाही या भीतीमुळे शोषणकर्त्याकडून मिळणाऱ्या ठरावीक धमक्यांमुळे बालक तोंड उघडायला घाबरते.
- मुलांना बक्षीस देण्याचे आमिष दाखवले जाते. त्याने जर हे गुपित फोडले, तर त्याच्या भावंडांबरोबर असेच करण्याची धमकी दिली जाते.

**शोषणाबद्दल मुले तेव्हा सांगतात जेव्हा...**

- शोषण सहन करण्याची ताकद संपल्यामुळे,
- लैंगिक शोषणामुळे झालेल्या आजारामुळे/जखमेमुळे.
- शोषणाबद्दलची जागरूकता आणि समज वाढल्यामुळे.
- प्रौढ घट्ट नात्यामुळे.

**शोषणाबद्दल मुले तेव्हा सांगतात जेव्हा...**

- समजूतदार पालक अथवा इतर प्रौढांसोबत झालेल्या चर्चेमुळे.
- जवळच्या अन्य व्यक्तींचे शोषण होण्याच्या भीतीने.
- काही वेळा मानसोपचार पद्धती, समुपदेशन किंवा सत्रादरम्यान वैयक्तिक सुरक्षेचा पाठ शिकत असताना बालक शोषणातून बाहेर पडण्यासाठी त्यांच्यावरील शोषणाच्या घटना उघडकीस आणू शकतात.

## ५.५) शोषणासंबंधीची लक्षणे :

स्वत:वरती झालेल्या शोषणाला प्रत्येक मूल वेगळ्या प्रतिक्रिया, प्रतिसाद देते, हे जाणून घेणे आवश्यक आहे. शोषण झाल्यानंतर लगेच दिसून येणाऱ्या लक्षणांपैकी काही लक्षणे बालकामध्ये आढळून आल्यास त्याला तातडीची मदत मिळवून देता येईल.

१) **तणावाखाली असणे :** ज्या व्यक्तीवर आपण विश्वास ठेवला, प्रेम केले त्यानेच आपले शोषण केले या सत्याचा शोध लागल्यानंतर बालकाला जबर मानसिक धक्का बसतो. त्यामुळे ते प्रचंड तणावाखाली येते.

२) **गोंधळून जाणे :** अनेकदा शोषणकर्ता बालकाच्या ओळखीचा, त्याचा नातलग असल्यामुळे त्याच्याकडून बालकाच्या विश्वासाला तडा गेल्यानंतर ते गोंधळून जाते.

३) **अपराधीपणा :** या परिस्थितीत काहीतरी गडबड असल्याचे बालकाला जाणवते. मात्र त्याचे खापर इतरांवर फोडण्याऐवजी बालक स्वत:ला दोषी मानते. त्यामुळे अपराधीपणाची भावना दिसून येते.

४) **राग :** सुरक्षा आणि विश्वासावरती झालेल्या समूळ आघाताला दिलेली एक बचावात्मक प्रतिक्रिया म्हणून शोषित मुलांमध्ये तीव्र स्वरूपाचा राग, चीड निर्माण होते.

५) **भीती :** शोषण झाल्यानंतर मुलाला आजूबाजूचा समाज, सार्वजनिक ठिकाणच्या गर्दीची अचानकपणे भीती वाटायला लागते. पुन्हा शोषण होण्याचे व इतरांना शोषणाविषयी कळण्याचे भय वाटते.

६) **दु:ख :** मुलाला तीव्र स्वरूपाचे दु:ख किंवा नैराश्य जाणवू शकते.

७) **वैद्यकीय :** मनोशारीरिक आजार, लैंगिक भागात दुखणे, सूज येणे, वारंवार मूत्र संक्रमण होणे, लैंगिक रूपाने होणारे संक्रमण.

८) **मानसिक :** खाण्यात बिघाड, चिंता, उदासीनता, नैराश्य, आत्महत्येचा प्रयत्न, एकलकोंडेपणा, आक्रमकता, वैरभाव इ.

**शोषणाचे मुलांवर होणारे परिणाम :**

नातेसंबंधांमध्ये विश्वास ठेवण्यात असमर्थ ठरणे. कायमस्वरूपी घरगुती हिंसेचा बळी ठरणे. अनेकांसोबत लैंगिक संबंध ठेवणे, लैंगिक संबंध अजिबात न आवडणे किंवा स्वत:च शोषणकर्ता होणे. इ. परिणाम होऊ शकतात.

शोषणाची लक्षणे ही शारीरिक, मानसिक, लैंगिक यांपैकी असू शकतात. सहभागी सदस्यांना याविषयी संपूर्ण माहिती असणे गरजेचे आहे. ही लक्षणे एखाद्या मुलाचे शोषण झाल्याचे दर्शवितात. ज्या मुलांच्या मनावर वेदनादायी आघात होतात, त्यांना अनेकदा नेमक्या भावना ओळखण्यात, व्यक्त करण्यात, व्यवस्थापन करण्यात अडचणी येतात. भावना अचूकतेने मांडण्यासाठी लागणाऱ्या शब्दसंग्रहाचा किंवा भाषेचा त्यांच्याकडे अभाव असू शकतो. याबद्दल निश्चितपणे काही सांगू शकत नाहीत परंतु ही शोषणाची लक्षणे आहेत.

## ५.६) प्रतिबंधात्मक उपाययोजना – प्रबोधनात्मक कार्यक्रम :

१) तुमच्या मुलांच्या जीवनात सहभागी व्हा कारण तुम्ही लक्ष देणे आणि देखरेख करणे याला कोणताही पर्याय नाही.

२) खुल्या संवादाला प्रोत्साहन द्या. त्यांच्या प्रश्नांना उत्तरे देताना मोकळेपणा बाळगा.

३) मुलांच्या भावनांचा आदर करा आणि त्यांच्याशी बोला.

४) मुलांच्या वर्तनात बदल असेल तर, त्यांच्याशी सक्तीने न वागता त्यांना समजून घ्या.

५) मुलांना वैयक्तिक सुरक्षेबाबत शिकवा.

६) वैयक्तिक सुरक्षेबद्दल वयानुरूप माहिती सांगा.

७) सुरक्षित स्पर्श आणि असुरक्षित स्पर्श याबद्दलचे नियम अवगत करून घ्या.

**प्रबोधनात्मक कार्यक्रम :**

१) पालकांसाठी चर्चासत्र आयोजित करणे.

२) विद्यार्थ्यांना पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरे सोप्या शब्दात सांगणे.

३) सुरक्षित स्पर्श आणि असुरक्षित स्पर्श याविषयी माहिती समजावणे.

४) प्रबोधनपर चित्रफिती दाखवणे.

५) वाईट घटना पाहिल्यावर त्याविषयी माहिती देणे.

६) शाळेत तज्ज्ञ समुपदेशकांमार्फत समुपदेशनाचे कार्यक्रम आयोजित करणे.

७) लैंगिक शिक्षण सहज पद्धतीने देणे.

८) शाळेत गटागटात बसवून वातावरण मोकळे करणे.

९) अभ्यासक्रमातील विविध उपक्रम घेऊन बंधुत्वाची भावना प्रत्येक विद्यार्थ्यांत निर्माण करणे.

## ५.७) वैयक्तिक सुरक्षा शिक्षण कार्यक्रम :

आपण बालकांना होणाऱ्या वेगवेगळ्या शोषणाबद्दल अभ्यासले. बालकांना लैंगिक शोषणापासून सुरक्षित ठेवण्याकरिता सुरक्षा शिक्षण कार्यक्रम राबविणे गरजेचे आहे. बाल लैंगिक शोषण ही असंख्य मुलांवर परिणाम करणारी सामाजिक समस्या आहे. शोषणापासून मुलांना सुरक्षित ठेवण्यासाठी बहुतांशी काळजीवाहक व्यक्ती प्रयत्नशील असल्या, तरी आपण मुलांवर चोवीस तास लक्ष ठेवू शकत नाही. त्यांची देखरेख करू शकत नाही, हे देखील तितकेच खरे आहे. लैंगिक शोषणाविषयी मुलांचे प्रबोधन करणे, भविष्यात त्यांच्यासोबत असे काही घडू नये म्हणून वेळीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आणि तसा काही प्रसंग ओढवल्यास त्यांना मदत मिळवून देणे गरजेचे आहे. त्यासाठी सुरक्षा शिक्षण कार्यक्रम बालक व पालकांसाठी घ्यावा.

वैयक्तिक सुरक्षा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी व त्याचा परिणाम दीर्घकाळाकरिता टिकवून ठेवण्यासाठी शाळा अथवा संस्थेच्या व्यस्थापनाकडून बांधिलकीचे आश्वासन मिळवावे. शाळेच्या व्यवस्थापनाला त्याकरिता संवेदनशील करावे. शोषणाच्या घटनांना प्रतिसाद देण्यासाठी शाळेतील शिक्षक, समुपदेशक, इतर कर्मचारी वर्गाला सक्षम करावे. बालकाच्या आयुष्यात त्याच्या पालकांची भूमिका महत्त्वाची असते. बालकाला सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी त्यांच्यावर असल्यामुळे बालकांसोबत सत्रे घेण्यापूर्वी त्यांच्या पालकांना या प्रक्रियेत सहभागी करून घ्यावे. संपूर्ण वर्गासमोर बालक त्याच्यासोबत झालेल्या शोषणाच्या घटना उघड करणार नाही. ही शक्यता गृहीत धरून प्रत्येक मुलासोबत स्वतंत्रपणे, वैयक्तिक सत्र घेतले जाऊ शकते. तशी सूचनापेटी शाळेमध्ये लावली जाऊ शकते. असे कार्यक्रम संपल्यानंतर पालक आणि शिक्षकांबरोबर एक सत्र आयोजित करावे. या

कार्यक्रमासंदर्भात पालकांशी संवाद साधण्यासाठी बालशोषण या विषयासंबंधी आपणांस मिळालेल्या माहितीचा वापर करावा.

सुरक्षा शिक्षण कार्यक्रमाद्वारे खालील घटकांची माहिती देण्यावर विशेष भर द्यावा.

सुरक्षेचे नियम (स्पर्शाविषयीचे तीन नियम)

- **सुरक्षा नियम १ :** कोणीही खाजगी अवयवाला स्पर्श करणे, त्याकडे पाहणे, त्यांबद्दल बोलणे हे कधीही योग्य नाही. तुम्हांला त्याच्या शरीराच्या, खाजगी अवयवाला कोणीही स्पर्श करायला सांगणे, पाहायला सांगणे योग्य नाही.
- **सुरक्षा नियम २ :** वरील गोष्टींसाठी नाही म्हणा, तात्काळ तिथून निघून जा.
- **सुरक्षा नियम ३ :** एखाद्या विश्वासू मोठ्या व्यक्तीला यांविषयी सांगा. जोपर्यंत तुम्हांला मदत मिळत नाही तोपर्यंत पुन्हा पुन्हा सांगत रहा.

**स्पर्शाचे विविध प्रकार :** सुरक्षित, असुरक्षित, हवासा, नकोसा

कुठल्याही अनुचित लैंगिक स्पर्शामध्ये मुलांचा दोष नसतो असे वैयक्तिक सुरक्षेअंतर्गत त्यांना शिकविले जावे.

| वर्ग | विषय – अनिवार्य संदेश | पद्धती |
|---|---|---|
| बालवाडी ते दुसरी | • सुरक्षितता आणि असुरक्षितता समज | स्पष्टीकरणात्मक चित्रांचा वापर |
| तिसरी ते पाचवी | • सुरक्षा नियम | स्पष्टीकरण |
| सहावी ते आठवी | • खाजगी अवयवांचे स्थान<br>• लैंगिक शोषणाबाबत समज | स्पष्टीकरण<br>भूमिकाभिनय<br>गटचर्चा |
| नववी ते बारावी | • माझी चूक नाही<br>• अंतरजाल सुरक्षा<br>• असुरक्षित परिस्थितीस प्रतिसाद देण्यासाठी कृतीबिंदू | प्रसंगाधिष्ठित उदाहरणे |

## सुरक्षा नियमांची माहिती :

वयोगटानुसार सुरक्षा नियमांची माहिती देण्याकरिता उदाहरणादाखल काही गोष्टी/प्रसंग खाली नमूद करण्यात आले आहेत. विविध माध्यमातून (गोष्ट, प्रसंगवर्णन, नाटिका, व्हिडिओ इ.) शिक्षक विविध स्तरांतील बालकांना सुरक्षा नियम अवगत करतील.

## इयत्ता बालवाडी ते दुसरी (पायाभूत स्तर)

दोन मित्र असतात. एकदा मैदानावर खेळत असताना एक माणूस त्यांच्याकडे येतो. तो त्यांना विचारतो, 'तुम्ही माझ्याशी मैत्री कराल का?' ते दोघं हो म्हणतात. तो त्यांना मैदानाच्या कोपऱ्यात येण्यासाठी सांगतो. जेव्हा ते मैदानाच्या कडेला जातात तेव्हा तो त्यांना एका गुप्त खेळाविषयी म्हणजे हा खेळ कुणालाही न सांगण्यासाठी सांगतो. या खेळामध्ये त्यांना एकमेकांच्या खाजगी अवयवांना स्पर्श करायचा असतो. हे ऐकून एक मित्र त्याला म्हणतो, 'नाही! मला हा खेळ खेळायचा नाही. मला तो आवडला नाही!' नंतर तो त्याच्या मित्राला म्हणतो, 'चल, आपण येथून जाऊ!' तो मित्राचा हात पकडतो आणि ते दोघं तिथून निघून जातात.

तो मित्र दुसऱ्या मित्राला सांगतो की, त्याच्या आईने त्याला असे खेळ कधीही खेळायचे नसतात असे संगितले आहे. घरी गेल्यानंतर तो मित्र आपल्या आईला मैदानात त्या माणसाने सांगितलेल्या खेळाविषयी सांगतो. आपल्या मुलाने स्वत:हून हे सगळं सांगितलं हे ऐकून आईला बरं वाटलं आणि आईने मुलाला शाबासकी दिली, त्याचे कौतुक केले, त्यामुळे मुलाला आनंद झाला. मग आई त्या दोघांना सुरक्षेविषयी शिकविते. ती त्यांना म्हणते, 'आपल्या शरीराचे जे अवयव सामान्यत: पोहण्याच्या वेळी अंडरवेअर, चड्डी, कमीज किंवा स्लिप यांसारख्या अंतर्वस्त्रांनी किंवा आतल्या कपड्यांनी झाकलेले असतात, त्यांना खाजगी अवयव असे म्हणतात.'

त्यानंतर ती त्याला सुरक्षा नियम शिकविते. ती म्हणते, 'एखाद्या व्यक्तीने तुमच्या खाजगी अवयवांना स्पर्श करणे, त्यांच्याकडे पाहणे किंवा त्यांविषयी बोलणे असुरक्षित आहे. तुमचे आई-बाबा, आजी-आजोबा, डॉक्टर्स, नर्स किंवा तुम्हांला सांभाळणाऱ्या व्यक्ती या केवळ स्वच्छ आणि निरोगी ठेवण्यासाठी तुमच्या खाजगी अवयवांना स्पर्श करू शकतात किंवा त्यांच्याकडे बघू शकतात.'

त्यानंतर ती सांगते, 'जर एखादी व्यक्ती तुम्हांला असुरक्षित स्पर्श करत असेल तर तिला 'नाही' म्हणा आणि तिथून निघून जा. तिथून निघून गेल्यानंतर एखाद्या मदतशील प्रौढाला सांगा.' तिने त्यांना सांगितले की, असे कोणतेही प्रौढ; जे तुम्हांला मदत करतात, ते तुमचे मदतशील प्रौढ असतात. मग ते तुमचे आई-बाबा, आजी-आजोबा, शेजारी, तुमच्या मित्रांचे आई-वडील, सुरक्षारक्षक, दुकानदार, शिक्षक यांपैकी कुणीही असू शकतात. जर तुम्ही एखाद्या मदतशील प्रौढाकडे गेलात आणि त्यांनी तुम्हांला मदत केली नाही तर त्यांना पुन्हा पुन्हा सांगण्याचा प्रयत्न करा. अनेकदा सांगूनही जर त्यांनी मदत केली नाही तर इतर मदतशील प्रौढांकडे जा. जोपर्यंत मदत मिळत नाही तोपर्यंत तुमच्या मदतशील प्रौढांना सांगत रहा. ती पुढे त्यांना म्हणते की, 'त्या माणसाने त्या दोघा मित्रांना खाजगी खेळ खेळायला संगितले यामध्ये त्या दोघांची काहीही चूक नाही.'

१) गुप्त खेळ सुरक्षित होता की असुरक्षित?

२) कोणत्या अवयवांना खाजगी अवयव म्हणतात?

३) आईने शिकवलेले सुरक्षेचे नियम कोणते ते सांगा?

४) जर कुणी आपल्याला असुरक्षित स्पर्श केले तर आपण काय करायला हवे?

५) आईसोबत आणखी कोण कोण आपल्याला मदत करू शकतील?

६) या गोष्टीमध्ये मुलांची चूक होती का?


## इयत्ता तिसरी ते पाचवी (पूर्वतयारी स्तर)



१) आज मी तुम्हांला एका मुलीची गोष्ट सांगणार आहे. ती तुमच्याएवढीच आहे. एकदा तिच्या आईला बाहेर कामासाठी जायचे असल्यामुळे ती मुलीला शेजाऱ्यांकडे ठेवते. ते शेजारी त्यांच्याजवळ असलेला मोबाईल तिला खेळण्यासाठी देतात आणि मोबाइल शिकविण्याच्या बहाण्याने ते तिला अशी एक चित्रफीत दाखवितात. ज्यामध्ये लोकांनी कपडे घातलेले नसतात. ती गोंधळते पण शेजारी असल्याने ती चित्रफीत पाहते.



थोड्या वेळाने आई घरी येते आणि मुलीला घेऊन तिच्या घरी निघून जाते. नेहमीप्रमाणे आपली मुलगी आपल्याशी बोलत नाही हे पाहून, आई तिला काय झाले असे विचारते. शेजाऱ्यांनी दाखविलेल्या चित्रफीतीमुळे गोंधळलेली आणि घाबरलेली असल्याने मुलगी सुरुवातीला काही बोलत नाही, पण नंतर धाडसाने ती सर्व घटना आईला सांगते. आई तिचं सर्व नीट ऐकून घेते. तिने धाडसाने सर्व घटना सांगितली म्हणून तिचं कौतुक करते आणि जरी मुलीने ती चित्रफीत पहिली तरी शेजाऱ्यांनी तिला ती चित्रफीत दाखवायला नको होती म्हणून यात तिची काहीच चूक नाही असं ती तिला सांगते. नंतर आई मुलीला सुरक्षेचे चार नियम शिकविते. ती सांगते, जर एखाद्या व्यक्तीने तुमच्या किंवा इतरांच्या खाजगी अवयवांना स्पर्श करणे, त्यांच्याकडे पाहणे किंवा त्यांविषयी बोलणे असुरक्षित आहे. जर एखाद्या व्यक्तीने तुम्हांला असुरक्षित स्पर्श करण्याचा प्रयत्न केला तर तुम्ही नाही म्हणा आणि निघून जा. वयाने मोठ्या आणि जवळच्या व्यक्तीला नाही म्हणणे कठीण असले, तरी तुम्ही मोठ्याने नाही म्हणायचा प्रयत्न करा आणि असुरक्षित जागेपासून निघून जा. आई तिला हे सांगते की, अशा वेळी एखाद्या मदतीशील प्रौढाशी म्हणजे जी व्यक्ती त्या परिस्थितीमध्ये तुम्हाला मदत करेल तिच्याशी बोला. मग ती व्यक्ती तुमचे आई–बाबा, शिक्षक, आजी–आजोबा, नातेवाईक किंवा शेजारी यांपैकी कुणीही असू शकतात. जोपर्यंत तुम्हांला मदत मिळत नाही तोपर्यंत सांगत राहा. जर तुम्ही एखाद्या मदतशील प्रौढाकडे गेलात आणि त्यांनी तुम्हांला मदत केली नाही तर त्यांना पुन्हा पुन्हा सांगण्याचा प्रयत्न करा. तरी देखील जर त्यांनी मदत केली नाही तर दुसऱ्या एखाद्या मदतशील प्रौढाकडे जा. जोपर्यंत तुम्हांला मदत मिळत नाही तोपर्यंत तुमच्या मदतशील प्रौढांना सांगत रहा.



**प्रश्न :**

१) मुलीला नातेवाईकाने काय दाखविले? ते सुरक्षित होते का?

२) मुलगी आईला सर्व घटना पटकन सांगू शकली का?

३) आईने मुलीला शिकविलेले नियम कोणते?

४) नातेवाईकाने मुलीला चित्रफीत दाखविली यात तिची चूक होती का?

२) त्या दिवशी तुमच्यासारखा एक लहान मुलगा सकाळी बाहेर फिरत होता. फिरत असताना त्या लहान वयातील मुलाला एका मोठ्या वयाच्या मुलाने जवळ बोलावत त्या लहान मुलाच्या खाजगी अवयवाला स्पर्श केला. तो मुलगा त्याच्या परिचयाचा होता. तरी पण त्याने जाणीवपूर्वक या मुलाच्या खाजगी अवयवाला स्पर्श केला. तो सातत्याने त्याच्याकडे पाहत होता. हा मोठा मुलगा आपल्या खाजगी अवयवाकडे पाहत आहे, त्याला स्पर्श करण्याचा प्रयत्न करीत आहे हे लक्षात आल्यावर लहान मुलांने खूपदा नकार दिला, पण तरीसुद्धा तो त्याला त्रास देत होता. खरे तर आपले खाजगी अवयव हे झाकलेले असतात. त्याला कोणी स्पर्श करता कामा नये. त्याकडे कोणी पाहता कामा नयेत. मात्र हा मोठा मुलगा बळजबरीने त्याच्या अवयवांना पुन्हा पुन्हा स्पर्श करू पाहत होता. मग तो मुलगा घाबरला. त्याच्या मनात वेगवेगळे विचार येऊ लागले. काय करावे बरे, असा प्रश्न त्याला पडला. घरी सांगावे तर घरचे रागावतील असे त्याला वाटले. तो घरी सांगण्यास भीत होता. मात्र त्याने आता मनाचा निश्चय केला. आपल्याशी जे घडते आहे ते चुकीचे आहे हे त्याला माहीत होते म्हणून त्याने आपल्याशी जे काही घडले आहे ते आपण आईला सांगायचे असे ठरविले. तो घरी आला आणि आईच्याजवळ जाऊन उभा राहिला, तर आई कामात होती. तिचे आपल्या मुलाकडे लक्षच नव्हते. तो पुन्हा पुन्हा आईला सांगण्यासाठी आईच्या जवळ जात होता, पण आई कामाच्या व्यापात त्याच्याकडे दुर्लक्ष करीत होती. तो पुन्हा आईच्या जवळ जायचा. आई मला काही सांगायचे आहे असे म्हणायचा, पण आई पुन्हा






कामाच्या व्यापात दुर्लक्ष करायची. अखेर त्याने आई कामात असताना आईचा पदर धरला.. चेहरा केविलवाणा करत, आई मला तुला काही सांगायचं आहे असं पुन्हा पुन्हा म्हणाला, मग मात्र आईने त्याला काय सांगायचे आहे असे विचारले आणि त्याने सांगण्यास सुरुवात केली. आईने ते ऐकून समजून घेतले. आईला धक्काच बसला. आईने स्वतः ला सावरत, त्याच्या पाठीवर हात फिरवला, त्याला आधार दिला. ती म्हणाली, तू घाबरू नकोस. तुझ्यासोबत जे काही घडले आहे, त्यात तुझी चूक नाही. मी तुझ्यासोबत आहे. तू त्याला विरोध केलास हे खूप छान झाले. मग आईने त्या मोठ्या मुलाला बोलावले आणि




तू माझ्या मुलासोबत जे काही केले आहेस ते चुकीचे केले आहेस असे बजावले. पुन्हा अशा प्रकारचा प्रयत्न करशील तर तुला शिक्षा देईल असे सांगितले. तुझ्या आई-बाबांना बोलावून सर्व सांगेन असे तिने म्हणताच तो घाबरला. आईच्या पाया पडत त्याने माफी मागितली. पुन्हा मी असे कधीच करणार नाही असे सांगितले. तो पुन्हा पुन्हा विनंती करीत होता. घरी सांगू नका. त्याने माफी मागितल्यावर लहान मुलाला खूप आनंद झाला. आपल्याशी जे काही घडले आहे ते आपण घरातील व्यक्तींना सांगायला हवे. ते ऐकत नसतील तर त्यांना पुन्हा पुन्हा सांगावे, विनंती करावी हे त्यालाही पटले.

मित्रांनो, आपल्या सोबत असे काही घडत असेल तर आपण आपल्या पालकांना पुन्हा पुन्हा सांगण्याचा प्रयत्न करू या. ते ऐकत नसतील तर त्यांना पुन्हा पुन्हा सांगत राहा. ते तुमच्या हिताचे आहे. सांगताना अजिबात घाबरू नका. आईने त्याला वैयक्तिक सुरक्षेचे नियम सांगितले.

**प्रश्न :**

१) लहान मुलासोबत मोठा मुलगा काय करीत होता व ते सुरक्षित होते की असुरक्षित होते?

२) मोठ्या मुलाने केलेल्या कृत्यामुळे लहान मुलाच्या मनात कोणते विचार आले?

३) लहान मुलाला कशामुळे आनंद झाला?

४) लहान मुलाने आईला सांगितले नसते तर काय झाले असते?

५) आईप्रमाणे आणखी कोण कोण आपल्याला मदत करू शकेल?

## इयत्ता सहावी ते आठवी (पूर्व माध्यमिक स्तर)

त्या दिवशी तुमच्यासारखेच दोघे मित्र आणि मैत्रिणी खाजगी शिकवणीवरून घरी येत होते. त्या दोघांचा चेहरा अत्यंत धास्तावलेला आणि घाबरलेला होता. आता पुढे काय करायचे अशा प्रश्नार्थक मन:स्थितीत ते घराच्या ओसरीवर एका कोपऱ्यात लपून बसले होते. दोघेही एकमेकांशी घरातल्या मोठ्या लोकांना सांगायचे की नाही या संदर्भाने चर्चा करीत होते. आपण आपल्याशी जे काही घडले आहे ते आई–बाबांना सांगायला नको. शिकवणीचे सर आणि आई–बाबांचे चांगले संबंध आहेत. सर म्हणाले तसे आपण आई–बाबांना काही सांगितले, तरी त्यांना खोटे वाटेल. सरांचेच आई–बाबांना खरे वाटेल अशी चर्चा सुरू होती.ही मुलांची चर्चा खिडकीतून बाबांच्या कानावर गेली. मग बाबांनी आपल्या मुलाला जवळ घेतले. काय झाले आहे? असे विचारले, तरी पण त्याचे धाडस होत नव्हते. बाबांनी खोदून खोदून त्याला विचारले. तो उत्तर देण्याच्या मानसिक स्थितीत नसल्याचे लक्षात येताच त्याच्याशी गप्पा मारल्या आणि त्यातून त्याला विश्वास दिला. त्यानंतर त्यांनी त्याला पुन्हा म्हटले, तू सांग आम्ही काही म्हणणार नाही. रागवणार नाही. जे काही घडले आहे ते तू सांगितलेस, तर मला तुझे कौतुकच वाटेल. बाबांनी त्याला विश्वास दिला, मग मात्र त्याने सांगायला सुरुवात केली. शिकवणीच्या वर्गामध्ये सर आम्हांला गणित शिकवीत होते. काही ध्वनी चित्रफिती ते दाखवीत होते. अचानकच त्या दोन्ही चित्रफितीच्या जागेवर मुलाचे आणि मुलीचे नग्न स्वरूपात खाजगी अवयव दिसू लागले. खरं तर आपण आपल्या खाजगी अवयवांवर वस्त्र घालतो, मात्र त्या चित्रात त्या अवयवांवर वस्त्रे नव्हती. खाजगी अवयवांना कोणी एक माणूस स्पर्श करीत होता. ते दाखवीत असताना सर म्हणत होते, आपण असे करू या. त्यांनी असे म्हटल्यावर आम्ही खूपच घाबरलो. आम्ही नाही करू देणार असे, आम्हांला नाही करायचे असे म्हणत आणि आम्ही तेथून पळ काढला. घरी तुम्हांला सांगितले तर तुम्ही रागवाल म्हणून आम्ही घाबरलो होतो. बरे झाले तुम्ही आम्हांला विचारले. बाबांनी मुलांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारली आणि म्हणाले, ''असे जे काही घडले आहे त्यात तुमची चूक नाही, उलट तुम्ही अशा गोष्टी सांगायलाच हव्यात. तुम्ही तुमच्या खाजगी अवयवांना स्पर्श करू दिला नाही आणि तेथून पळून आलात ही गोष्ट खूपच छान झाली. आता उद्यापासून तुम्ही शिकवणीला जायचे नाही. मी बोलतो तुमच्या सरांशी.'' मुलांनो, तुम्ही आम्हांला खूप जवळचे आहात. तुम्हांला कोणीही असे म्हटले की, तुमचे आई–बाबा आणि आमची खूप जवळची मैत्री आहे. त्यामुळे चुकीचे कृत्य आम्ही तुमच्या सोबत केले, तरी तुमच्यावर कोणी विश्वास ठेवणार नाही हे काही खरे नव्हे. आई–बाबांसाठी आपली मुले हे सर्वांत जवळचे असतात. त्यामुळे तुम्ही असे काही घडले असेल तर न घाबरता जरूर जवळच्या नातेवाईकांना, आई–बाबांना सांगायलाच हवे.

**प्रश्न :**

१) शिकवणीतून मुले का बाहेर पडली?

२) सरांनी त्यांना जे चित्र दाखविली, ती मुलांसाठी असुरक्षित होती का?

३) मुले घरी माहिती सांगण्यासाठी का घाबरत होती?

४) मुलांच्या बाबत काही विपरित घडले आहे हे बाबांना कसे कळले?

## इयत्ता नववी ते बारावी (माध्यमिक स्तर)

इयत्ता दहावीच्या वर्गातील मुलामुलींना मधल्या सुट्टीत अश्लिल चित्रफीत बघताना पाहिले. ही बाब शिक्षकांनी मुख्याध्यापक व पालकांच्या निदर्शनास आणून दिली. अश्लिल चित्रफीत पाहणे, एकमेकांशी देवाणघेवाण करणे यामुळे उद्भवणाऱ्या समस्या टाळणे गरजेचे समजण्यात आले.

त्यामुळे शालेय व्यवस्थापनाने इ. नववी ते बारावी इयत्तेत शिकणाऱ्या मुलांमुलींकरिता विशेष समुपदेशन सत्र आयोजित केले. पौगंडावस्थेतील बालकांमध्ये होणारे शारीरिक, मानसिक व भावनिक बदल व त्यांचा वर्तनावर होणारा बदल या अनुषंगाने समुपदेशन सत्रात चर्चा व मार्गदर्शन करण्यात आले.

समुपदेशकांनी अश्लिल चित्रफीती पाहणे, व्यसनाधिनता यांचा बालकांच्या भवितव्यावर होणारा दुष्परिणाम समजावून सांगितला.

तसेच पौगंडावस्थेतील बालकांना एचआयव्ही एड्स व लैंगिक सुरक्षितता याबद्दल तज्ज्ञांनी सखोल मार्गदर्शन केले.

**प्रश्न :**

१) विद्यार्थी कोणत्या प्रकारच्या चित्रफिती पाहत होते?

२) चित्रफिती पाहण्याचा मुलांच्या वर्तनावर कोणता दुष्परिणाम होतो?

३) शिक्षकांनी सदर समस्येवर काय उपाययोजना केली आहे.

४) समुपदेशन सत्राचे विद्यार्थी वर्तनावर काय परिणाम होतील?

वरीलप्रमाणे विविध वयोगटांनुसार सुरक्षानियमांची माहिती देण्यात आली आहे. बालवाडी ते दुसरीच्या मुलांना खासगी अवयवांची ओळख आणि नाही म्हणायला शिकवले जाते. तिसरी ते पाचवीच्या मुलांना अयोग्य स्पर्श किंवा चित्रफिती दाखवल्यास काय करावे हे समजावले जाते. सहावी ते आठवीच्या मुलांना लैंगिक शोषणाबाबतची समज दिली जाते, तर नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना इंटरनेट सुरक्षा आणि लैंगिक सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन केले जाते. या प्रकरणाचा मुख्य उद्देश मुलांना स्वतःचे संरक्षण कसे करावे आणि कोणत्याही परिस्थितीत त्यांची चूक नसते हे शिकवणे हा आहे.

❖❖❖

# ६. तंत्रज्ञान व बालकांची सुरक्षितता

**प्रस्तावना :**

आजच्या डिजिटल युगात तंत्रज्ञानाचा वापर जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात वाढत आहे. शिक्षण, मनोरंजन, संवाद, माहिती यामध्ये तंत्रज्ञानामुळे अनेक सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. बालकांसाठीही ही माध्यमे शिकवण्यासाठी व जगाशी जोडलेले राहण्यासाठी उपयुक्त ठरत आहेत. मात्र, तंत्रज्ञानाच्या वापरासोबतच काही धोके आणि आव्हानेही निर्माण झाली आहेत. विशेषत: बालकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या आव्हानांचा विचार करणे आवश्यक आहे.

ऑनलाईन जगतात बालकांना सायबर गुन्हे, छळ, फसवणूक, गैरवापर, अश्लील सामग्री आणि गोपनीयतेचा भंग यांसारख्या समस्यांना सामोरे जावे लागू शकते. त्यामुळे बालकांना सुरक्षित ठेवण्यासाठी केवळ तांत्रिक उपाययोजना नव्हे तर सामाजिक सजगता, पालक व शिक्षकांचे मार्गदर्शन तसेच कायदेशीर संरचना यांची आवश्यकता अधिक भासते.

बालकांच्या डिजिटल सुरक्षिततेसाठी सरकारने विविध धोरणे, मार्गदर्शक तत्त्वे आणि कायदे तयार केले आहेत. शाळा, पालक, समुदाय आणि तंत्रज्ञान वापरणाऱ्या सर्व घटकांनी एकत्रितपणे प्रयत्न केल्यासच बालकांसाठी एक सुरक्षित डिजिटल पर्यावरण निर्माण होऊ शकते.

या प्रकरणात तंत्रज्ञानाच्या अनुषंगाने बालकांच्या सुरक्षिततेशी संबंधित मुद्दे, धोके, उपाययोजना आणि जबाबदाऱ्या यांचा विचार करण्यात आला आहे. जेणेकरून प्रत्येक बालकाचा डिजिटल प्रवास सुरक्षित व सशक्त ठरेल.

## ६.१) विविध तंत्रज्ञान माध्यमे यांचा वापर व सुरक्षितता :

तंत्रज्ञान म्हणजे मानवाने विकसित केलेली साधने, प्रणाली आणि ज्ञानाचा संग्रह होय. ज्याचा उपयोग जीवन सुलभ, अधिक कार्यक्षम आणि प्रगत करण्यासाठी केला जातो. तंत्रज्ञानाचा मूळ हेतू मानवाच्या गरजा आणि समस्यांचे निराकरण करणे हा जरी असला तरी, सध्याच्या पिढीची ही तेवढीच समस्या देखील बनली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), डीप फेक, रोबोटिक्स या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर मानवी जीवनासाठी वरदान जरी ठरत असला तरी त्यातून निर्माण झालेल्या समस्या पालक, शिक्षक यांच्यासाठी डोकेदुखी ठरत आहेत.

### १) कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) :

संगणक प्रणालींना मानवी मेंदूसारखे विचार करण्याची, शिकण्याची निर्णय घेण्याची व समस्यांचे निराकरण करण्याची क्षमता देणारे तंत्रज्ञान म्हणजे AI होय. याचे मशीन लर्निंग व डिप लर्निंग असे दोन प्रकार आहेत.

AI मुळे वैयक्तिक सुरक्षितता पूर्णपणे धोक्यात आली आहे. आपली वैयक्तिक माहिती गोपनीय राहिलेली नसून AI आपली संपूर्ण माहिती उघड करते.

AI आधारित चॅटबॉक्स आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर बालकांना लक्ष्य करून त्याद्वारे अश्लील फोटो किंवा व्हिडिओ पसरवले जातात.

AI आधारित सोशल मीडिया ॲप्सवर चुकीच्या सौंदर्य मानकांचा प्रसार होतो त्यामुळे मुलींवर मानसिक दबाव येतो.

आपण जेव्हा इंटरनेटवर सर्फिंग करत असतो तेव्हा डेटा सायन्स माध्यमातून आपल्या गरजा शोधून त्याप्रमाणे कंपन्या गरजेनुसार सातत्याने कॉल करून विविध अमिषाला बळी पडतात. यातून लैंगिक शोषणाची शक्यता वाढते.

AI आधारित असलेले chat gpt हे ॲप सर्रासपणे वापरले जाते; परंतु बऱ्याच देशामध्ये हे संकेतस्थळ विद्यार्थ्यांसाठी बॅन केले आहे. AI मुळे मुलांना सहज माहिती मिळत असल्याने मुलांची सर्जनशीलता कमी होत आहे. तसेच या माध्यमातून चित्रे, व्हिडिओ हे रेडीमेड तयार करून दिले जातात. यातून हे फेक व्हिडिओ, प्रतिमा या पॉर्न वेबसाईटवर वापरले जातात.

### २) डिप फेक तंत्रज्ञान (Deep Fake Technology) :

हा देखील कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रकार आहे. याद्वारे आपला अस्सल, हुबेहुब व्हिडिओ, आवाज व प्रतिमा फेक निर्माण केली जाते. सोशल मीडियावरील फोटो, व्हिडिओ डाउनलोड करून फेक व्हिडिओद्वारे ब्लॅकमेलिंग केले जाते. तसेच हुबेहुब आवाजात घरी फोन करून पैसे तात्काळ ट्रान्सफर करायला लावले जातात. तसेच Deep fake चा वापर करून लैंगिक शोषणाचे प्रकार देखील घडले आहेत.

### ३) डिजिटल अरेस्ट :

याद्वारे फसवण्याचा नवीन प्रकार समोर आल्याचे दिसते. यामधून आपण पोस्टद्वारे, कुरिअरद्वारे पार्सल पाठवले आहे. ते कस्टम अधिकाऱ्यांनी पकडले आहे. ही बतावणी केली जाते. अवैधरित्या ड्रग्ज, कोकेन, इतर अवैध माल सापडला आहे. यामुळे आता आपण पैसे दिले नाही तर डिजिटल अरेस्ट होऊ शकते. त्यामध्ये आपला आधार क्रमांक, मोबाइल नंबर व इतर माहिती पार्सलवर असल्याचे सांगतात, नंतर आपणाला व्हिडिओ कॉल करून CBI, IT, ED अधिकाऱ्यांनी डिजिटल अरेस्ट केली आहे असे सांगून फेक पोलीस व इतर यंत्रणा दाखवली जाते. मग यातून मुलींचे लैंगिक शोषण ब्लॅकमेलिंगच्या साहाय्याने केल्याचे दिसते. परंतु अशा प्रकारची कोणतीही डिजिटल अरेस्ट शासनाकडून केली जात नाही.

### ४) डिजिटल पेमेंट्स :

डिजिटल पेमेंट्स म्हणजे ऑनलाइन साधनांद्वारे केलेल्या पैशांची देवाणघेवाण म्हणजेच डिजिटल पेमेंट्स होय. यासाठी G-pay, Phone pay व इतर अनेक ॲपचा सर्रास वापर केला जातो.

परंतु यामध्ये फेक UPI लिंकद्वारे फसवणूक केली जाते. बालकांना स्कॉलरशीप, फ्रि रिचार्ज किंवा कॅशबॅक ऑफर तसेच मुलींना ट्रॅप करणेसाठी फेक जाहिराती समोर येतात. यामुळे अनेक बालके बळी पडत असल्याचे दिसते. यामुळे आपले बँक खाते रिकामे होऊ शकते.

पेमेंट फेल झाल्यास गुगलवर चुकीचा कस्टमर केअर नंबर शोधला जाऊन फेक नंबरवर कॉल करून आपली माहिती देऊन देखील बालकांची फसवणूक केली जाते.

**उपाय योजना :**

- AI चा वापर संदर्भ शोधण्यासाठी केला पाहिजे.
- AI चा वापर करून परीक्षांमधील गैरप्रकार टाळण्यासाठी नैतिकतेचे महत्त्व समजावून सांगू शकतो.
- संदर्भ शोधण्यासाठी Google Scholar सारख्या वेबसाईटचा वापर करणे इष्ट ठरते.
- पालकांनी व शिक्षकांनी आठवडयातून एक दिवस 'No screen day' साजरा करावा.
- तंत्रज्ञानापासून दूर राहणेसाठी मुलांना निसर्गभ्रमंती, क्रीडा व बाहेरील उपक्रमामध्ये गुंतवून ठेवावे.
- विद्यार्थ्यांना सजगपणे नवीन तंत्रज्ञान समजण्यासाठी तज्ज्ञ मार्गदर्शकाचे वर्कशॉप्स व सेमिनारचे आयोजन करावे.
- डिजिटल डिटॉक्स म्हणजेच तंत्रज्ञानापासून विश्रांती घेण्यास प्रोत्साहित करणे.
- डिप फेक तंत्रज्ञानामुळे सचिन तेंडुलकर, अलिया भट असे बरेच तारेतारकांचे फेक व्हिडिओ बनवून प्रसारित केले जातात. यासाठी खरे व्हिडिओ, फोटो ओळखण्यासाठी, deepware, scanner, invid tools कसे वापरावेत हे शिकवावे.
- वैयक्तिक फोटो, व्हिडिओ तसेच इन्स्टाग्राम, फेसबुक, अनोळखी व्यक्ती यांच्या फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारू नयेत तसेच फेक प्रोफाईल तयार होऊ शकतात. यासाठी स्वतःची खरी माहिती शेअर करू नये.
- व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून आलेल्या फेक अॅपच्या लिंक तसेच अॅपची .exe फाईल मोबाईलवर डाऊनलोड करू नये. यातून मोबाईल हॅक होऊन सर्व माहिती सार्वजनिक करण्याची धमकी देणे, ब्लॅकमेलिंग करणे, खंडणी मागणे, लैंगिक अत्याचाराला बळी पडणे, या गोष्टी घडतात. त्यामुळे अनोळखी अॅप डाऊनलोड करू नये.
- जर कोणताही सायबर क्राईम बालकांसोबत घडत असेल अथवा घडला असेल तर तात्काळ Cybercrime.gov.in या संकेतस्थळावर आपली तक्रार नोंदवा. तसेच १९३० क्रमांक डायल करून आपण आपली तक्रार नोंदवू शकतो.

**उपाययोजना :**

- पेमेंट ट्रान्सफर करणेसाठी अधिकृत पेमेंट ॲपचा वापर करावा म्हणजेच बँकेचे ॲप वापरा.
- क्यूआर कोड स्कॅन करण्यापूर्वी योग्य ती खातरजमा करावी.
- OTP, बँक खाते माहिती फक्त अधिकृत वेबसाईटवरच शेअर करावी. OTP संदर्भात फेक कॉल आल्यास कोणालाही शेअर करू नये.

## ६.२) सायबर गुन्हे आणि बालके :




सायबर गुन्हे ही एक विस्तृत संज्ञा आहे. अशा गुन्ह्यांमध्ये संगणक किंवा संगणकाच्या नेटवर्कचा एक साधन म्हणून वापर केलेला असतो. याखेरीज एखाद्या संगणकावर, नेटवर्कवर हल्ला झाल्यास त्याचाही या सायबर गुन्ह्यात समावेश होतो. संगणकाचा वापर गुन्हेगारी कृत्यांसाठी करणे म्हणजे सायबर गुन्हा! अशा गुन्ह्यात एखादा पासवर्ड देणे असो, की एकाच वेळी अनेकांनी हल्ला करून एखादे संकेतस्थळ बंद पाडणे असो अशा अनेक प्रकारच्या बेकायदेशीर गोष्टींचा सायबर गुन्ह्यांत समावेश होतो. यामध्ये पारंपारिक प्रकारच्या गुन्ह्यांतही संगणकाचा, सेलफोनचा किंवा नेटवर्कचा बेकायदेशीर कामांसाठी वापर केला गेला, तर तेही याच सदरात येतात. थोडक्यात सांगायचे झाले, तर संगणक आणि आंतरजालाचा बेकायदेशीर वापर म्हणजे सायबर गुन्हा. सायबर गुन्हेगार संगणक तंत्रज्ञानाचा वापर करून खाजगी माहिती, व्यावसायिक गुपिते मिळवू शकतात. आंतरजालाचा वापर शोषणासाठी किंवा वाईट उद्देशांसाठी केला जातो.

### अ) सायबर गुन्हे नेमके का होतात? :


आंतरजालाचा सोपा झालेला वापर आणि सहज, स्वस्त उपलब्धता, तरुण आणि लहान मुले यांमध्ये उच्च तंत्रज्ञान वापरण्याचे वाढते प्रमाण, सोप्या मार्गाने झटपट पैसा मिळविण्याचा प्रयत्न, सायबर गुन्हे केल्यावर होणाऱ्या कायदेशीर परिणामांबद्दल असणारे अज्ञान, नव्या तंत्रज्ञानाविषयी असणारे कुतूहल आणि उत्सुकतेपोटी केलेले प्रयोग यांमुळे गुन्ह्यांचे प्रमाण वाढते आहे. निष्काळजीपणामुळे सायबर गुन्हेगारांना आपली संगणक यंत्रणा वापरण्याची संधी मिळते. त्यावर त्यांना स्वत:चे नियंत्रणही मिळविता येते. आपला भ्रमणध्वनी लॉक करायला विसरणे, पासवर्ड इतरांना देणे, सायबर कॅफेसारख्या सार्वजनिक ठिकाणी संगणक वापरल्यास अकाऊंटमधून लॉग आऊट करायला विसरणे यासारख्या गोष्टींमुळे सायबर गुन्ह्यांमध्ये भर पडते. आता सायबरगुन्हा या गुन्ह्यांच्या प्रकारांमध्ये नेमके काय काय समाविष्ट होते याबाबतच्या 'संज्ञा' आपण जरा जाणून घेऊ या.

१) **हॅकिंग** : सायबर जगतात सर्वाधिक संख्येने घडणारा गुन्हा म्हणजे हॅकिंग होय. एखादी कॉम्प्युटर यंत्रणा किंवा खाजगी नेटवर्कमध्ये परवानगीशिवाय घुसखोरी करण्याचा केलेला प्रयत्न. कॉम्प्युटर नेटवर्कमध्ये हा अनधिकृत मिळविलेला प्रवेश व तिच्यावर मिळवलेले नियंत्रण कुठले तरी बेकायदेशीर कृत्य करण्यासाठी केलेला असतो. हॅकिंगचे कृत्य करणाऱ्या व्यक्तीला हॅकर असे म्हणतात.



अनेकदा अगदी लहान मुलेदेखील वाय फाय, ऑनलाइन गेम्स, समाजमाध्यमांवरचे दुसऱ्याचे खाते यांचे हॅकिंग करतात. तुमच्याकडे अधिकृत परवाना नसेल, तर असे हॅकिंग करणे बेकायदेशीर आहे. हॅकिंग करणे, लहान मुलांमध्ये अत्यंत 'कूल' समजले जाते. भारतीय माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार हॅकिंग हा दंडनीय अपराध आहे. असे असले तरी, इंटरनेट सुरक्षिततेबाबत आणि गुन्ह्यांविरोधात कायदेशीर उपाययोजनांबद्दल जागरूकता कमी असल्यामुळे अनेकदा अशा गुन्ह्यांना फारसे गंभीरपणे घेतले जात नाही.

२) **फोटो मॉर्फिंग :** सॉफ्टवेअरच्या साहाय्याने एका प्रतिमेचे दुसऱ्या प्रतिमेत बेमालूमपणे रूपांतर करता येते. यालाच मॉर्फिंग असे म्हणतात. एखाद्याची मुद्दाम बदनामी, त्रास, छळ, अपमान होईल अशी परिस्थिती निर्माण करायची असेल, तर या पद्धतीचा गैरवापरही केला जातो. असे बदनामीकारक मॉर्फिंग करणे हा सायबरगुन्हा समजला जातो.





उदा. आपण नवव्या इयत्तेतील दोन मैत्रिणींचेच उदाहरण पाहू. त्यांना आपण 'अ' आणि 'ब' असे म्हणू. या दोघींमधली 'अ' ही जास्त आक्रमक स्वभावाची आहे. अनेकदा ती 'ब' ला आपली कामे करायला लावते. 'ब' साधीभोळी आहे. ती मुकाट्याने 'अ' च्या सूचनांचे पालन करते. मात्र एकदा 'अ' ने सांगितलेल्या गोष्टी चुकीच्या आहेत असे वाटल्याने

'ब' ने ते काम करायला नकार दिला. याचा 'अ' ला खूप राग आला. तिने ब ला धडा शिकवायचे ठरविले. मग 'अ' ने 'ब' चे व्हॉट्सअ‍ॅपच्या डीपीला असणारे छायाचित्र डाऊनलोड केले आणि त्या चेहऱ्याखाली एका नग्न मुलीचे चित्र चिकटविले. तिने तयार केलेल्या व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपवर हे नवे छायाचित्र टाकून तिची बदनामी करायला सुरुवात केली. 'ब' चे नग्न छायाचित्र पाहून व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपवर एकच हलकल्लोळ उडाला. त्यानंतर लगेचच त्याखाली अनेक अश्लील टिपण्या, नवी छायाचित्रे, मिम्स आणि नंतर व्हिडिओसुद्धा पोस्ट होऊ लागले. या सगळ्याचा 'ब' च्या मानसिक अवस्थेवर खूप परिणाम झाला. 'ब' च्या आईवडिलांनी 'अ' आणि इतर मुलांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली.

मुलांमध्ये इंटरनेट सुरक्षिततेबाबत कोणतेच शिक्षण किंवा जागरूकता नसल्याने अनेकदा ती नकळतपणे सायबर गुन्हे करतात. आपण कधीच पकडले जाणार नाही असाही त्यांना प्रचंड आत्मविश्वास असतो. आपले स्वतःचे मूल सायबर गुन्हा करू शकते याबद्दल पालकांच्या मनात साशंकता असते. पालक अशी गोष्ट क्वचितच मान्य करतात. (फार तर आपले मूल सायबर गुन्ह्याला बळी पडू शकेल, एवढेच त्यांना मान्य असते.) मुलांनी केलेल्या अशा गुन्ह्यांमुळे होणाऱ्या गंभीर परिणामांबद्दल त्यांना जागरूक करणे जरुरीचे आहे. इंटरनेटचा वापर अधिक जबाबदारीने कसा केला जाईल हे पहावे.




**ऑनलाईन जुगार :** इंटरनेटवर अथवा इंटरनेटशिवाय खेळला जाणारा जुगार कायद्याने गुन्हा आहे. इंटरनेटवर असे अनेक गेम्स, ॲप आहेत ज्याच्यामध्ये पैसे लावून गेम्स खेळले जातात. खरे तर अशा प्रकारे जुगार खेळणे गुन्हा आहे. बरेचदा मुद्दाम अशा गेम्सचे नोटिफिकेशन बालकांकडे पाठविण्यात येते. त्यामुळे आपली मुले फोनवर, इंटरनेटवर नक्की काय खेळतात हे पालक, शिक्षक म्हणून आपण माहीत करून घेणे आवश्यक आहे.

३) **फेक अकाऊंट :** फेक अकाऊंट म्हणजे कुणीतरी स्वत:ला दुसरी व्यक्ती असल्याचे भासवते. मात्र मुळातच अशी व्यक्ती अस्तित्वात नसते. थोडक्यात दुसऱ्या व्यक्तीची परवानगी न घेताच हे खाते सुरू केले जाते. यामध्ये पाळीव प्राणी, सेलिब्रिटी संस्था किंवा अगदी काल्पनिक नावांनीसुद्धा खोटी अकाऊंटस उघडलेली असतात. म्हणजेच हा दुसऱ्या व्यक्तीची बनावट ओळख तयार करण्याचा प्रकार असतो. यातूनच त्या व्यक्तीच्या नावाचा गैरवापर केला जाऊ शकतो. थोडक्यात, एखाद्या माणसाने स्वत:ची अनेक आधारकार्ड किंवा पासपोर्ट तयार करण्यासारखा हा गंभीर गुन्हा आहे.

मुले अनेकदा अशी फेक अकाऊंट किंवा प्रोफाईल तयार करतात. त्यामागे मुख्य कारण म्हणजे इंटरनेटवर आपण काय करतो हे पालकांना समजू द्यायचे नसते. अशा फेक आयडीमुळे इंटरनेटवर मुले एखादी अनुचित गोष्ट बघत असतील, तर पालकांना किंवा अन्य कुणाला कळत नाही.

४) **इंटरनेटवरून माहिती काढणे (Cyber Stalking) :** समाजमाध्यमे सगळीकडे मोठ्या प्रमाणात वापरली जाऊ लागल्याने एखाद्याला इंटरनेटवर 'फॉलो करणे' हे अगदी सोपे झाले आहे. शिवाय त्या व्यक्तीबद्दलची माहिती काढणे. तिच्या वर्तनाबद्दल जाणून घेणे यासाठीचे एक सोपे साधन गुन्हेगारांच्या हाती आले आहे. सायबर मानसशास्त्राच्या भाषेत सांगायचे झाले,




तर सायबर स्टॉकिंगमध्ये इंटरनेटसारख्या सुविधांचा वापर करून एखाद्या व्यक्तीचा पाठलाग करणे, त्यावर लक्ष ठेवणे, त्याला छळणे या गोष्टींचा समावेश होतो. त्या व्यक्तीची बदनामी करणे, त्रास देणे, तिला चिडायला लावणे किंवा त्या व्यक्तीला आपल्या फायद्यासाठी काहीतरी करायला भाग पाडणे या साऱ्या गोष्टींचा समावेश या गुन्ह्यात होतो. असे गुन्हे एखाद्या व्यक्तीबाबत नाही तर एखाद्या गटाबाबतही घडू शकतात.

उदा. एका सधन कुटुंबातील तरुण मुलाची सन २००७ मध्ये ऑनलाईन गेमिंग दरम्यान त्याची पाच लोकांशी मैत्री झाली. या पाच जणांनी त्याच्याशी चॅटींगच्या माध्यमातून सतत संपर्क ठेवला. पुढे एकदा त्यांनी त्याला एका मॉलमध्ये प्रत्यक्ष भेटीसाठी बोलावले. भेटीदरम्यान या लोकांनी त्याच्या पेयामध्ये गुंगीचे औषध मिसळून त्याला पाजले. त्याचे अपहरण करून त्या गुंडांनी त्याच्या पालकांकडे २ कोटी रुपयांची खंडणी मागितली. या अपहरणाची बातमी वेगवेगळ्या प्रसार माध्यमातून झळकू लागली. ती पाहून घाबरून अपहरण कर्त्यांनी मुलाचा गळा दाबून खून केला. त्याच्या प्रेताची विल्हेवाट लावली. पुढे न्यायालयात या पाचही जणांना शिक्षा झाली, मात्र एका १६ वर्षाच्या तरुणाला आपले आयुष्य गमवावे लागले. त्याचे कुटुंब आणि मित्र यांचे कधीही भरून न येणारे नुकसान झाले.

कोणत्याही अनोळखी व्यक्तीसोबत चॅट करू नका. कुठलीही वैयक्तिक माहिती त्यांना देऊ नका. त्यांना कधीही प्रत्यक्ष भेटू नका. संगणकाच्या किंवा भ्रमणध्वनीच्या पडद्याआडून त्यांच्याशी खरोखरच कोण संपर्क करते आहे, हे आपल्याला कधीच समजू शकत नाही. अशा व्यक्तींचे उद्देश कोणते हेही आपल्याला नक्की ठाऊक नसते.


### ५) ऑनलाईन माध्यमाद्वारे बालकांना गोडीगुलाबीने दुष्कृत्य करायला भाग पाडणे (Child online grooming) :

सायबर जगतात बालकांसोबत घडणाऱ्या गुन्ह्यांमधील हा एक अत्यंत घाणेरडा प्रकार आहे. ऑनलाईन ग्रुमिंगमध्ये एखादी व्यक्ती आंतरजालचा वापर करून अल्पवयीन बालकांना लैंगिक कृती करण्यास भाग पाडते. उदाहरणार्थ त्यांचा नग्नावस्थेतील फोटो, व्हिडिओ पाठवायला सांगणे. अर्थातच त्यांना अशा प्रकारच्या लैंगिक कृती करायला सांगण्याअगोदर इंटरनेटवरील गुन्हेगाराने त्यांचा विश्वास अगदी पूर्णत: संपादित केलेला असतो.

उदा. आताच अशी केस दोन लहान मुलांच्या बाबतीत घडली. हे बहीण–भाऊ अनुक्रमे ६ आणि ८ वर्षांचे होते. पालकांच्या अनुपस्थितीत ही मुले इंटरनेटवर सर्फिंग करत होती. त्यावेळी चुकून त्यांनी एक पॉपअप विंडो उघडली. मग तिथून ते वेगळ्याच वेबपेजला गेले. तिथे लोक व्हॉइस चॅट (ध्वनी) आणि वेबकॅम वापरून एकमेकांशी बोलत होते. तिथे या लहान मुलांची एका व्यक्तीशी ओळख झाली. सुरुवातीला या व्यक्तीने मुलांसोबत व्हॉईस चॅट करायला सुरुवात केली. त्याने हे व्हॉईस चॅट पालकांना सांगू नये असे या मुलांना सांगितले. नंतरच्या काही दिवसांत या ऑनलाईन गप्पांचा कालावधी वाढायला लागला. त्याने या मुलांना ज्या गोष्टींबद्दल उत्सुकता होती त्याबाबत शिकवायला, फोटो पाठवायला सुरुवात केली. लवकरच या चित्रांमध्ये थोड्या प्रमाणात लैंगिक आशय असणारे फोटोही येऊ लागले. मात्र तोवर या बालकांचा त्या व्यक्तीवर पूर्णपणे विश्वास बसलेला होता. तो जे जे सांगत होता त्याप्रमाणे ही मुले वागत होती. आता व्हॉईस चॅटऐवजी ते एकमेकांशी वेबकॅम वापरून व्हिडिओ चॅट करू लागले. एके दिवशी अचानक या मुलांच्या आईला त्या टॅबवर काही अश्लील व्हिडिओ आढळले. त्यांपैकी काही व्हिडिओजमध्ये ही दोन मुलेदेखील सामील होती. हा प्रकार पाहून त्यांच्या पालकांना धक्का बसला. लगेच पोलिसांना याची कल्पना देण्यात आली. पोलिसांनी शर्थीने प्रयत्न करून त्या गुन्हेगाराला पकडले. अशाप्रकारे मुलांना फूस लावून अश्लील कृत्ये करून घेणे, या पोर्नोग्राफीला लैंगिक शोषण असणारी सामग्री (CSAM) समजले जाते. दुर्दैवाने अशा प्रकारच्या पोर्नोग्राफीला जगभरात मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. सायबर जगतातल्या सर्वांत वाईट प्रकारच्या गुन्ह्यांपैकी हा एक गुन्हा समजला जातो. सध्या जागतिक पातळीवर याबाबत चिंता व्यक्त करण्यात येत आहे. याचे अनेक गंभीर कायदेशीर परिणामही होतात.

अशा प्रकारे मुलांचे लैंगिक शोषण होत असलेले फोटो वा व्हिडीओ इंटरनेटवर आढळले, तर कृपया ते फॉरवर्ड करू नका. त्याबद्दलची कल्पना www.cibercrime.gov.in आणि www.aarambhindia.org या पोर्टलवर द्या. अशा प्रकारचा आशय इंटरनेटवरून ताबडतोब हटविला जावा यासाठी हे पोर्टल सदैव कार्यरत असतात.

**६) सायबर बुलिंग – इंटरनेटवरची टगेगिरी :** इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा वापर करून एखाद्या व्यक्तीचा छळ, बदनामी, अपमान, चेष्टा, टिंगल, तिला लाज वाटेल असे, धमकावणारे संदेश पाठविणे म्हणजे सायबर बुलिंग अशा टगेगिरीची सुरुवात करणारी व्यक्ती ही या बालकांच्याच समाज गटातली असते. सहसा टगेगिरी करणाऱ्या मुलाचे त्या समाज गटातील स्थान वरचे असते; हे केवळ ओळखीच्याच नव्हे, तर अनोळखी व्यक्तींबाबतही दिसून येते.



भारतामध्ये दर तीन मुलांपैकी एकाला इंटरनेटवरच्या टगेगिरीला सामोरे जावे लागते, असे नुकतेच एका संशोधनात आढळून आलेले आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात ही टगेगिरी चालत असते. अगदी ८–९ वर्षांची बालकेसुद्धा यात गुंतलेली दिसतात. बालक स्वतंत्रपणे आपल्या किंवा पालकांच्या स्मार्ट उपकरणांवरून इंटरनेटद्वारे समाज माध्यमांचा वापर करू लागल्याच्या काळापासूनच हे बघायला सुरुवात होते. अशा टगेगिरीला बुलिंग (Bullying) अशी तांत्रिक संज्ञा असली तरी याला सामान्यत: रॅगिंग असेही म्हटले जाते. असे रॅगिंग जेव्हा ऑनलाईन स्वरूपात घडते तेव्हा त्याला सायबर–बुलिंग असे म्हणतात.

उदा.


- वारंवार चेष्टा करणे, वाईट वाटेल अशा प्रकारे वागणे.
- त्रास होईल अशा प्रकारच्या गोष्टी बोलणे.
- टिंगलटवाळी करणे. (शाब्दिक, फोटोंच्या माध्यमातून)
- एखाद्या गटात सामील करून न घेणे, अन्य व्यक्तींच्या मनात तुमच्याबद्दल नकारात्मक भावना तयार करणे.




- इजा होईल अशा प्रकारचे कृत्य करणे, (ऑनलाईन, प्रत्यक्ष जगतातील शारीरिक हिंसा, शाब्दिक किंवा भावनिक हिंसा)
- दुसऱ्याला त्रास देण्याचे छळ करण्याचे अनेक मार्ग असतात. शिवाय असा छळ करणारे लोक दरवेळी नवनव्या युक्त्या शोधून काढत असतात.

## ब) इंटरनेटमुळे होणारे मानसिक आजार

१) **मोबाईल, गेमिंग, पोर्नोग्राफी व्यसन :** इंटरनेट आणि भ्रमणध्वनीच्या अतिरेकी वापरामुळे लहानांपासून थोरांपर्यंत सगळ्यांची वाटचाल इंटरनेट व भ्रमणध्वनीच्या व्यसनाकडे सुरू झालेली आहे. DSM 5 म्हणजेच Diagnostic and Statistical Manual of Mental Disorders, 5th Edition : DSM-5 2013-14 मध्ये इंटरनेट व भ्रमणध्वनीचा अतिरेकी वापर हे एक व्यसन आहे हे मान्य केले गेले आहे. २०१६ साली ऑनलाइन गेम्सचे व्यसन होऊ शकते हे मान्य केले आहे. अगदी लहान वयापासून मुले भ्रमणध्वनी आणि इतर गेमिंग प्लॅटफॉर्मचा वापर करताना दिसतात. गेल्या काही वर्षांत ऑनलाईन गेमिंगचे व्यसन वाढताना दिसत आहे.



२) **भ्रमणध्वनीचे व्यसन :** भ्रमणध्वनीवरचे जग अत्यंत आकर्षक आहे. यात मनोरंजन, खेळ, समाज माध्यमासारख्या अनेक आकर्षक गोष्टी आहेत. त्यामुळे आजूबाजूच्या जगाचे भान न राहता, सतत अनेक तास मुले आणि मोठी माणसे भ्रमणध्वनी वापरताना दिसत आहेत. आपण अनेकदा भ्रमणध्वनीवर अवलंबून आहोत. घड्याळाचा अलार्म, टेलिफोन नंबर्स, अगदी जवळच्या लोकांच्या वाढदिवसाची आठवण सुद्धा भ्रमणध्वनीच करून देतो. भ्रमणध्वनीवर अवलंबून असणे आणि भ्रमणध्वनीचे व्यसन यांत अगदी धूसर रेषा आहे. याचे व्यसन लागलेल्या व्यक्तींना स्थळा-काळाचे भान राहत नाही. त्यांच्या हातून भ्रमणध्वनी खेचून घेतला तर अत्यंत हिंसक अशा प्रतिक्रिया बघायला मिळतात. अशा प्रकारे भ्रमणध्वनीचे व्यसन असलेली व्यक्ती आपल्या आजूबाजूला असेल, तर त्याला योग्य व्यक्तीची मदत (समुपदेशक, मानसोपचार तज्ज्ञ) मिळवून देणे आपले कर्तव्य आहे.

३) **ऑनलाईन खेळाचे व्यसन :** भ्रमणध्वनीमुळे लाखो ऑनलाईन खेळ खेळण्याची संधी सगळ्यांना मिळालेली आहे. परंतु आपल्या वयासाठी योग्य असलेला खेळ बनविण्याची परिपक्वता मोठ्यांमध्ये सुद्धा दिसत नाही. पब्जी, काउंटर स्ट्राइक, कॉल ऑफ ड्यूटी, ग्रंड थिफ्ट ऑटो यांसारखे सोळा वर्षे पूर्ण झालेल्या मुलांसाठी असलेले गेम्स, अगदी सहा-सात वर्षांची मुले देखील खेळताना दिसतात. रिस्पॉन्सिबल नेटिझम या संस्थेने मुंबईत केलेला सर्व्हे असे सांगतो, की दहा ते अठरा या वयोगटातील मुले आवडीने खेळतात अशा दहा ऑनलाइन खेळांपैकी ९ खेळ अत्यंत हिंसाचाराने, अश्लील दृश्यांनी भरलेले आहेत. बऱ्याचदा बालकांना या खेळामुळे

त्यांच्या मनावर व शरीरावर होणाऱ्या परिणामांची जाणीव नसते. आपल्या वयासाठी योग्य असलेले गेम्स बनविले पाहिजेत याविषयी बालकांना वारंवार जाणीव करून देणे गरजेचे आहे. भ्रमणध्वनीचे व्यसन लागलेली अनेक बालके आपल्या आजूबाजूला दिसून येतात.

**भ्रमणध्वनी व्यसनाची काही लक्षणे :** अत्यंत आक्रमक होणे, वारंवार नैराश्य येणे, अभ्यासात, कामात लक्ष न लागणे. रात्रंदिवस या गेम्सचा विचार करणे, सतत खेळत राहणे इत्यादी. अशा व्यक्तीच्या हातून भ्रमणध्वनी काढून घेतला तर अत्यंत हिंसक किंवा टोकाची प्रतिक्रिया येते. अशा वेळी त्या व्यक्तीला समुपदेशक अथवा मानसोपचार तज्ज्ञांकडे तात्काळ घेऊन जाणे गरजेचे आहे.

**पोर्नोग्राफीक साहित्याचे व्यसन :** अत्यंत लहान वयात हातात आलेल्या भ्रमणध्वनीमुळे इंटरनेटच्या जगात मुलांचा अनिर्बंध वावर सुरू झालेला आहे. बऱ्याचदा जाणता-अजाणता ती इंटरनेटवरील वेगवेगळ्या पोर्नोग्राफीक साइट्स बघतात. याचे दूरगामी परिणाम त्यांच्या वागण्यातून जाणवतात. काही वेळा अगदी लहान वयात असे फोटो आणि व्हिडिओ बघितल्यामुळे या विषयीचे आकर्षण वाढून व्यसन लागण्याची शक्यता असते. त्यामुळे लवकरात लवकर मुलांशी लैंगिकतेविषयी बोलणे गरजेचे आहे. शरीरातील सर्व अवयवांची शास्त्रीय नावांसह योग्य ती ओळख करून देणे गरजेचे आहे.

भ्रमणध्वनी, गेमिंग आणि पोर्नोग्राफी या तीन ही प्रकारच्या व्यसनांमध्ये एखादी व्यक्ती व्यसनग्रस्त आहे हे ओळखणे गरजेचे आहे. योग्य त्या समुपदेशनाने व औषधोपचाराने या तीन ही प्रकारच्या व्यसनांपासून मुक्ती मिळू शकते.

## ६.३) बालकांच्या ई-माध्यमे वापरासंदर्भात सजग पालकत्व :

बालकांच्या सुरक्षिततेसाठी ई-माध्यमांचा वापर करताना सजग पालकत्व अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण ई-माध्यमांचा वापर प्रथम गरज, मग छंद होतो नंतर त्याचे व्यसन जडते आणि हे बालकाच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याला आणि त्यांच्या सुरक्षिततेला प्रचंड हानिकारक ठरते. हे समजण्याचे आणि उमजण्याचे वय बालकाचे नसते, त्यामुळे पालक म्हणून **'डिजिटल वेलनेस'** समजून घेणे हे क्रमप्राप्त ठरते. सुजाण व सजग पालकत्व बालकाचे शारीरिक, मानसिक व बौद्धिक स्वास्थ टिकवून पाल्याचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रभावी मार्ग आहे.

'डिजिटल वेलनेस' म्हणजे स्वतःचे किंवा इतरांचे जीवनमान उंचावण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करणे. आजकाल जन्मापासूनच ई-माध्यमांचा वापर करण्याची गरज पालकांना पडत आहे. हीच गरज अपरिहार्यता बनते आणि एका क्षणी पालकांना त्याचा प्रतिबंध करण्याच्या कठोर निर्णयापर्यंत जावे लागते. मात्र अशा परिस्थितीमध्ये बालकाच्या मानसिक स्वास्थावर विपरित परिणाम होण्याची दाट शक्यता असते, बालकाची असुरक्षितता वाढते, त्यामुळे पुढील भूमिका पालकांनी समजून घेणे गरजेचे आहे.

## १) सुरक्षित आणि आकर्षक वातावरण :

डिजिटल ई–माध्यमांपासून दूर ठेवणारी खेळणी, चित्रे, मुक्तखेळाचे साहित्य हे बालवयापासून घरात असणे किंवा जाणीवपूर्वक ठेवणे गरजेचे आहे. जेणेकरून मूल सहजपणे त्याकडे आकर्षिले जाईल. ई–माध्यमांव्यतिरिक्त इतरही माध्यमांतून आपल्याला अनेक गोष्टींमधून आनंद मिळतो हे बालकाला कळेल.

## २) ई–माध्यमांच्या वापरासंबंधी कडक शिस्त ठेवणे :

बालकाला ई–माध्यमाचे फायदे–तोटे याची जाण नसते. त्यामुळे पालक म्हणून ई–माध्यमांच्या वापराच्या सीमा व मर्यादा सेट कराव्या लागतील. गुगलने बनविलेले 'डिजिटल वेल बिईंग' या सॉफ्टवेअरचा वापर करून मर्यादा निश्चित कराव्यात. त्यामुळे ठरावीक वेळेनंतर बालक वापरत असणारे ॲप्स आपोआप बंद होतील. बालकांना योग्य वेळी आणि योग्य ठिकाणी ई–माध्यमांचा वापर कसा करावा याबद्दल सातत्याने मार्गदर्शन करावे. पालकांनी बालकाची ऑनलाइन सक्रियता तपासून त्यांना अनावधानाने धोक्यात टाकणाऱ्या सामग्रीपासून वाचवायला हवे.

## ३) सुरक्षितता व गोपनीयतेचे ज्ञान देणे :

पालकांनी बालकांना ई–माध्यमांवरील स्वत:च्या गोपनीय माहितीचे प्रसारण कसे धोक्याचे ठरू शकते याची माहिती दिली पाहिजे. अनोळखी व्यक्तींशी संपर्क करण्यापासून अपमानजनक किंवा अत्याचारासंबंधी सामग्रीपासून वाचवायला शिकवले पाहिजे तसेच सोशल मीडियावर गोपनीयता सेटिंग्ज कशा वापराव्यात हे दाखविणे महत्त्वाचे आहे.

## ४) सामग्री निवडीसाठी मार्गदर्शन :

ई–माध्यमांचा वापर करताना बालकांसमोर प्रचंड चांगल्या तसेच वाईट महितीचा पेटारा अमर्याद वेळ आणि काळासाठी खुला होतो. त्याला अंत नाही. त्यामुळे पालकांनी योग्य ई–सामग्री निवडण्यास मदत करावी. अयोग्य सामग्री वापरण्याचे दूरगामी दुष्परिणाम कसे होऊ शकतात यावर बालकासोबत चर्चा करावी. ज्या ॲप्समध्ये हानिकारक सामग्री असू शकते किंवा गोपनीयतेला धोका आहे अशा ॲप्ससाठी सतर्क रहा.

## ५) धोक्याची ओळख करून देणे :

ई–माध्यमे वापरताना लहान मुलांना टार्गेट ठेवून फसवणूक, पिळवणूक, शोषण करणारा गुन्हेगारी वर्ग अस्तित्वात आहे याची जाणीव मुलांना करून देणे. वाढत्या सायबर गुन्ह्यांची पालक म्हणून स्वतः माहिती करून घेणे व बालकांना या धोक्यांची पूर्वसूचना देऊन त्यांना सुरक्षित ठेवणे.

## ६) पालकांनी आदर्श आचरण ठेवणे :

३ ते ५ वर्षे वयाची मुले असतानाच त्यांच्यासमोर मोबाइल, टीव्ही यांचा अल्प वापर व पुस्तके वाचन, चित्र रेखाटन, भटकंती. बालकांसोबत मैदानावर भ्रमण, गोष्टीचा तास इ. आदर्श कृती

ठेवल्यास बालक या गोष्टीचे अनुकरण करेल. पालक म्हणून आदर्श आचरणातून सुयोग्य संस्कार करणे गरजेचे.

### ७) शिक्षणाचे डिजिटल धोरण समजून घेणे :

सजग पालक म्हणून शिक्षणाची बदलती धोरणे समजून घेतली पाहिजेत. विविध शैक्षणिक ॲप आज उपलब्ध आहेत. २०२० च्या राष्ट्रीय शिक्षण धोरणात डिकोडिंग प्रोग्रामिंग या गोष्टींना प्राधान्य दिले गेले आहे. या धोरणांची माहिती घेऊन शिक्षण हे सर्वांग परिपूर्ण, तंत्रज्ञानाधारित व संस्कारक्षम, आर्थिक सक्षम बनवणारे करण्यास पालकांचे सहकार्य अपेक्षित आहे.

खरे तर ई–माध्यम हे दुधारी शस्त्रांप्रमाणे आहे. योग्य वापर योग्य ध्येयापर्यंत पोहोचवते आणि अयोग्य वापर अपयशापर्यंत ढकलते अशा परिस्थितीत पालकांनी सजग राहून तंत्रज्ञानाचा चांगल्या गोष्टींसाठी वापर करण्यास बालकाला प्रवृत्त केले पाहिजे. शिक्षण तंत्रज्ञानाशिवाय प्रभावी होणार नाही. हे सत्य स्विकारायला हवे मात्र हे करीत असताना बालकाची सुरक्षितता जपण्याची जबाबदारी पालकांची आहे.

### ८) निगराणी आणि संवाद :

पालकांनी आपल्या मुलांसोबत नियमित संवाद साधून त्यांचे ऑनलाइन अनुभव जाणून घेतले पाहिजेत. जर मुलांना ऑनलाइन समस्यांचा सामना करावा लागत असेल, तर पालकांनी त्यांना मदत करण्यास तयार राहिले पाहिजे तसेच मुलांसोबत त्यांचे ऑनलाइन जीवन सुरक्षित ठेवण्यासाठी थोडक्यात चर्चा करणे आवश्यक आहे. आपले बालक कोणते फोटो, व्हिडिओ ऑनलाइन शेअर करते याकडे बारीक लक्ष ठेवा.

जर तुमचे मूल ऑनलाइन क्रियाकलापांमध्ये आवश्यकतेपेक्षा जास्त गुंतले असेल तर त्याला वेळीच सावध करा. त्याच्या बाबतीत सायबर क्राईम घडल्यास त्याला तात्काळ धीर देऊन आवश्यक ती मदत उपलब्ध करून द्या.

### ९) सुरक्षित प्लॅटफॉर्म आणि उपकरणे वापरणे :

पालकांनी विश्वासहार्य व सुरक्षित डिजिटल प्लॅटफॉर्म्स वापरावे. तसेच इन्फॉर्मेशन सिक्युरिटी टूल्स (जसे की, अँटीव्हायरस सॉफ्टवेअर) आणि निगराणी साधने वापरणे आवश्यक आहे.

ई–माध्यमे आणि इंटरनेटचा वापर अधिकाधिक वाढत असताना, पालकांनी बालकांना योग्य मार्गदर्शन देऊन सुरक्षित आणि सकारात्मक डिजिटल अनुभव मिळवून देण्यासाठी सजग राहणे अत्यंत आवश्यक आहे.

❖❖❖

# ७. शालेय वातावरण व विद्यार्थी सुरक्षितता

**प्रास्ताविक :**

सुरुवातीच्या काळात, मुले त्यांच्या स्वतःच्या घराव्यतिरिक्त इतर कोणत्याही ठिकाणापेक्षा शाळेत जास्त वेळ घालवतात. शाळेत, मुलांना शिकण्यास आणि वाढण्यास मदत करण्यासाठी सुरक्षित, सकारात्मक आणि आरामदायी वातावरणाची आवश्यकता असते. सर्व वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित शिक्षण वातावरण आवश्यक आहे. त्याशिवाय ते यशस्वी शिक्षण आणि भविष्यासाठी आवश्यक कौशल्ये शिकण्यावर लक्ष केंद्रित करू शकत नाहीत. स्थानिक ते संघ राज्यापर्यंत सरकारच्या सर्व स्तरांवर शालेय सुरक्षेचा मुद्दा एक प्रमुख चिंतेचा विषय आहे.

''शाळेतील सुरक्षितता'' म्हणजे मुलांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करणे, त्यांच्या घरापासून ते त्यांच्या शाळेपर्यंत आणि परत येईपर्यंत. यामध्ये कोणत्याही प्रकारच्या गैरवापरापासून, हिंसाचारापासून, मानसिक-सामाजिक समस्यांपासून, नैसर्गिक आणि मानवनिर्मित, आग, वाहतूक यांपासून सुरक्षितता समाविष्ट आहे. भावनिक सुरक्षितता विशेषतः महत्त्वाची आहे कारण शिक्षक आणि पालकांना मुलांमध्ये भावनिक समस्या आणि अडचणी ओळखणे अनेकदा कठीण असते. छळवणुकीमुळे पीडित विद्यार्थ्यांना कमी आत्मसन्मान आणि त्यांच्या कल्याणाबद्दल दैनंदिन ताण येऊ शकतो.

मुलांना वाढण्यासाठी आणि विकसित होण्यासाठी निरोगी आणि सहाय्यक वातावरणाची आवश्यकता असते. आपल्या देशातील मुलांना सन्मानाने जगण्याचे आणि सुरक्षित, संरक्षणात्मक आणि वाढ आणि विकासासाठी अनुकूल वातावरणात शिक्षण घेण्याचे मूलभूत अधिकार संविधानाने दिले आहेत. शाळेतील प्रत्येकाची शाळेतील चांगले, निरोगी आणि सुरक्षित वातावरण सुनिश्चित करण्यात भूमिका आहे; मग ते शिक्षक असोत, विशेष गरजा पूर्ण करणारे सहाय्यक असोत, अभ्यागत असोत आणि कंत्राटदार असोत आणि स्वतः विद्यार्थी असोत.

मुले त्यांच्या बालपणीचा आणि सुरुवातीच्या वर्षांचा महत्त्वाचा भाग शाळांमध्ये घालवतात, त्यामुळे शाळांमधील वातावरण सकारात्मक आणि पोषक असणे अत्यंत आवश्यक आहे, जिथे त्यांना आवारात आणि काळजी घेणाऱ्यांसोबत सुरक्षित वाटेल. शारीरिक शिक्षा यासारख्या गैरवर्तन किंवा गैरवापरावर कारवाई केली जाते तेव्हा विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षितता आणि कल्याणाची भावना निर्माण होते. शिक्षक, इतर कर्मचारी किंवा इतर विद्यार्थ्यांकडून होणारे भेदभावपूर्ण व्यवहार, गोंधळ आणि इतर प्रकारचे शाब्दिक, भावनिक किंवा लैंगिक शोषण.

## ७.१) शालेय भौतिक सुविधा व सुरक्षितता :

मुलांच्या सुरक्षिततेसाठी शालेय इमारत व उपलब्ध सुविधांबाबत मुख्याध्यापकांना व शिक्षकांना खालील बाबींबाबत काळजी घेणे आवश्यक आहे.

शाळास्तरावरील बालकांचे हक्क आणि सुरक्षितता या विषयांच्या संबंधाने शालेय इमारत आणि सोयी–सुविधांचा विचार करता, बालके सुरक्षित असावीत हा दृष्टिकोन लक्षात घ्यावा. वर्गखोली, जिने, शाळेचे प्रवेशद्वार, स्वच्छतागृहे इ. बाबत जागृत राहणे आवश्यक आहे. याबाबत शाळा व्यवस्थापन समितीची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. विद्यार्थी सुरक्षेसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक सूचना शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मुंबई यांनी दि. २ जून २०१८ ला निर्गमित केल्या असून त्यांचे पालन शाळास्तरावरून होणे अपेक्षित आहे.

- **'शाळा सुरक्षितता'** याचा अर्थ 'बालकांना त्यांच्या घरापासून शाळेपर्यंत आणि पुन्हा घरापर्यंत सुरक्षित वातावरण निर्मिती करणे.' यामध्ये कोणत्याही प्रकारचे शोषण, हिंसा, मानसिक–सामाजिक प्रश्न, नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती, आग, वाहतूक अशा सर्व बाबींचा समावेश होतो. भावनिक सुरक्षितता ही खास करून महत्त्वाची आहे कारण शिक्षक व पालक यांना बालकांमधील भावनिक संघर्ष व अडचणी ओळखता येणे हे पुष्कळदा अवघड असते.

### शालेय भौतिक सुविधा




### शालेय इमारत व उपलब्ध वर्गखोल्या :

#### १) वर्गखोली :

अ) इमारतीची वेळोवेळी पाहणी करणे, गरजेनुसार चात्काळ दुरुस्ती करणे.

ब) शालेय इमारतीच्या स्वच्छतेची काळजी घेणे.

क) शालेय वर्गखोलीमध्ये पुरेसा प्रकाश, हवा व स्वच्छता असणे.

ड) वर्गखोलीतील साहित्य स्वच्छ व व्यवस्थित मांडणी केलेले असावे.

## २) जिने :

अ) इमारतीच्या जिन्यांची नियमित पाहणी करून गरज असल्यास डागडुजी करावी. जिना वापरताना कोणतीही अडचण नसेल अशी व्यवस्था करावी. शाळा सुटल्यावर विद्यार्थ्यांच्या जाण्या–येण्याचे सुनियोजन करून बाहेर सोडणे. विद्यार्थ्यांना जाण्या–येण्यासाठी दोन स्वतंत्र जिने असावेत.

ब) आपत्तीजन्य परिस्थितीत तात्काळ बाहेर पडण्यासाठी सूचनाफलक, स्थळदर्शक नकाशा दर्शनी भागात लावावा. याबाबत विद्यार्थ्यांना वेळोवेळी सूचना द्याव्यात. शालेय परिसर अडथळाविरहित असावा. आपत्तीजन्य परिस्थिती जसे–भूकंप, आग लागणे इ. साठी शिक्षक प्रशिक्षण व विद्यार्थ्यांसाठी प्रात्यक्षिक होणे आवश्यक आहे. संबंधित यंत्रणेकडून प्रात्यक्षिक उपक्रम राबवावा. उदा. अग्निशमन दल, आर. एस. पी. इत्यादी.

## ३) शाळेचे प्रवेशद्वार :

अ) प्रवेशद्वाराची नियमित पाहणी, डागडुजी वेळोवेळी करण्यात यावी.

## ४) टेरेस :

अ) टेरेसची नियमित पाहणी करावी. गरज असल्यास डागडुजी करावी. धोका होणार नाही याची दक्षता घ्यावी.

ब) टेरेसला योग्य उंचीचे सुरक्षा कठडे असावेत.

## ५) स्वच्छतागृहे :

अ) शाळेतील मुलांची व मुलींची प्रसाधनगृहे स्वतंत्र व पुरेशी असावीत. शाळेतील शिक्षक व कर्मचारी यांच्यासाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे असावीत.

ब) स्वच्छतागृहात भरपूर पाणी व स्वच्छता असण्याच्या दृष्टीने मुख्याध्यापकांनी नियोजन करून कार्यवाही करावी. मोकळी हवा असावी. स्वच्छतागृहांमध्ये योग्य सूचना लिहिलेल्या असाव्यात. आक्षेपार्ह मजकूर आढळल्यास ताबडतोब पुसून स्वच्छ करावे. शाळेतील स्वच्छतागृहांकडे जाणारे रस्ते स्वच्छ राहण्यासाठी नियोजन असावे.

क) शाळास्तरावर विद्यार्थिनींना स्वच्छतेबाबत वेळोवेळी मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. उदा. मासिक पाळी. वैयक्तिक स्वच्छतेसाठी आवश्यक सोयी शाळांमध्ये उपलब्ध असाव्यात.

## ६) लिफ्ट/प्रयोगशाळा/ग्रंथालय/संगणक कक्ष/प्रोजेक्टर रूम :

शाळास्तरावर लिफ्टचा वापर विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी क्षमतेनुसार करणे. सुरक्षा रक्षक असणे, प्रयोगशाळेत प्रात्यक्षिक करताना रसायनांचा अपाय न होणे, ग्रंथालय संगणक कक्ष/

प्रोजेक्टर रूममध्ये बाधा होणार नाही याची काळजी घेणे आणि सातत्याने शालेय आपत्कालीन परिस्थितीचे नियोजन करणे आवश्यक आहे. वाचन साहित्य विनासायास उपलब्ध होईल अशी मांडणी असावी.

## ७.२) विद्यार्थी वाहतूक व सुरक्षितता :

विद्यार्थी वाहतूक व सुरक्षितता यांबाबत शासनाकडून शासन निर्णयाद्वारे वेळोवेळी मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. शालेय परिवहन व्यवस्थेला दिशा प्राप्त करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभाग व परिवहन विभागाने नियमावली विकसित केलेली आहे.

### विद्यार्थी वाहतुकीबाबत पुढील दक्षता घेणे आवश्यक आहे :

१) विद्यार्थी ने-आण सुरक्षितरीत्या करणे.

२) बालकांच्या अवैध वाहतुकीस आळा घालणे.

३) वाहतूक नियमांचे उल्लंघन न करणे.

४) खाजगी वाहनाने येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांना संबंधित वाहन चालकाच्या वर्तणुकीची पडताळणी करण्याबाबत सूचित करण्यात यावे.

५) शाळेच्या बसमध्ये कोणत्याही अनधिकृत व्यक्तीस बसण्याची अनुमती असू नये याबाबत मुख्याध्यापकांनी व संबंधित व्यवस्थापकांनी सर्व बसचालकांना सूचना द्याव्यात.

६) बसचालकांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या नियोजित (निवास स्थानाजवळच्या) ठिकाणीच सोडावे.




७) प्रत्येक बसमध्ये महिला सेविका/शिक्षिका असावी.

८) विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने शालेय परिवहन समिती निर्णय घेईल व मदत करील.

९) बसमधून उतरणाऱ्या विद्यार्थ्यास नेण्यासाठी येणाऱ्या पालकांजवळ त्यांचे ओळखपत्र असावे, अन्य व्यक्ती नेणार असेल तर ओळख पटवून घेण्यात यावी. ओळख पटल्यानंतरच विद्यार्थ्यास सोडावे. अनोळखी व्यक्तीजवळ विद्यार्थ्यास सोडू नये.

## ७.३) आरोग्य आणि स्वच्छता व्यवस्थापन :

मुलांचे आरोग्य, स्वच्छता आणि कल्याण यांचे संरक्षण आणि प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने, प्रत्येक शाळेने प्रभावी आरोग्य आणि स्वच्छता व्यवस्थापन प्रणाली विकसित करणे, अंमलात आणणे आणि देखभाल करणे महत्वाचे आहे. नियमावलीचा हा अध्याय शाळांशी संबंधित सर्व भागधारकांनी शाळेत मुलांसाठी निरोगी आणि सुरक्षित वातावरण प्रदान करण्यासाठी आणि राखण्यासाठी विहित मार्गदर्शक तत्वांचे पालन करावे याची खात्री करणे आहे.

शाळांमध्ये मुलांसाठी आरोग्य सेवा पुरवण्यासाठी खालील महत्त्वाचे मुद्दे आहेत.

### १) आरोग्य तपासणी, सेवा आणि शिफारशी

प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी भारतीय सार्वजनिक आरोग्य मानके (PHS) मार्गदर्शक तत्वे अंतर्गत शालेय आरोग्य या विभागामध्ये शाळांमध्ये मुलांचे आरोग्य, स्वच्छता आणि कल्याण यांच्या संदर्भात सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी खालील मुद्दे सुचवले आहेत.

- शाळांमध्ये दर तीन महिन्यांनी एकदा, सामान्य आरोग्य तपासणी, अशक्तपणा/पोषण स्थितीचे मूल्यांकन, नेत्र तपासणी, श्रवण समस्या, दंत तपासणी, सामान्य त्वचेचे आजार, हृदयविकार, शारीरिक अपंगत्व, शिकण्याचे विकार, वर्तन समस्या इत्यादी वेळोवेळी केल्या पाहिजेत.
- शाळेत जाणाऱ्या लहान मुलांमध्ये आढळणाऱ्या सामान्य आजारांवर उपचार करण्यासाठी शाळेत मूलभूत औषधोपचार किट/प्रथमोपचार पेटी उपलब्ध असावी.
- ज्या मुलांना विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे, त्यांना ताबडतोब संबंधित तज्ज्ञांकडे पाठवावे.
- आजारी मुलांची ओळख पटल्यानंतर त्यांना ताबडतोब संबंधित डॉक्टरांकडे पाठवावे.

## ७.४) शालेय वातावरणात बालकांना सुरक्षित वाटण्यासाठी उपाय :

१) भौतिक सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करणे.

२) सुरक्षिततेबाबत कडक नियम तयार करणे.

३) समुपदेशन सुविधा उपलब्ध करणे.

४) स्वसंरक्षण प्रशिक्षण देणे.

५) आपत्कालीन परिस्थिती हाताळण्याबाबत प्रशिक्षण देणे.

६) डिजिटल सुरक्षेबाबत जागृती निर्माण करणे.

७) पालकांचा शैक्षणिक उपक्रमांत सहभाग घेणे.

८) बालकांच्या सुरक्षिततेबाबत शिक्षकांना प्रशिक्षण देणे.

९) शालेय समित्या स्थापन करून त्यांच्या नियमित बैठका घेऊन सुरक्षिततेबाबत आढावा घेणे.

### ७.५) शाळा स्तर कृतिकार्यक्रम :

१) बालसुरक्षा समिती स्थापन करणे.

२) शालेय सुरक्षा नियमांचे पालन करणे.

३) बालकांना स्वसंरक्षण प्रशिक्षण देणे.

४) डिजिटल सुरक्षा कार्यक्रम राबविणे.

५) आपत्कालीन परिस्थितीतील प्रशिक्षण राबविणे.

६) शाळेतील स्वच्छता व आरोग्य कार्यक्रम राबविणे.

७) बालसन्मान व मानसिक सुरक्षा कार्यक्रम राबविणे.

८) पालकांचा सहभाग आणि जागरूकता वाढविणे.

९) नियमित सुरक्षा निरीक्षण व पुनरावलोकन करणे.

१०) सुरक्षा तक्रार यंत्रणा अद्ययावत ठेवणे.

❖❖❖

# ८. विद्यार्थी सुरक्षितता व शाळेतील विविध समित्या

**प्रस्तावना :**

शाळा हे विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित आणि पोषक वातावरण असले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केवळ शैक्षणिकच नव्हे, तर त्यांची शारीरिक आणि मानसिक सुरक्षितताही तितकीच महत्त्वाची आहे. या प्रकरणात, विद्यार्थी सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी आणि त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी शाळेतील विविध समित्यांची भूमिका स्पष्ट करण्यात आली आहे. शाळा व्यवस्थापन समिती, सखी सावित्री समिती आणि विद्यार्थी सुरक्षा समिती या प्रमुख समित्या विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी आणि त्यांना सुरक्षित व भयमुक्त शैक्षणिक अनुभव देण्यासाठी कशा प्रकारे कार्य करतात, याची सविस्तर माहिती या प्रकरणात देण्यात आली आहे. या समित्या विद्यार्थ्यांच्या हक्कांपासून ते त्यांच्या सुरक्षेशी संबंधित समस्यांपर्यंत विविध पैलूंवर लक्ष केंद्रित करतात, जेणेकरून प्रत्येक विद्यार्थ्याला शाळेत सुरक्षित आणि सक्षम वाटेल.

## ८.१) विद्यार्थी सुरक्षिततेमध्ये शाळा व्यवस्थापन समितीची (SMC) ची भूमिका


''बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९'' कायद्याच्या कलम २१ नुसार शाळेतील लोकसहभाग वाढावा या दृष्टीने शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी अनुदानित सर्व शाळांसाठी शाळा व्यवस्थापन समिती अनिवार्य करण्यात आली आहे. तसेच वरीलपैकी शालेय स्तरावरील कामाचे स्वरूप लक्षात घेऊन शाळा स्तरावर विविध समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. या समितीवर शाळेच्या कामकाजाचे सनियंत्रण करणे, शाळा विकास आराखडा तयार करणे इत्यादी प्रमुख जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत.

शाळा पातळीवर होणारे निर्णय हे विद्यार्थिकेंद्रित असावे. शाळांच्या निर्णय प्रक्रियेत पालकांचे प्रतिनिधित्व असावे. त्या अनुषंगाने शाळेतील लोकसहभाग वाढावा अशी या मागील प्रमुख भूमिका आहे. या दृष्टीने सर्व समिती सदस्यांना बालकांचे हक्क व बाल सुरक्षितता या संवेदनशील विषयाविषयी जागरूक करून त्याबाबत, कायदे व नियम या विषयांचे ज्ञान देण्यासाठी त्या सर्व सदस्यांचा सहभाग व सहकार्य मिळविण्यासाठी मुख्याध्यापक व शिक्षकांनी विविध उपक्रम प्रभावीपणे राबविणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने मुख्याध्यापक, समित्यांचे अध्यक्ष, सचिव व सर्व सदस्य यांनी पुढीलप्रमाणे बालकांच्या सुरक्षितते संदर्भात भूमिका बजावणे आवश्यक आहे.

### ८.१.१ पायाभूत स्तर :

१) शाळा व्यवस्थापन समितीच्या दरमहा होणाऱ्या बैठकीत विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत चर्चा घडवून आणावी व बाल सुरक्षिततेविषयी जागृती निर्माण करणे.

२) बालकांच्या वाहतूक व्यवस्थेशी संबंधित नियमांबद्दल समिती अध्यक्ष, सदस्य सचिव व सर्व इतर सदस्य यांच्यात जागृती करून त्या दृष्टीने वाहतूक व्यवस्थेची अंमलबजावणी करणे.




३) शाळेतील मध्यान्ह भोजन तयार होणाऱ्या किचन शेडची शिक्षक, समिती अध्यक्ष व सदस्यांनी वेळोवेळी पाहणी करावी. स्वच्छता, आरोग्य व अन्नाचा दर्जा यांबाबतीत आढावा घ्यावा व उपाययोजना करणे.

४) स्थलांतर होऊच नये यासाठी विविध शासकीय यंत्रणांची मदत घेऊन बालकांचे स्थलांतर रोखण्यासाठी उपाय योजना करावी. उदा. बालरक्षक, स्वयंसेवी संस्था, ग्रामपंचायत यांची मदत घ्यावी. शहरी भागात स्वयंसेवी संस्था, व्यक्ती, इत्यादींची मदत घेऊन बालकांना शिक्षण प्रवाहात समाविष्ट करून घेणे.

५) व्यवस्थापन समिती सदस्यांनी आपली शाळा (इमारत) बालकांच्या दृष्टीने सुस्थितीत व सुरक्षित ठेवण्यासाठी अधिकाऱ्यांना शालेय इमारतीची देखभाल व दुरुस्तीबाबत वेळोवेळी जाणीव करून दयावी, जेणेकरून विद्यार्थी सुरक्षितता धोक्यात असल्यास व्यवस्थापन समिती सभेत ठराव मांडून, तो मंजूर करून घेऊन सातत्याने पाठपुरावा करणे.

६) शाळा व्यवस्थापन व विकास समिती सदस्य हा ग्रामपंचायत पातळी व वॉर्ड पातळीवर कार्यरत असलेल्या बाल संरक्षण समितीचा सदस्य असल्याने, त्यांनी बालसंरक्षण समितीच्या रचनेमध्ये अपेक्षित असलेली बालकांची सुरक्षा विषयक धोरणे, कायदे यांचा अभ्यास करून स्वतःच्या कर्तव्याबाबत जागरूक असावे, याविषयी मुख्याध्यापक, शिक्षक, व्यवस्थापन समिती सदस्य यांच्याशी चर्चा घडवून आणणे.

७) बालकांच्या खेळण्याची जागा, राहण्याची जागा, वस्ती आणि इतर सार्वजनिक जागा या सुरक्षित राहाव्यात यासाठी दक्ष राहणे.

८) असुरक्षित बालकांना, काळजी व संरक्षणाची विशेष गरज असणाऱ्या सर्व प्रकारच्या बालकांना योग्य सुरक्षा व सेवा मिळेल याची सुनिश्चिती करणे.

९) दिव्यांग बालकांच्या सुरक्षिततेसाठी शाळा व परिसरात अडथळाविरहित वातावरणाची निर्मिती करणे.

१०) शाळांमध्ये स्वतंत्र मार्गदर्शन व समुपदेशन व्हावे, शाळेत बालहक्क कक्ष स्थापन करून त्याद्वारे बालकांच्या हक्कांबाबत व सुरक्षिततेबाबत वारंवार उद्‌बोधनपर कार्यक्रम आयोजित करणे.

११) अंगणवाडी सेविका, मदतनीस यांच्यांशी नियमित बैठका घेऊन बालकांची सुरक्षितता व स्वसंरक्षण यादृष्टीने नियमित आढावा घेणे.

१२) घर ते शाळा हा प्रवास सुरक्षित व्हावा यासाठी विविध उपाययोजना राबवणे.

१३) शाळेमध्ये आर्थिक, सामाजिक भेदभावविरहित वातावरण राहील याची दक्षता घेणे.

१४) शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची चारित्र्य पडताळणी केल्याची खात्री करणे.

### ८.१.२ पूर्वतयारी स्तर :

१) शाळा व्यवस्थापन समितीच्या दरमहा होणाऱ्या बैठकीत विदयार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत चर्चा घडवून आणून बाल सुरक्षिततेविषयी जागृती करणे.

२) बालकांच्या वाहतूक व्यवस्थेशी संबंधित नियमांबद्दल समिती अध्यक्ष, सदस्य सचिव व सर्व इतर सदस्य यांच्यात जागृती करून त्या दृष्टीने वाहतूक व्यवस्थेची अंमलबजावणी करणे.

३) शाळेतील मध्यान्ह भोजन तयार होणाऱ्या किचन शेडची शिक्षक, समिती अध्यक्ष व सदस्यांनी वेळोवेळी पाहणी करावी, स्वच्छता, आरोग्य व अन्नाचा दर्जा यांबाबतीत आढावा घ्यावा व उपाययोजना करणे.

४) स्थलांतरित होणाऱ्या बालकांसाठी समितीचे अध्यक्ष, सदस्य सचिव व इतर सर्व सदस्य यांना शिक्षण हमी कार्ड याचे महत्त्व पटवून देणे.

५) स्थलांतर होऊच नये यासाठी विविध शासकीय यंत्रणांची मदत घेऊन बालकांचे स्थलांतर रोखण्यासाठी उपाय योजना करावी, उदा. बालरक्षक, स्वयंसेवी संस्था, ग्रामपंचायत यांची मदत घ्यावी. शहरी भागात स्वयंसेवी संस्था, व्यक्ती, इत्यादींची मदत घेऊन बालकांना शिक्षण प्रवाहात समाविष्ट करून घेणे.

६) शिक्षणहक्क कायदा कलम ९ अनुसार व्यवस्थापन समिती सदस्यांनी आपली शाळा (इमारत) बालकांच्या दृष्टीने सुस्थितीत व सुरक्षित ठेवण्यासाठी अधिकाऱ्यांना शालेय इमारतीची देखभाल व दुरुस्तीबाबत वेळोवेळी जाणीव करून दयावी, जेणेकरून विदयार्थी सुरक्षितता धोक्यात असल्यास व्यवस्थापन समिती सभेत ठराव मांडून, तो मंजूर करून घेऊन सातत्याने पाठपुरावा करणे.

७) शाळा व्यवस्थापन व विकास समिती सदस्य हा ग्रामपंचायत पातळी व वॉर्ड पातळीवर कार्यरत असलेल्या बाल संरक्षण समितीचा सदस्य असल्याने, त्यांनी बालसंरक्षण समितीच्या रचनेमध्ये

अपेक्षित असलेली बालकांची सुरक्षा विषयक धोरणे, कायदे यांचा अभ्यास करून स्वतःच्या कर्तव्याबाबत जागरूक असावे, याविषयी मुख्याध्यापक, शिक्षक, व्यवस्थापन समिती सदस्य यांच्याशी चर्चा घडवून आणावी, स्वतःच्या कर्तव्याबाबतीत जागरूक राहणे.

८) बालकांच्या खेळण्याची जागा, राहण्याची जागा, वस्ती आणि इतर सार्वजनिक जागा या सुरक्षित राहाव्यात यासाठी दक्ष राहणे.

९) असुरक्षित बालकांना, काळजी व संरक्षणाची विशेष गरज असणाऱ्या या बालकांना योग्य सुरक्षा व सेवा मिळेल याची सुनिश्चिती करणे.

१०) दिव्यांग बालकांच्या सुरक्षिततेसाठी शाळा व परिसरात अडथळाविरहित वातावरणाची निर्मिती करणे.

११) शाळांमध्ये स्वतंत्र मार्गदर्शन व समुपदेशन व्हावे. शाळेत बालहक्क कक्ष स्थापन करून त्याद्वारे बालकांच्या हक्कांबाबत व सुरक्षिततेबाबत वारंवार उद्बोधनपर कार्यक्रम आयोजित करणे.

१२) अंगणवाडी सेविका, मदतनीस यांच्याशी नियमित बैठका घेऊन बालकांची सुरक्षितता व स्वसंरक्षण यादृष्टीने नियमित आढावा घेणे.

१३) घर ते शाळा हा प्रवास सुरक्षित व्हावा यासाठी विविध उपाययोजना राबवणे.

१४) शाळेमध्ये आर्थिक, सामाजिक व नैसर्गिक भेदभावविरहित वातावरण राहील याची दक्षता घेणे.

१५) शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची चारित्र्य पडताळणी केल्याची खात्री करणे.

### ८.१.३ पूर्वमाध्यमिक स्तर

१) शाळा व्यवस्थापन समितीच्या दरमहा होणाऱ्या बैठकीत विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत चर्चा घडवून आणून बाल सुरक्षिततेविषयी जागृती करणे.

२) बालकांच्या वाहतूक व्यवस्थेशी संबंधित नियमांबद्दल समिती अध्यक्ष, सदस्य सचिव व सर्व इतर सदस्य यांच्यात जागृती करून त्याा दृष्टीने वाहतूक व्यवस्थेची अंमलबजावणी करणे.

३) शाळेतील मध्यान्ह भोजन तयार होणाऱ्या किचन शेडची शिक्षक, समिती अध्यक्ष व सदस्यांनी वेळोवेळी पाहणी करावी. स्वच्छता, आरोग्य व अन्नाचा दर्जा यांबाबतीत आढावा घ्यावा व उपाययोजना करणे.

४) स्थलांतर होऊच नये यासाठी विविध शासकीय यंत्रणांची मदत घेऊन बालकांचे स्थलांतर रोखण्यासाठी उपाय योजना करावी. उदा. बालरक्षक, स्वयंसेवी संस्था, ग्रामपंचायत यांची मदत घ्यावी. शहरी भागात स्वयंसेवी संस्था, व्यक्ती, इत्यादींची मदत घेऊन बालकांना शिक्षण प्रवाहात समाविष्ट करून घेणे.

५) व्यवस्थापन समिती सदस्यांनी आपली शाळा (इमारत) बालकांच्या दृष्टीने सुस्थितीत व सुरक्षित ठेवण्यासाठी अधिकाऱ्यांना शालेय इमारतीची देखभाल व दुरुस्तीबाबत वेळोवेळी जाणीव करून द्यावी, जेणेकरून विद्यार्थी सुरक्षितता धोक्यात असल्यास व्यवस्थापन समिती सभेत ठराव मांडून, तो मंजूर करून घेऊन सातत्याने पाठपुरावा करणे.

६) व्यवस्थापन व विकास समिती सदस्य हा ग्रामपंचायत पातळी व वॉर्ड पातळीवर कार्यरत असलेल्या बाल संरक्षण समितीचा सदस्य असल्याने, त्यांनी बालसंरक्षण समितीच्या रचनेमध्ये अपेक्षित असलेली बालकांची सुरक्षा विषयक धोरणे, कायदे यांचा अभ्यास करून स्वतःच्या कर्तव्याबाबत जागरूक असावे. याविषयी मुख्याध्यापक, शिक्षक, व्यवस्थापन समिती सदस्य यांच्याशी चर्चा घडवून आणणे.

७) बालकांच्या खेळण्याची जागा, राहण्याची जागा, वस्ती आणि इतर सार्वजनिक जागा या सुरक्षित राहाव्यात यासाठी दक्ष राहणे.

८) असुरक्षित बालकांना, काळजी व संरक्षणाची विशेष गरज असणाऱ्या सर्व प्रकारच्या बालकांना योग्य सुरक्षा व सेवा मिळेल याची सुनिश्चिती करणे.

९) दिव्यांग बालकांच्या सुरक्षिततेसाठी शाळा व परिसरात अडथळाविरहित वातावरणाची निर्मिती करणे.

१०) शाळांमध्ये स्वतंत्र मार्गदर्शन व समुपदेशन व्हावे. शाळेत बालहक्क कक्ष स्थापन करून त्याद्वारे बालकांच्या हक्कांबाबत व सुरक्षिततेबाबत वारंवार उद्बोधनपर कार्यक्रम आयोजित करणे.

११) अंगणवाडी सेविका, मदतनीस यांच्याशी नियमित बैठका घेऊन बालकांची सुरक्षितता व स्वसंरक्षण यादृष्टीने नियमित आढावा घेणे.

१२) घर ते शाळा हा प्रवास सुरक्षित व्हावा यासाठी विविध उपाययोजना राबविणे.

१३) शाळेमध्ये आर्थिक, सामाजिक व नैसर्गिक भेदभावविरहित वातावरण राहील याची दक्षता घेणे.

१४) शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची चारित्र्य पडताळणी केल्याची खात्री करणे.

१५) किशोरवयात होणाऱ्या शारीरिक बदलांची शास्त्रशुद्ध माहिती बालकांना मिळेल अशी व्यवस्था करणे.

### ८.१.४ माध्यमिक स्तर

१) विविध समित्यांच्या दरमहा होणाऱ्या बैठकीत विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत चर्चा घडवून आणून बाल सुरक्षिततेविषयी जाणीव निर्माण करणे.

२) बालकांच्या वाहतूक व्यवस्थेशी संबंधित नियमांबद्दल समिती अध्यक्ष, सदस्य सचिव व सर्व इतर सदस्य एकत्र येऊन वाहतूक व्यवस्थेची अंमलबजावणी करणे.

३) शालेय समिती सदस्यांनी आपली शाळा (इमारत) बालकांच्या दृष्टीने सुस्थितीत व सुरक्षित ठेवण्यासाठी अधिकाऱ्यांना शालेय इमारतीची देखभाल व दुरुस्तीबाबत वेळोवेळी जाणीव करून द्यावी, जेणेकरून विद्यार्थी सुरक्षितता धोक्यात असल्यास व्यवस्थापन समिती सभेत ठराव मांडून, तो मंजूर करून घेऊन सातत्याने पाठपुरावा करणे.

४) शाळा व्यवस्थापन व विकास समिती सदस्य हा ग्रामपंचायत पातळी व वॉर्ड पातळीवर कार्यरत असलेल्या बाल संरक्षण समितीचा सदस्य असल्याने, त्यांनी बालसंरक्षण समितीच्या रचनेमध्ये अपेक्षित असलेली बालकांची सुरक्षा विषयक धोरणे, कायदे यांचा अभ्यास करून स्वतःच्या कर्तव्याबाबत जागरूक असावे. याविषयी मुख्याध्यापक, शिक्षक, व्यवस्थापन समिती सदस्य यांच्याशी चर्चा घडवून आणणे.

५) बालकांच्या खेळण्याची जागा, राहण्याची जागा, वस्ती आणि इतर सार्वजनिक जागा या सुरक्षित राहाव्यात यासाठी दक्ष राहणे.

६) असुरक्षित बालकांना, काळजी व संरक्षणाची विशेष गरज असणाऱ्या सर्व प्रकारच्या बालकांना योग्य सुरक्षा व सेवा मिळेल याची सुनिश्चिती करणे.

७) दिव्यांग बालकांच्या सुरक्षिततेसाठी शाळा व परिसरात अडथळाविरहित वातावरणाची निर्मिती करणे.

८) शाळांमध्ये स्वतंत्र मार्गदर्शन व समुपदेशन व्हावे. शाळेत बालहक्क कक्ष स्थापन करून त्याद्वारे बालकांच्या हक्कांबाबत व सुरक्षिततेबाबत वारंवार उद्बोधनपर कार्यक्रम आयोजित करणे.

९) घर ते शाळा हा प्रवास सुरक्षित व्हावा यासाठी विविध उपाययोजना राबविणे.

१०) शाळेमध्ये आर्थिक, सामाजिक भेदभावविरहित वातावरण राहील याची दक्षता घेणे.

११) शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची चारित्र्या पडताळणी केल्याची खात्री करणे.

१२) किशोरवयात होणाऱ्या शारीरिक बदलांची शास्त्रशुद्ध माहिती बालकांना मिळेल अशी व्यवस्था करणे.

## ८.२) विद्यार्थी सुरक्षिततेमध्ये सखी सावित्री समितीची भूमिका

शाळा हे विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित आणि पोषक वातावरण असले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केवळ शैक्षणिकच नव्हे, तर त्यांची शारीरिक आणि मानसिक सुरक्षितताही तितकीच महत्त्वाची आहे. या प्रकरणात, विद्यार्थी सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी आणि त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी शाळेतील विविध समित्यांची भूमिका स्पष्ट करण्यात आली आहे. शाळा व्यवस्थापन समिती, सखी सावित्री समिती आणि विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा विकसन

समिती या प्रमुख समित्या विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी आणि त्यांना सुरक्षित व भयमुक्त शैक्षणिक अनुभव देण्यासाठी कशा प्रकारे कार्य करतात, याची सविस्तर माहिती या प्रकरणात देण्यात आली आहे. या समित्या विद्यार्थ्यांच्या हक्कांपासून ते त्यांच्या सुरक्षेशी संबंधित समस्यांपर्यंत विविध पैलूंवर लक्ष केंद्रित करतात, जेणेकरून प्रत्येक विद्यार्थ्याला शाळेत सुरक्षित आणि सक्षम वाटेल.

### ८.२.१ विद्यार्थी सुरक्षिततेमध्ये सखी सावित्री समितीची भूमिका :

१) १००% मुला-मुलींची (दिव्यांग विद्यार्थ्यांसह) पटनोंदणी आणि उपस्थिती साध्य करण्यासाठी प्रत्येक घरी शिक्षकांनी/बालरक्षकांनी भेट देऊन नावनोंदणी करणे.

२) स्थलांतरित पालक आणि शाळाबाह्य असलेल्या सर्व मुला-मुलींना सर्वेक्षणाद्वारे शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे.

३) विद्यार्थ्यांच्या भावनिक, शारीरिक व बौद्धिक विकासासाठी तसेच ताण-तणावमुक्तीसाठी मुला-मुलींचे व त्यांच्या पालकांचे समुपदेशन करणे. सजग पालकत्वासाठी कार्यशाळा आयोजित करणे

४) मुला-मुलींच्या शिक्षणासाठी असलेल्या शासकीय योजनांची माहिती देऊन प्रभावी अंमलबजावणीसाठी कार्यवाही करणे.

५) मुला-मुलींना करिअरसंबंधी मार्गदर्शन करणे आणि कौशल्य विकासासाठी विविध उपक्रम राबवणे. मुलींच्या स्व-संरक्षणासाठी स्वतंत्र प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे.

६) मुला-मुलींसोबत आरोग्यदायी सवयींसाठी संवाद साधणे आणि निरोगी जीवनासाठी स्थानिक डॉक्टरांच्या सहकार्याने आरोग्य शिबीर व समुपदेशनासारख्या विविध उपक्रमांचे आयोजन करणे.

७) कार्यक्षेत्रातील बालविवाह रोखणे, बालविवाहाचे दुष्परिणाम व बालविवाहाविषयी विद्यार्थ्यांच्या पालकांमध्ये जनजागृती निर्माण करणे आणि मुलींचे शिक्षण सुरू राहण्यासाठी प्रयत्न करणे.

८) विविध कारणांमुळे मुला-मुलींचा होणारा अध्ययन ऱ्हास कमी करण्यासाठी उपाययोजना करणे.

९) शाळेत समतामूलक वातावरण राहील यासाठी लिंगभेदविरहित व समावेशक उपक्रम राबवणे. विद्यार्थी-विद्यार्थिनी कोणत्याही अत्याचाराला बळी पडणार नाहीत अशी निकोप वातावरण निर्मिती करणे.

१०) अपवादात्मक परिस्थितीत अत्याचार घडल्यास तक्रार दाखल करण्याबाबत लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा (POCSO) अंतर्गत असलेल्या ''ई-बॉक्स'', "CHIRAG" ॲप आणि चाइल्ड हेल्पलाइन नंबर (१०९८) बाबत सूचना फलक शाळेत लावल्याची खात्री करणे.

११) समितीच्या महिन्यातून एकदा (आवश्यकता भासल्यास अधिक वेळा) बैठका आयोजित करणे. सदर बैठका शाळेत घेणे, जेणेकरून मुलामुलींचे प्रतिनिधी उपस्थित राहू शकतील. शाळास्तर समिती बैठकांचा अहवाल दर महिन्याच्या १० तारखेपर्यंत केंद्रस्तर समितीसमोर सादर करणे.

## ८.३) विद्यार्थी सुरक्षिततेमध्ये विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा विकसन समितीची भूमिका

शाळेतील विद्यार्थ्यांची सुरक्षितता ही सर्वोच्च प्राधान्याची बाब आहे. विद्यार्थ्यांचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य धोक्यात येणार नाही, याची खात्री करणे हे केवळ पालकांचेच नव्हे, तर शाळा प्रशासनाचेही कर्तव्य आहे. या महत्त्वपूर्ण जबाबदारीची पूर्तता करण्यासाठी विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा विकसन समितीची स्थापना करण्यात येते. ही समिती शाळेच्या आवारातील आकर्षण बाहेरील अशा दोन्ही ठिकाणच्या धोक्यांपासून विद्यार्थ्यांचे संरक्षण सुनिश्चित करते. विद्यार्थ्यांसाठी भयमुक्त आणि सुरक्षित शैक्षणिक वातावरण निर्माण करणे, आपत्कालीन परिस्थितीत योग्य उपाययोजना करणे, आणि सुरक्षिततेच्या नियमांबद्दल विद्यार्थ्यांना व कर्मचाऱ्यांना जागरूक करणे, ही या समितीची प्रमुख उद्दिष्टे आहेत. विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा विकसन समिती शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याला सुरक्षित आणि आश्वस्त वाटेल याची काळजी घेते.

### ८.३.१ विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा विकसन समितीची भूमिका :

१) शाळेतील वर्ग खोल्या, मैदान, प्रयोगशाळा, स्वच्छतागृहे, पाणीपुरवठा आणि इतर सर्व ठिकाणे विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित आहेत की नाही याची नियमित तपासणी करणे.

२) आग, नैसर्गिक आपत्त्या किंवा इतर कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीसाठी शाळेकडे योग्य योजना आहे की नाही याची खात्री करणे. तसेच, अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांना कसे सुरक्षित ठेवता येईल, यावर नियमितपणे सराव करणे.

३) शाळेतील सर्व शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक ते प्रशिक्षण घेतले आहे की नाही याची खात्री करणे. यात प्रथमोपचार, आपत्कालीन प्रतिसाद आणि सुरक्षिततेच्या नियमांचा समावेश आहे.

४) विद्यार्थ्यांना सुरक्षिततेच्या नियमांबद्दल आणि कोणत्याही धोक्याची माहिती कोणाला द्यावी याबद्दल नियमितपणे माहिती देणे.

५) शाळेत कोणत्याही प्रकारच्या गैरवर्तनाला (उदा. छेडछाड, मारामारी, धमकावणे) प्रतिबंध घालण्यासाठी उपाययोजना करणे आणि अशा घटना घडल्यास त्वरित कारवाई करणे.

५) शाळेत कोणत्याही प्रकारच्या गैरवर्तनाला (उदा. छेडछाड, मारामारी, धमकावणे) प्रतिबंध

६) विद्यार्थ्यांना त्यांच्या सुरक्षिततेशी संबंधित कोणत्याही तक्रारी किंवा समस्या मांडण्यासाठी सुरक्षित आणि गोपनीय व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि त्यावर त्वरित कार्यवाही करणे.

७) विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या बाबतीत पालकांशी नियमित संवाद साधणे आणि त्यांना शाळेने घेतलेल्या उपाययोजनांबद्दल माहिती देणे.

८) जर शाळा वाहतूक सेवा देत असेल, तर त्या वाहनांची सुरक्षितता, चालकांची तपासणी आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीची खात्री करणे.

९) शासनाद्वारे वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या विद्यार्थी सुरक्षिततेशी संबंधित सर्व नियम आणि मार्गदर्शक तत्त्वांचे शाळेत काटेकोरपणे पालन होते आहे याची खात्री करणे.

१०) विद्यार्थी सुरक्षिततेच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी आणि उपाययोजना आखण्यासाठी नियमितपणे बैठका घेणे.

विद्यार्थ्यांची सुरक्षितता ही केवळ शाळेची जबाबदारी नसून संपूर्ण शैक्षणिक समुदायाची सामूहिक जबाबदारी आहे. या दृष्टीने शाळा व्यवस्थापन समिती, सखी सावित्री समिती आणि विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा विकसन समिती या तिन्ही समित्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते.

शाळा व्यवस्थापन समिती धोरण निर्मितीपासून अंमलबजावणीपर्यंतच्या सर्व टप्प्यांवर सक्रिय सहभाग घेते आणि पालक–शिक्षकांमध्ये संवादाचे प्रभावी माध्यम बनते. सखी सावित्री समिती मुलींशी संबंधित सुरक्षितता, सन्मान आणि आत्मविश्वास वाढवणाऱ्या उपाययोजनांवर काम करते. विद्यार्थ्यांच्या समस्या समजून घेऊन त्यावर संवेदनशीलतेने कार्य करते. विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा विकसन समिती शाळेतील प्रत्यक्ष सुरक्षेच्या उपाययोजना, देखरेख व त्वरित कृती यासाठी सक्रिय भूमिका बजावते.

या सर्व समित्यांच्या समन्वयानेच शाळा हे एक सुरक्षित, प्रेरणादायी व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास पोषक ठिकाण बनू शकते. त्यामुळे या समित्यांचे सशक्तीकरण, प्रशिक्षण व त्यांची नियमित बैठक व मूल्यांकन ही विद्यार्थी सुरक्षिततेसाठी आवश्यक बाब आहे.

❖❖❖

# ९. विद्यार्थी सुरक्षितता आणि मानवी घटकांची भूमिका, कार्य व जबाबदारी

## ९.१) शिक्षक भूमिका :

बालकांच्या सुरक्षितते संदर्भात सर्व मानवी घटकांच्या भूमिकांमध्ये शिक्षकाची भूमिका सर्वांत महत्त्वाची आहे. बालकांच्या सुरक्षिततेच्या संदर्भात अनुचित घटना घडल्यास घाबरून न जाता संबंधित बालकाला यंत्रणेकडून मदत मिळवून देणे आवश्यक आहे. त्यासाठी एक शिक्षक म्हणून बालकांची सुरक्षितता, बालकांचे हक्क व अधिकार यांची सखोल माहिती शिक्षकांना असणे आवश्यक आहे.

शिक्षकाने सर्वतोपरी काळजी घ्यावी. अपवादाने प्रसंग घडल्यास शिक्षकांनी घाबरून न जाता विद्यार्थ्यांचा आधार बनून ठामपणे उभे राहणे हे शिक्षकांचे सर्वांत महत्त्वाचे कर्तव्य आहे.

### ९.१.१ पायाभूत स्तरावर शिक्षकांची भूमिका

#### अ) बालवाटिका १, २ व ३

१) बालकांविषयी **संवेदनशील** असावे.

२) बालकांशी सातत्याने **संवाद** साधवा. विविध मानवी घटकांना एकत्रित करून त्यांच्यात **समन्वय** घडवून आणावा.

३) बालक कोणत्याही **शोषणाला बळी पडणार** नाही याची दक्षता घ्यावी. असुरक्षित बालकांशी संवाद साधून मनोबल वाढवावे. अत्याचारग्रस्त पीडित बालकांना योग्य ती मदत संबंधित यंत्रणेकडून मिळवून द्यावी.

४) शालेय परिसरामध्ये **लिंगभेद विरहित** वातावरण निर्माण करावे.

५) बालकांचे स्वतंत्र अस्तित्व व व्यक्तिमत्त्व मान्य करून त्यांचे अधिकार व हक्क यांची जोपासना करावी.

६) कोणत्याही परिस्थितीत लिंग, जाती व धर्माच्या आधारे बालकांमध्ये भेदभाव करू नये.

७) दिव्यांग बालकांची सुरक्षितता व हक्क यांच्या विषयीचे कायदे जाणून घ्यावे. त्यांचे अध्ययन–अध्यापन प्रक्रियेमध्ये व शालेय परिसरामध्ये समावेशन होईल याबाबत जागरूक असावे.

८) बालकांची कौशल्ये विकसित होण्यासाठी **पोषक वातावरण** निर्माण करावे.

९) विविध उपक्रमांच्या माध्यमातून बालकांमध्ये त्यांच्या हक्कांबाबत जाणीव जागृती निर्माण करावी.

१०) असुरक्षित बालक ओळखणे व त्याविषयी त्या **बालकाच्या मित्रमैत्रिणी व कुटुंबीय यांच्याशी संवाद** साधावा.

११) बालकांशी भावनिक पातळीवर पालकांच्या भूमिकेतून जवळीकता राखावी.

१२) बालकांच्या दृष्टीने वर्गात शारीरिक व मानसिक सुरक्षित वातावरण निर्माण करणे.

१३) बालक शाळेत ये-जा करत असताना त्यांच्या सुरक्षिततेचा विचार करावा.

१४) शालेय परिसरामध्ये वावर असणारे विविध बाह्य मानवी घटक व त्याची वर्तणूक यांचे सूक्ष्म निरीक्षण करून त्यापासून बालकाच्या सुरक्षेला धोका होणार नाही याची दक्षता घ्यावी.

## ब) इयत्ता पहिली ते दुसरी

१) बालकांविषयी **संवेदनशील** असावे.

२) बालकांशी सातत्याने **संवाद** साधवा. विविध मानवी घटकांना एकत्रित करून त्यांच्यात **समन्वय** घडवून आणावा.

३) बालक कोणत्याही **शोषणाला बळी पडणार** नाही याची दक्षता घ्यावी. असुरक्षित बालकांशी संवाद साधून मनोबल वाढवावे. अत्याचारग्रस्त पीडित बालकांना योग्य ती मदत संबंधित यंत्रणेकडून मिळवून द्यावी.

४) शालेय परिसरामध्ये **लिंगभेद विरहित** वातावरण निर्माण करावे.

५) बालकांचे स्वतंत्र अस्तित्व व व्यक्तिमत्त्व मान्य करून त्यांचे अधिकार व हक्क यांची जोपासना करावी.

६) कोणत्याही परिस्थितीत लिंग, जाती व धर्माच्या आधारे बालकांमध्ये भेदभाव करू नये.

७) दिव्यांग बालकांची सुरक्षितता व हक्क यांच्या विषयीचे कायदे जाणून घ्यावे. त्यांचे अध्ययन-अध्यापन प्रक्रियेमध्ये व शालेय परिसरामध्ये समावेशन होईल याबाबत जागरूक असावे.

८) बालकांना आपली कौशल्ये विकसित करण्यासाठी **पोषक वातावरण** निर्माण करावे.

९) प्रसार माध्यमांचा योग्य तो वापर करण्यासाठी **प्रबोधन करावे**. त्यातील योग्य, अयोग्य याची निवड करण्याची क्षमता बालकांमध्ये निर्माण करावी.

१०) विविध उपक्रमांच्या माध्यमातून बालकांमध्ये त्यांच्या हक्कांबाबत जाणीव जागृती निर्माण करावी.

११) असुरक्षित बालक ओळखून त्या **बालकाच्या मित्रमैत्रिणी व कुटुंबीय यांच्याशी संवाद** साधावा.

१२) असुरक्षित बालक ओळखून त्याचे भावविश्व जाणून घ्यावे व योग्य ती मदत मिळवून द्यावी.

१३) मोबाईल तसेच अन्य साधनांचा बालक वापर करताना पालकांनी दक्ष राहण्याकरिता त्यांच्याशी सातत्याने समन्वय साधावा.

१४) पीडित बालकांच्या माहितीच्या सर्व नोंदी गोपनीय ठेवाव्यात. बालकांची वैयक्तिक माहिती त्रयस्थ, व्यक्ती, संस्था यांना कळणार नाही. याबाबत दक्षता घ्यावी.

### ९.१.२ पूर्वतयारी स्तरावर शिक्षकांची भूमिका (इयत्ता तिसरी ते पाचवी)

१) बालकांविषयी **संवेदनशील** असावे.

२) बालकांशी सातत्याने **संवाद** साधवा. विविध मानवी घटकांना एकत्रित करून त्यांच्यात **समन्वय** घडवून आणावा.

३) बालक कोणत्याही **शोषणाला बळी पडणार** नाही, याची दक्षता घ्यावी. असुरक्षित बालकांशी संवाद साधून मनोबल वाढवावे. अत्याचारग्रस्त पीडित बालकांना योग्य ती मदत संबंधित यंत्रणेकडून मिळवून द्यावी.

४) शालेय परिसरामध्ये **लिंगभेद विरहित** वातावरणाची निर्मिती करावी.

५) बालकांचे स्वतंत्र अस्तित्व व व्यक्तिमत्त्व मान्य करून त्यांचे अधिकार व हक्क यांची जोपासना करावी.

६) कोणत्याही परिस्थितीत लिंग, जाती व धर्माच्या आधारे बालकांमध्ये भेदभाव करू नये.

७) दिव्यांग बालकांची सुरक्षितता व हक्क यांच्या विषयीचे कायदे जाणून घ्यावे. त्यांचे अध्ययन–अध्यापन प्रक्रियेमध्ये व शालेय परिसरामध्ये समावेशन होईल याबाबत जागरूक असावे.

८) बालकांना आपली कौशल्ये विकसित करण्यासाठी **पोषक वातावरण** निर्माण करावे.

९) प्रसार माध्यमांचा योग्य तो वापर करण्यासाठी **प्रबोधन करावे**. त्यातील योग्य, अयोग्य याची निवड करण्याची क्षमता बालकांमध्ये निर्माण करावी. तसेच मोबाईलचा योग्य व आवश्यक वापर करण्याविषयी मार्गदर्शन करावे.

१०) विविध उपक्रमांच्या माध्यमातून बालकांमध्ये त्यांच्या हक्कांबाबत जाणीव जागृती निर्माण करावी.

११) असुरक्षित बालक ओळखून त्या **बालकाच्या मित्रमैत्रिणी व कुटुंबीय यांच्याशी संवाद** साधावा.

१२) बालकाला शारीरिक, भावनिक व सामाजिक सुरक्षिततेबाबत जागरूक करावे.

१३) बालकांच्या मोबाईल वापरावर योग्य नियंत्रण रहावे यासाठी पालकांशी सातत्याने व नियमित समन्वय साधावा.

१४) बालकांच्या वर्तनबदलावर डोळसपणे लक्ष देऊन योग्य वेळी समुपदेशकाची भूमिका पार पाडावी.

१५) बालक कसल्याही प्रलोभनाला बळी पडू नये, यासाठी बालकांना जागरूक करावे.

१६) असुरक्षित बालक ओळखून त्याचे मनोबल वाढवावे.

१७) दुर्दैवाने एखादी घटना घडल्यास पिडिताला योग्य मानसिक आधार देऊन तात्काळ योग्य ती वैद्यकिय व कायदेशीर मदत मिळवून देण्यासाठी पुढाकार घ्यावा.

१८) पीडित बालकाच्या सर्व नोंदी गोपनीय ठेवून बालकाची वैयक्तिक माहिती त्रयस्थ व्यक्ती संस्था किंवा प्रसारमाध्यमांना कळणार नाही याची दक्षता घ्यावी.

### ९.१.३ पूर्व माध्यमिक स्तरावर शिक्षकांची भूमिका (इयत्ता सहावी ते आठवी)

१) बालकांविषयी **संवेदनशील** असावे.

२) बालकांशी सातत्याने **संवाद** साधवा. विविध मानवी घटकांना एकत्रित करून त्यांच्यात **समन्वय** घडवून आणावा.

३) बालक कोणत्याही **शोषणाला बळी पडणार** नाही याची दक्षता घ्यावी. असुरक्षित बालकांशी संवाद साधून मनोबल वाढवावे. अत्याचारग्रस्त पीडित बालकांना योग्य ती मदत संबंधित यंत्रणेकडून मिळवून द्यावी.

४) शालेय परिसरामध्ये **लिंगभेद विरहित** वातावरण निर्माण करावे.

५) बालकांचे स्वतंत्र अस्तित्व व व्यक्तिमत्त्व मान्य करून त्यांचे अधिकार व हक्क यांची जोपासना करावी.

६) कोणत्याही परिस्थितीत लिंग, जाती व धर्माच्या आधारे बालकांमध्ये भेदभाव करू नये.

७) दिव्यांग बालकांची सुरक्षितता व हक्क यांच्याविषयीचे कायदे जाणून घ्यावे. त्यांचे अध्ययन–अध्यापन प्रक्रियेमध्ये व शालेय परिसरामध्ये समावेश होईल याबाबत जागरूक असावे.

८) बालकांना आपली कौशल्ये विकसित करण्यासाठी **पोषक वातावरण** निर्माण करावे.

९) प्रसार माध्यमांचा योग्य तो वापर करण्यासाठी **प्रबोधन करावे**. त्यातील योग्य, अयोग्य याची निवड करण्याची क्षमता बालकांमध्ये निर्माण करावी. तसेच मोबाईलचा योग्य व आवश्यक वापर करण्याविषयी मार्गदर्शन करावे.

१०) विविध उपक्रमांच्या माध्यमातून बालकांमध्ये त्यांच्या हक्कांबाबत जाणीव जागृती निर्माण करावी.

११) असुरक्षित बालक ओळखणे व त्याविषयी त्या **बालकाच्या मित्रमैत्रिणी व कुटुंबीय यांच्याशी संवाद** साधावा.

१२) बालकांच्या वर्तनातील बदलावर डोळसपणे लक्ष देऊन आवश्यक तेथे योग्य ते मार्गदर्शन व समुपदेशन करावे.

१३) पौगंडावस्थेतील होणाऱ्या शारीरिक बदलांबाबत माहिती द्यावी व त्यांच्या शंकांचे/कुतुहलाचे उचित निरसन करावे.

१४) मुलींसाठी मासिक पाळी व त्या संदर्भातील वैयक्तिक स्वच्छता याबाबत मार्गदर्शन करावे.

१५) बालकात असलेली उर्जा अधिकाधिक उत्पादक उपक्रम आणि खेळ यामध्ये खर्च होईल अशी वातावरणनिर्मिती व संधी निर्माण करावी.

१६) बालकांच्या वर्तनात विरुद्धलिंगी आकर्षणाची घटना निदर्शनास आल्यास योग्य वेळी समुपदेशकाच्या भूमिकेतून मार्गदर्शन करावे.

१७) मुलींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण/धडे देणे किंवा त्यासाठीची व्यवस्था करावे.

१८) लैंगिक शोषण व त्यासंबंधीचे कायदे याविषयी थोडक्यात माहिती द्यावी.

१९) लैंगिक शोषणाच्या घटनांविषयी मोकळेपणाने अभिव्यक्त होण्यासाठी वातावरण निर्माण करावे.

२०) दुर्दैवाने एखादी घटना घडल्यास पिडिताला योग्य मानसिक आधार देऊन तात्काळ योग्य ती वैद्यकीय व कायदेशीर मदत मिवडून देण्यासाठी पुढाकार घ्यावा.

२१) पीडित बालकाच्या सर्व नोंदी गोपनीय ठेवाव्यात. बालकाची वैयक्तिक माहिती, त्रयस्थ व्यक्ती, संस्था किंवा प्रसार माध्यमांना कळणार नाही याची दक्षता घ्यावी.

### ९.१.४ माध्यमिक स्तरावर शिक्षकांची भूमिका (इयत्ता नववी ते बारावी)

१) बालकांविषयी **संवेदनशील** असावे.

२) बालकांशी सातत्याने **संवाद** साधवा. विविध मानवी घटकांना एकत्रित करून त्यांच्यात **समन्वय** घडवून आणावा.

३) बालक कोणत्याही **शोषणाला बळी पडणार** नाही याची दक्षता घ्यावी. असुरक्षित बालकांशी संवाद साधून मनोबल वाढवावे. अत्याचारग्रस्त पीडित बालकांना योग्य ती मदत संबंधित यंत्रणेकडून मिळवून द्यावी.

४) शालेय परिसरामध्ये **लिंगभेद विरहित** वातावरण निर्मिती करावी.

५) बालकांचे स्वतंत्र अस्तित्व व व्यक्तिमत्त्व मान्य करून त्यांचे अधिकार व हक्क यांची जोपासना करावी.

६) कोणत्याही परिस्थितीत लिंग, जाती व धर्माच्या आधारे बालकांमध्ये भेदभाव करू नये.

७) दिव्यांग बालकांची सुरक्षितता व हक्क यांच्या विषयीचे कायदे जाणून घ्यावे. त्यांचे अध्ययन–अध्यापन प्रक्रियेमध्ये व शालेय परिसरामध्ये समावेशन होईल याबाबत जागरूक असावे.

८) बालकांना आपली कौशल्ये विकसित करण्यासाठी **पोषक वातावरण** निर्माण करावे.

९) प्रसार माध्यमांचा योग्य तो वापर करण्यासाठी **प्रबोधन करावे**. त्यातील योग्य, अयोग्य याची निवड करण्याची क्षमता बालकांमध्ये निर्माण करावी. तसेच मोबाईलचा योग्य व आवश्यक वापर करण्याविषयी मार्गदर्शन करावे.

१०) विविध उपक्रमांच्या माध्यमातून बालकांमध्ये त्यांच्या हक्कांबाबत जाणीव जागृती निर्माण करावी.

११) असुरक्षित बालक ओळखणे व त्याविषयी त्या **बालकाच्या मित्रमैत्रिणी व कुटुंबीय यांच्याशी संवाद** साधावा.

१२) बालकातील ऊर्जा अधिकाधिक उत्पादक उपक्रम, खेळ यामध्ये गुंतवून ठेवण्यासाठी वातावरण निर्मिती करावी.

१३) बालकांच्या विरुद्धलिंगी आकर्षणाबाबतीत काही घटना लक्षात आल्यास योग्य वेळी समुपदेशकाच्या भूमिकेतून मार्गदर्शन करावे.

१४) मुलींना स्वसंरक्षणाचे धडे देणे किंवा त्यासाठीची व्यवस्था निर्माण करावी. (उदा. कराटे, तायक्वांदो, लाठी–काठी इ.)

१५) लैंगिक शोषण व तद्संबंधीचे कायद्याचे ज्ञान अवगत करून द्यावे.

१६) शोषणासंबंधीच्या घटनाविषयी मोकळेपणाने बोलण्यासाठी संधी उपलब्ध करून द्यावी.

१७) एखादी वाईट घटना घडल्यास पिडिताला योग्य मानसिक आधार देऊन योग्य ती वैद्यकिय व कायदेशीर मदत तात्काळ मिळवून देण्यासाठी पुढाकार घ्यावा.

१८) पीडित बालकाच्या सर्व नोंदी गोपनीय ठेवाव्यात. बालकाची वैयक्तिक माहिती त्रयस्थ व्यक्ती, संस्था व प्रसार माध्यमांना कळणार नाही याची दक्षता घ्यावी.

१९) HIV, AIDS असुरक्षित लैंगिक संबंधामुळे होणाऱ्या समस्या याविषयी तज्ज्ञांच्या द्वारे मार्गदर्शन मिळवून देणे. त्यासाठी शाळास्तरावर चर्चासत्रे आयोजित करावीत.

### ९.२) मुख्याध्यापक भूमिका :

शाळा व शालेय परिसर यांच्याशी संबंधित असणाऱ्या सर्व मानवी घटकांमध्ये बालकांचे हक्क व सुरक्षिततेच्या दृष्टीने मुख्याध्यापक हा एक जबाबदार घटक असून त्यांनी शिक्षक, विद्यार्थी, पालक, शाळा स्तरावरील सर्व समित्यांचे सदस्य, समाजातील इतर सर्व घटक यांना एकत्र करून त्यांच्यात समन्वय साधून व योग्य सुसंवाद घडवून आणावा. बालकांचे हक्क व सुरक्षितता यांविषयी जाणीव

जागृती करावी, त्याचप्रमाणे सहशालेय उपक्रम, राष्ट्रीय सण व उत्सव या उपक्रमांमधून वेळोवेळी मार्गदर्शन करण्याकरिता चर्चा घडवून आणण्यासाठी मुख्याध्यापकांनी सदैव प्रयत्नशील असावे.

सर्वतोपरी काळजी घेऊनही जर एखाद्या बालकाच्या सुरक्षितते संदर्भाने काही अनुचित घटना घडली, तर त्यावेळी मुख्याध्यापक व शाळेशी संबंधित इतर सर्व मानवी घटकांनी मुलाच्या बाजूने उभे राहणे आवश्यक आहे. त्यामुळे मुलांमध्ये तुमच्याबद्दल विश्वास निर्माण होतो. पर्यायाने सुसंवाद साधणे सोपे होते. परिणामी कुटुंब व समाजामध्ये शाळेविषयी सुरक्षिततेची भावना निर्माण होते.

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या शासन निर्णय दि. २ जून २०१८ अन्वये विद्यार्थी सुरक्षा संदर्भात मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत. मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांना अनुसरून केंद्र सरकारने २०१७ व २०२१ रोजी सर्व राज्यांना सूचित केले आहे.

## बालकांच्या सुरक्षिततेसाठी शाळा प्रमुख या नात्याने मुख्याध्यापकांची भूमिका :

### १) शारीरिक संरक्षण :

- शाळेतील परिसर स्वच्छ, सुरक्षित आणि संरक्षित ठेवावा.
- शाळेच्या इमारतीची व खेळाच्या मैदानाची योग्य देखभाल करावी.
- अग्निसुरक्षा व आपत्कालीन परिस्थितींसाठी उपाययोजना करावी.
- विद्यार्थ्यांना प्रवास करताना सुरक्षितता नियम पाळण्याची जाणीव करून द्यावी.

### २) मानसिक आणि भावनिक संरक्षण :

- विद्यार्थ्यांचा मानसिक व भावनिक छळ होणार नाही तसेच त्यांच्यामध्ये भेदभाव केला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.
- विद्यार्थ्यांच्या मानसिक आणि भावनिक समस्या जाणून समुपदेशन करण्यासाठी उपाययोजना करावी.
- शाळेमध्ये सकारात्मक आणि प्रेरणादायी वातावरण निर्माण करावे.

### ३) कायदेशीर जबाबदाऱ्या :

- बालकांचे लैंगिक अपराध संरक्षण (POCSO) कायदा आणि बालहक्क कायद्यांची अंमलबजावणी करावी.
- विद्यार्थ्यांवरील कोणत्याही प्रकारच्या शारीरिक शिक्षेवर कठोर बंदी घालावी.
- बालसुरक्षेच्या तक्रारींच्या निवारणासाठी बाल सुरक्षा समिती (Child Protection Committe) स्थापन करून योग्य ती कार्यवाही करावी.

### ४) पालक आणि समाजाशी समन्वय :

- पालकांना त्यांच्या पाल्यांच्या सुरक्षिततेबाबत सतर्क आणि जागरूक करावे.
- स्थानिक पोलीस, प्रशासन आणि समाजसेवी संस्थांसोबत समन्वय ठेवावा. बालकांमध्ये आत्मनिर्भरता आणि सुरक्षिततेबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी विशेष कार्यशाळा आयोजित कराव्यात.

### ५) ऑनलाइन आणि डिजिटल सुरक्षा :

- बालकांना सायबर गुन्हे आणि सोशल मीडियाचा सुरक्षित वापर याबाबत मार्गदर्शन करावे.
- शाळेतील संगणक व इंटरनेटचा योग्य आणि संरक्षित वापर सुनिश्चित करावा.

## अनुचित प्रकार लक्षात आल्यास/जर बालकाचे लैंगिक शोषण झाल्याचा संशय आला किंवा तसे प्रकरण समोर आले, तर

### १) विद्यार्थ्यांचे संरक्षण आणि विश्वास जपणे :

- पीडित बालक सुरक्षित आहे याची खात्री करावी.
- पीडित बालकास समजून घेऊन त्याच्या भावना ऐकाव्यात व प्रश्नांचा भडीमार न करता आवश्यक तेवढीच माहिती घ्यावी.
- त्याला मानसिक आधार देऊन, त्याच्या सुरक्षेची हमी द्यावी.

### २) शाळेतील बालसुरक्षा समितीला (Child Protection Committe) कळवणे :

- शाळेतील बालसुरक्षा समितीला त्वरित माहिती द्यावी.
- समितीच्या मदतीने दिलेल्या प्रमाणित कार्यपद्धती (Standard Opeating Procedure-SOP) नुसार पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू करावी.

### ३) तातडीने कायदेशीर पावले उचलणे :

- POCSO (Protection of Children from Sexual Offences) कायद्याच्या अंतर्गत तक्रार नोंदवणे बंधनकारक आहे.
- स्थानिक पोलीस स्टेशन किंवा बालसुरक्षा समिती (Child Protection Committee) कडे अधिकृत तक्रार दाखल करावी.
- पालकांना तात्काळ माहिती द्यावी आणि त्यांना मानसिक आधार द्यावा.
- काळजी व संरक्षणाची गरज असणाऱ्या बालकास जिल्हास्तरावरील बाल कल्याण समिती समोर हजर करावे.

### ४) घटनेची गोपनीयता राखणे :

- विद्यार्थ्यांची ओळख गुप्त ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

- सोशल मीडिया किंवा इतर माध्यमांमध्ये माहिती लीक होणार नाही याची काळजी घ्यावी.

### ५) मानसोपचार आणि समुपदेशन उपलब्ध करून देणे :

- विद्यार्थ्याला तातडीने समुपदेशक किंवा मानसोपचारतज्ज्ञांची मदत मिळेल याची व्यवस्था करावी.
- त्याच्या मानसिक आणि भावनिक पुनर्वसनासाठी प्रयत्न करावे.

### ६) शाळेतील इतर मुलांचे संरक्षण आणि जनजागृती :

- अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून शाळेतील बालसुरक्षा धोरणाचे पुनरावलोकन करावे.
- शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांसाठी बालसुरक्षा आणि POCSO कायद्याबाबत जागरूकता शिबिरे आयोजित करावीत.
- शाळेत तक्रार पेटी (Child Complaint Box) ठेवून त्यामधील तक्रारींची दखल घेऊन तक्रारींचे निवारण करावे.

### ७) संशयिताविरोधात कायदेशीर कारवाई :

- संशयित व्यक्तीविरोधात योग्य ती कायदेशीर कारवाई सुरू करावी.
- शाळेतील कोणत्याही कर्मचाऱ्याने किंवा शिक्षकाने अशा प्रकरणात दुर्लक्ष केल्यास, त्यांच्यावर कठोर शिस्तभंगविषयक कारवाई करावी.

## मुलींचे संरक्षण व स्वसंरक्षण संदर्भाने मुख्याध्यापकांची भूमिका काय?

शाळेतील मुलींच्या स्वसंरक्षणासाठी मुख्याध्यापकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. मुख्याध्यापकांनी मुलींच्या शारीरिक, मानसिक आणि भावनिक सुरक्षिततेसाठी प्रभावी उपाययोजना केल्या पाहिजेत. त्यासाठी त्यांना पुढील जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतील:

### १) सुरक्षित आणि भेदभावमुक्त वातावरण निर्माण करणे :

- शाळेतील परिसर सुरक्षित आणि मुलींसाठी अनुकूल ठेवावा.
- शाळेत लैंगिक छळाविरुद्ध (Anti-Sexual Harassment) कठोर नियम लागू करावे.
- शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी यांच्यासाठी लैंगिक संवेदनशीलता (Gender Sensitization) आणि सुरक्षितता प्रशिक्षण घ्यावे.

### २) स्वसंरक्षण प्रशिक्षण (Self Defence Training) :

- मुलींसाठी कराटे, तायक्वांदो किंवा अन्य स्वसंरक्षण विषयक प्रशिक्षणाचे आयोजन करावे.
- पोलिसांच्या 'निर्भया पथक' किंवा महिला सुरक्षा कक्षाशी समन्वय साधून स्वसंरक्षण

कार्यशाळा घ्यावी.

### ३) कायद्यांची माहिती आणि जनजागृती :

- मुलींना POCSO (Protection of Children from Sexual Offences), महिलांचे हक्क आणि कायदे यांची माहिती द्यावी.
- सुरक्षित स्पर्श–असुरक्षित स्पर्श याबाबत प्राथमिक वर्गांपासूनच जागरूकता निर्माण करावी. मुलींना संशयास्पद व्यक्ती किंवा परिस्थिती ओळखण्याचे प्रशिक्षण द्यावे.

### ४) तक्रार नोंदणी आणि समर्थन प्रणाली :

- गुप्त तक्रार पेटी (Complaint Box) किंवा महिला तक्रार कक्ष स्थापन करावा.
- शाळेत बालसुरक्षा समिती (Child Protection Committee) सक्रिय ठेवावी.
- मुलींना मानसिक आधार मिळावा यासाठी समुपदेशक (Counsellor) उपलब्ध करून द्यावे.

### ५) ऑनलाइन आणि डिजिटल सुरक्षितता :

- मुलींना सायबर सुरक्षेची माहिती द्यावी, सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर कसा करावा यावर मार्गदर्शन करावे.
- सायबर छळ (Cyber bullying) टाळण्यासाठी आवश्यक खबरदारी आणि कायदेशीर उपाय शिकवावे.
- शाळेतील संगणक आणि इंटरनेट वापरावर सनियंत्रण ठेवावे.

### ६) सुरक्षित वाहतूक आणि सोयीसुविधा :

- शाळेच्या बस, वाहन सेवा आणि परिसरात CCTV कॅमेरे बसवणे आणि जास्तीत जास्त महिला कर्मचारी तैनात करावे.
- शाळेच्या बसमध्ये महिला अटेंडंट अनिवार्य करावे.
- मुलींच्या स्वच्छतागृहांची स्वच्छता आणि सुरक्षितता सुनिश्चित करावी.

### ७) पालक आणि समाजाचा सहभाग वाढवणे :

- मुलींच्या पालकांसाठी स्वसंरक्षण आणि बालसुरक्षा विषयक कार्यशाळा आयोजित करावी.
- मुलींच्या सुरक्षिततेबाबत स्थानिक प्रशासन, पोलीस आणि समाजसेवी संस्थांशी समन्वय साधावा.

१) शाळेतील विद्यार्थ्यांवर होणाऱ्या अत्याचाराची तक्रार दाखल करण्याबाबत, पॉस्को इ बॉक्स

राष्ट्रीय बाल अधिकार संरक्षण आयोगाने तयार केलेल्या सुविधा, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने तयार केलेल्या 'चिराग' या ॲपची माहिती सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणण्यासाठी सूचना फलक लावावेत. 'पॉस्को इ बॉक्स' व 'चिराग' या ॲपवर तक्रारी नोंदविण्यासाठी विद्यार्थ्यांना आवश्यक ती मदत करावी. बालकांविरुद्ध होणाऱ्या लैंगिक अपराधाबाबत माहिती असणाऱ्या व्यक्तीने त्याबाबत तात्काळ विशेष किशोर पोलीस पथक अथवा स्थानिक पोलीस स्टेशनला कळविणे बंधनकारक आहे.

२) शाळांमध्ये विद्यार्थी/विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेबाबत करावयाच्या ठोस उपाययोजनांचा भाग म्हणून राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये तक्रार पेटी बसविण्याची व्यवस्था करावी.

३) शाळा व्यवस्थापनाने शाळेच्या आवारात/प्रवेशद्वारावर तसेच बाहेर जाण्याच्या दरवाज्याजवळ पुरेसे सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसवावेत.

४) शाळेच्या प्रवेशद्वाराजवळ तसेच बाहेर पडण्याच्या दरवाज्याजवळ पुरुष अथवा महिला सुरक्षा रक्षक नेमलेला असावा.

५) शाळेच्या परिसरामध्ये कोणतीही व्यक्ती अनधिकृतरित्या प्रवेश करणार नाही याची दक्षता घ्यावी.

६) विद्यार्थी शाळेच्या परिसरात उपस्थित असताना त्यांच्या सुरक्षिततेची संपूर्ण जबाबदारी

७) व्यवस्थापनाने शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांबरोबर बैठक आयोजित करून सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात.

८) शाळेतील मुलांच्या उपस्थिती संदर्भात सकाळी, दुपारी आणि शाळा सुटण्याच्या वेळेस संध्याकाळी हजेरी नोंदविण्यात यावी. अनुपस्थित विद्यार्थ्यांबाबत त्यांच्या पालकांना एस.एम.एस.द्वारे कळविण्यात यावे.

९) शाळा व्यवस्थापनाने शिक्षक, पालक, कर्मचारी व विद्यार्थी यांचा समावेश असलेली दक्षता समिती नेमून, संबंधित पालक समितीसोबत चर्चासत्र बैठकीचे आयोजन करावे.

१०) विद्यार्थी मानसिक दबावाला बळी पडू नये म्हणून व्यवस्थापनाने शाळेत समुपदेशनाची व्यवस्था करावी. तसेच शक्य असल्यास स्वतंत्र कक्ष स्थापन करावा.

११) खाजगी वाहनाने येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांना संबंधित वाहन चालकाच्या वर्तणुकीची पडताळणी करण्याबाबत व सुरक्षेच्या दृष्टीने त्यांची आवश्यक वैयक्तिक माहिती पालकांनी स्वतःकडे ठेवणेबाबत मार्गदर्शन, सनियंत्रण करावे.

१२) शाळेतील विद्यार्थ्यांच्या बसमध्ये कोणत्याही अनधिकृत व्यक्तीस बसण्याची अनुमती असू

नये. याबाबतच्या सूचना मुख्याध्यापकांनी/संबंधित व्यवस्थापकांनी सर्व बस चालकांना द्याव्यात.

१३) बस चालकांनी शालेय विद्यार्थ्यांस बसमधून त्यांच्या इच्छित (निवास स्थानाजवळच्या) ठिकाणीच सोडावे.


१४) बसमधून प्रवास करणाऱ्या शेवटच्या मुलीला इच्छित (निवास स्थानाजवळच्या) ठिकाणी सोडेपर्यंत बसमध्ये महिला सेविका/शिक्षिका असावी.

१५) शाळा व्यवस्थापनातर्फे शाळा सुटल्यानंतर शाळेतील वर्गामध्ये, प्रसाधनगृहामध्ये तसेच अन्य ठिकाणी/परिसरात कोणताही विद्यार्थी मागे राहिला नसल्याची खातरजमा करावी–

१६) शाळेतील मुलांची व मुलींची प्रसाधनगृहे स्वतंत्र व पुरेशा अंतरावर असावीत. शाळेतील शिक्षक व कर्मचारी यांच्याकरिता स्वतंत्र प्रसाधनगृहे असावीत.

१७) आकस्मित प्रकरणी मुलांचे पालक किंवा नातेवाईक शाळेत उपस्थित होईपर्यंत मुख्याध्यापकांनी शाळेतील मुलांचा ताबा शाळेतील शिक्षकांकडे सोपवावा.

१८) शाळा व्यवस्थापन/शिक्षक यांनी कोणत्याही विद्यार्थ्याचे पालकांच्या संमतीशिवाय, अधिकृत ओळखपत्र तपासल्याखेरीज (शासनाने मान्यता दिलेले कोणतेही ओळखपत्र उदा. पॅन कार्ड/आधारकार्ड, इ.) अन्य व्यक्तींकडे सोपवू नये.



१९) शाळेतील शिक्षक/कर्मचारी यांची नियुक्ती व्यवस्थापनातर्फे करताना संबंधितांची चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्रे संबंधित पोलीस विभागाकडून घेतलेली असावीत.

२०) शाळेतील वाहतूक सुरक्षा, गृहव्यवस्थापन तसेच उपाहारगृहासाठी नेमण्यात येणारा कर्मचारी वर्ग मान्यताप्राप्त संस्थेकडून नेमण्यात यावा. सदर कर्मचाऱ्यांचे देखील चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र पोलीस विभागाकडून घेतलेले असावे.

२१) पीडित बालकांच्या माहितीच्या सर्व नोंदी गोपनीय ठेवाव्यात. बालकांची वैयक्तिक माहिती त्रयस्थ व्यक्ती, संस्था यांच्याकडे पोहोचणार नाही याबाबत दक्षता घ्यावी.

२२) विद्यार्थ्यांसाठी शासकीय विमा सुरक्षा योजनांची अंमलबजावणी करावी.

उदा. राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजना.

(शासन निर्णय क्रमांक पीआरई – २०११/प्र. क्र. २४९/प्राशि.–१ दिनांक ११ जुलै, २०११

२३) विविध शासकीय योजनांची अंमलबजावणी करताना आवश्यक तेथे महिला शिक्षक/कर्मचारी यांची नियुक्ती करावी.

२४) दोषी व्यक्तींवर कार्यवाही करताना कोणत्याही प्रकारचा भेदभाव ठेवू नये.

## ९.३) पालक भूमिका :

बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ च्या कलम १० अन्वये प्रत्येक पालकाने आपल्या बालकास जवळील शाळेत दाखल करून प्राथमिक शिक्षण देण्याची जबाबदारी व कर्तव्ये नमूद केली आहेत. हे करीत असताना पालकाने आपल्या पाल्याची सुरक्षितता व त्याचे हक्क यांबाबत दक्ष असणे आवश्यक आहे.

१) पालकांनी स्वतःच्या इच्छा, आकांक्षा बालकांवर लादू नये. बालकांचे शारीरिक, मानसिक व भावनिक स्वास्थ्य हे योग्य प्रकारे राखले जाईल, या विषयावर पालक सभेमध्ये चर्चा घडवून आणावी. पालकांना बालकांचे स्वास्थ्य सुरक्षित राखण्यासंदर्भात मार्गदर्शन करावे.

२) पालकांनी बालकांच्या हक्कांबाबत बालकांसोबत योग्य तो सुसंवाद राखावा.

३) काही पालक सामाजिक सेवा, वैद्यकीय सेवा, स्वयंसेवी संस्था, पोलीस सेवा, इत्यादी क्षेत्रांमध्ये कार्यरत असतात. त्यांची व्याख्याने, चर्चासत्रे असे विविध उपक्रम आयोजित करावेत.

४) पालकांनी कुटुंबामध्ये लिंगभेद न करता, समता व समानतेने बालकांना वागणूक द्यावी.

५) प्रसार माध्यमे व ई–माध्यमाद्वारे ऑनलाइन, ऑफलाइन, गेम्स, मोबाइल गेम्स या सर्वांचा बालकांच्या शारीरिक, मानसिक आरोग्यावर परिणाम होतो. बालकांच्या वर्तणुकीसंबंधी निर्माण होणाऱ्या समस्यांबाबत पालकाने जागरूक रहावे.

६) कुटुंबातील वातावरण आरोग्यवर्धक राहण्यासाठी शिक्षक–पालक सभा, माता पालक संघ, यांमधून सुसंवाद साधावा. बालकांच्या मनातील प्रश्न, शंकांचे निरसन करीत बाल सुरक्षेच्या दृष्टीने कुटुंबातील वातावरण आरोग्यवर्धक (निकोप) राहील अशी भूमिका पार पाडावी.

## ९.४) शिक्षकेतर कर्मचारी भूमिका :

बालकांच्या सुरक्षेसंदर्भात शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शिक्षकेतर कर्मचारी म्हणून शाळेतील विविध कार्य पार पाडताना बालकाची सुरक्षितता राखणे हे त्यांचे प्रमुख कर्तव्य आहे.

१) शालेय परिसर, इमारत आणि शाळेतील विविध साधनांचा बालकांकडून वापर होत असताना बालकाला कोणत्याही प्रकारचा धोका, इजा होणार नाही याची काळजी घेणे.

२) आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ मदत करणे.

३) बालकाच्या वर्तनात किंवा कृतीत बदल दिसून आल्यास योग्य प्राधिकृत व्यक्ती/संस्था/शिक्षक यांना कल्पना देणे.

४) शिक्षक–बालक–पालक व प्रशासन यांच्यातील दुवा म्हणून माहितीची आदान–प्रदान करणे.

५) बालकांविषयी संवेदनशील असणे.

६) कोणत्याही प्रकारच्या दुराचारी किंवा अपप्रवृत्ती निदर्शनास आल्यास योग्य प्रधिकृत व्यक्तीला कळविणे.

७) पीडित बालकाच्या सर्व नोंदी गोपनीय ठेवणे. तसेच त्यांची माहिती त्रयस्थ संस्था, व्यक्ती यांच्याकडे पोहोचणार नाही याची दक्षता घेणे.

८) धोक्याची ठिकाणे व संभाव्य धोक्याचे प्रसंग ओळखण्यासाठी शाळेत घेतल्या जाणाऱ्या विविध उपक्रमात व प्रात्यक्षिकांत सहभागी होऊन आपली भूमिका पार पाडणे.

## ९.५) समुपदेशक :

बालकांच्या सुरक्षेसंबंधी समुपदेशकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे कारण ते बालकांच्या मानसिक आणि भावनिक स्वास्थ्याचे पालन करतात आणि त्यांना सुरक्षित वातावरणात वाढण्यासाठी मार्गदर्शन करतात. समुपदेशकांची मुख्य भूमिका खालीलप्रमाणे आहे :

### १) भावनिक समर्थन आणि समुपदेशन :

समुपदेशक बालकांना भावनिक समर्थन पुरवतात आणि त्यांच्या मानसिक स्थितीला समजून घेतात. शारीरिक, मानसिक, किंवा लैंगिक अत्याचाराच्या शिकार झालेल्या बालकांना समुपदेशन सत्रांद्वारे मानसिक आधार मिळवून देतात.

### २) सुरक्षेच्या उपायांची शिफारस :

समुपदेशक बालकांना सुरक्षेसाठी विविध उपाय शिकवतात, ज्यात अपायकारक परिस्थितीपासून वाचवण्यासाठी सुरक्षिततेचे तंत्र आणि आत्मसुरक्षेच्या कौशल्यांवर मार्गदर्शन केले जाते.

### ३) अत्याचार आणि शोषणाची ओळख :

समुपदेशक बालकांना अत्याचार, शोषण किंवा दुर्व्यवहाराची ओळख करून देतात, जेणेकरून ते या प्रकारच्या परिस्थितीपासून सावध राहू शकतात आणि त्यांना मदतीसाठी आवश्यक पाऊले उचलता येतात.

### ४) बालकाच्या हक्कांची माहिती :

समुपदेशक बालकांना त्यांच्या हक्कांबद्दल माहिती देतात, उदाहरणार्थ, शिक्षण घेण्याचा अधिकार, सुरक्षिततेचा अधिकार, आणि इतर मुलभूत हक्क. यामुळे त्यांना समाजातील इतर सदस्यांशी संवाद साधता येतो.

### ५) पालकांसाठी मार्गदर्शन :

समुपदेशक पालकांशी संवाद साधून त्यांना बालकांच्या सुरक्षिततेसाठी योग्य वातावरण तयार करण्यास मार्गदर्शन करतात. तसेच, बालकांच्या मानसिक स्वास्थ्याचा आढावा घेतात आणि पालकांना त्यांच्या मुलांच्या सुरक्षिततेसंबंधी जागरूक करतात.

### ६) धोक्यापासून बचाव करण्यासाठी जनजागृती :

समुपदेशक शाळांमध्ये, समुदायांमध्ये किंवा इतर संस्थांमध्ये बालकांच्या सुरक्षेसंबंधी जागरूकता वाढवण्यासाठी जनजागृती कार्यक्रम आयोजित करतात.

### ७) सार्वजनिक किंवा संस्थात्मक सहाय्य मिळवून देणे :

समुपदेशक बालकांना आपत्कालीन परिस्थितीत मदत करण्यासाठी समाजसेवी संस्थांसोबत समन्वय साधतात, जसे बालकल्याण समिती, तक्रार निवारण यंत्रणा, पोलिस यंत्रणा इ.

समुपदेशकांच्या मार्गदर्शनामुळे बालकांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो आणि ते सुरक्षिततेसंबंधी सजग होतात. यामुळे बालक आत्मसंरक्षण करत, मानसिक स्वास्थ्य राखत, सुरक्षित आणि आनंदी जीवन जगू शकतात.

## ९.६) पर्यवेक्षकीय यंत्रणा – भूमिका :

बालकाच्या सुरक्षिततेसंबंधी पर्यवेक्षकीय यंत्रणा (Supervisory Mechanism) म्हणजेच त्या संस्था आणि यंत्रणांच्या समवेत काम करणारी प्रणाली जी बालकांच्या संरक्षणासाठी जबाबदारी घेते. ही यंत्रणा बालकांच्या हक्कांचे संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी काम करते. बालकाच्या सुरक्षिततेसाठी पर्यवेक्षकीय यंत्रणांची प्रमुख जबाबदारी खालीलप्रमाणे आहे :

१) **बालकांच्या सुरक्षिततेची खात्री करणे :** बालकांच्या सुरक्षिततेच्या संदर्भात वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या शासननिर्णयाची अंमलबजावणी शाळा स्तरावर होते की नाही याची खात्री करून संबंधित सर्वांना माहिती देणे व आढावा घेणे.

२) शाळा व शाळा परिसरातील बालकांशी संपर्कात येणाऱ्या मानवी घटकांमुळे बालकांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत मार्गदर्शन करणे.

३) मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक या सर्वांमध्ये बालकांच्या सुरक्षिततेबाबत जाणीव–जागृती निर्माण होण्यासाठी विविध उपक्रमाचे आयोजन करणे.

४) बालकांना स्वसंरक्षण विषयक प्रशिक्षण दिले जाईल याची खात्री करणे.

५) शाळेत सुरक्षाविषयक धोरण राबविण्यात येत असल्याची खात्री करणे व संबंधित यंत्रणेला मार्गदर्शन करणे.

६) विद्यार्थ्यांमध्ये होणारे रॅगिंग, अत्याचार इ. प्रकार शाळा स्तरावर घडू नयेत याबाबत शाळेने केलेल्या उपाययोजनांचा नियमित आढावा घेणे व मार्गदर्शन करणे.

७) अत्याचारग्रस्त बालकाला वैद्यकीय, कायदेशीर मदत मिळवून देण्यासाठी तात्काळ हस्तक्षेप करणे.

८) अत्याचारग्रस्त बालकांचे पुनर्वसन होण्यासाठी नियमित पाठपुरावा करणे.

९) शाळा परिसरातील असणारे छोटे दुकानदार, खाऊ विक्रेते, फेरीवाले यांच्या चारित्र्य पडताळणीबाबत शाळा प्रशासनाला मार्गदर्शन करणे.

१०) बालकांच्या सुरक्षिततेसाठी शाळा, बालगृहे, अनाथालय, इतर संस्थांना नियमित भेटी देऊन बालकांच्या सुरक्षिततेबाबत सर्वंकष आढावा घेणे.

११) बालकांच्या सुरक्षिततेबाबत जन–जागृतीचे कार्यक्रम शाळास्तरावर नियमितपणे आयोजित केले जातील याबाबत पाठपुरावा करणे.

१२) बालकांच्या सुरक्षिततेच्या धोरणाबाबत शाळा व्यवस्थापन समितीमार्फत आवश्यक ती कार्यवाही/ उपाययोजना केल्या जातात की नाही याबाबत पर्यवेक्षीय यंत्रणेने जागरूक असावे.

### ९.७) अशासकीय सामाजिक संस्था (NGO) :

NGO व सामाजिक संस्थांनी पुढील माध्यमातून सर्व स्तरांवर – (पायाभूत, पूर्वतयारी, पूर्वमाध्यमिक, माध्यमिक स्तरांवर) बाल सुरक्षेसाठी शासन, शाळा, शिक्षक, पालक व विद्यार्थ्यास साहाय्य करणे अपेक्षित आहे.

## १) शिक्षण आणि जनजागृती :

**शिक्षण–प्रशिक्षण :** सर्व स्तरांवर शाळेतील शिक्षकांचे बाल हक्क व सुरक्षितता या विषयावर प्रशिक्षण घेण्यासाठी शाळा व शासनास साहाय्य करणे. यासाठी पुढील मुद्यांच्या आधारे प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यासाठी शाळा व शासनास मदत करणे.

- वयानुरूप गोष्टी, कथाकथन, कठपुतळी (Puppet) आणि परस्परसंवादी खेळांद्वारे वैयक्तिक सुरक्षिततेच्या मूलभूत संकल्पना समजावण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षित करणे.
- मुलांना सोपी आणि स्पष्ट भाषा वापरून सुरक्षित आणि असुरक्षित स्पर्श, खाजगी अवयव, मदतशील व्यक्ती, ओळखायला शिकवण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण देणे.
- सोप्या पद्धतीने विद्यार्थ्यापर्यंत वैयक्तिक सुरक्षेचे शिक्षण पोहचवण्यासाठी विद्यार्थी केंद्रित शैक्षणिक साहित्य तयार करण्यास शिक्षक व शाळेस मदत करणे.
- **जनजागृती :** बाल संरक्षणासाठी शालेय व सामाजिक स्तरावर पथनाट्याच्या माध्यमातून पालकांशी संवाद साधून जागृती करणे. बालकांचे हक्क, बालविवाह, बालमजुरी यांसारख्या समस्यांविषयी लोकांमध्ये जाणीव निर्माण करून बालकास असुरक्षित अनुभव आल्यास तो प्रसंग हाताळण्याच्या योग्य कृतीसाठी पालकांमध्ये जागृती करणे.

## २) बालशोषण रोखण्यासाठी मदत :

**शाळा पातळीवर साहाय्य :**

- विद्यार्थ्यांसाठी शाळेचे व वर्गातील वातावरण सुरक्षित करण्यासाठी शाळा पातळीवर बालसुरक्षा धोरण तयार करण्यास मदत करणे.
- शाळास्तरांवर नियमित भेटी देऊन शाळा व्यवस्थापनास बालसुरक्षा धोरणाची योग्य अंमलबजावणी करण्यासाठी साहाय्य करणे.
- **हेल्पलाइन आणि त्वरित मदत :** बालसुरक्षा हेल्पलाईन सेवा चालवणे, पालक व विद्यार्थ्यांपर्यंत या सेवा पोहचवण्यासाठी सहकार्य करणे. बालसुरक्षा समित्या तयार करण्यासाठी शाळांसोबत काम करणे.

## ३) बालकल्याण आणि पुनर्वसन :

- **आश्रयगृहे :** बेघर, अनाथ, किंवा शोषित बालकांसाठी सुरक्षित आश्रयगृह चालवणे, या मुलांना शिक्षण, आरोग्य सेवा आणि मानसिक आधार देणे.
- **समुपदेशन सेवा :** शोषण, हिंसा किंवा भावनिक त्रासातून गेलेल्या बालकांना मानसिक आधार व भावनिक स्थिरतेसाठी प्रशिक्षित समुपदेशक उपलब्ध करून देणे.

### ४) कायदेशीर साहाय्य :

- POCSO कायद्यासंदर्भात पालक–शिक्षक–विद्यार्थी यांच्यात जागृती करणे.
- बालकांचे लैंगिक शोषण प्रतिबंधक कायदा (POCSO) कार्यान्वित करण्यासाठी पोलीस व न्याय यंत्रणेसोबत काम करणे.
- बालकासोबत अनुचित घटना घडल्यास करावयाच्या कायदेशीर प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करणे.

### ५) बालमजुरी आणि बालविवाह रोखणे :

**बालमजुरी विरुद्ध मोहिम :**

- कामगार विभाग व पोलिसांसोबत समन्वय साधून बालमजुरी रोखणे.
- अशा बालकांसाठी शिक्षण व पुनर्वसन सुविधा उपलब्ध करून देणे.

**बालविवाहविरोधी उपाययोजना :**

- बालविवाह प्रतिबंधक कायद्याच्या अंमलबजावणीसाठी काम करणे, प्रभावित बालकांना आश्रय, शिक्षण व आर्थिक मदतीची सोय करणे.

## बालसुरक्षा आणि प्रतिबंधात स्वयंसेवी संस्थांची भूमिका :

अशासकीय संस्था (एनजीओ) बालकांच्या विकासाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर बालकांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी आणि बालकांचे शोषण रोखण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. मुलांचे वय आणि समज यावर आधारित त्यांचे सहकार्य व भूमिका बदलत असतात ते पुढील प्रमाणे –

### १) पायाभूत अवस्था (बालवाटिका १, २ व ३ ते इ. दुसरी)

- **जागरूकता आणि प्रारंभिक शिक्षण :** विद्यार्थी वयोगटानुरूप गोष्टी, कथाकथन, कठपुतळी (Pupeet) आणि परस्परसंवादी खेळांद्वांरे वैयक्तिक सुरक्षिततेच्या संदर्भात सुरक्षित–असुरक्षित स्पर्श, खाजगी अवयव, वैयक्तिक सुरक्षेचे नियम यांसारख्या मुलभूत संकल्पना विद्यार्थी, पालक व शिक्षकांपर्यंत पोहचवणे. तसेच, असुरक्षित प्रसंगी मदत करू शकणारी व्यक्ती कशी ओळखायची याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे.
- **सुरक्षित आणि असुरक्षित स्पर्श :** मुलांना सोपी आणि स्पष्ट भाषा वापरून सुरक्षित आणि असुरक्षित स्पर्श ओळखायला शिकवणे. त्यासाठी शालेय व सामाजिक स्तरावर पथनाट्य, पालकांशी संवाद यातून जनजागृती करणे.
- **सुरक्षित शाळा आणि खेळाची क्षेत्रे :** सुरक्षित शालेय वातावरणासाठी आणि नियमावली तयार करण्यासाठी शाळा व शासनास सहाय्य करणे. त्यासाठी नियमित शालेय स्तरावर भेटी देऊन सुरक्षा नियमावलीच्या अंमलबजावणीचे निरीक्षण करणे.

- अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्यासाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम राबवण्यासाठी साहाय्य करणे.

## २) पूर्वतयारी स्तर (इ. तिसरी ते इ. पाचवी)

- **शिक्षक-प्रशिक्षण :** सुरक्षित असुरक्षित स्पर्शाची ओळख, खाजगी अवयव, वैयक्तिक सुरक्षेचे नियम आणि ऑनलाइन सुरक्षा अशा विषयांवर विद्यार्थी, पालक व शिक्षक यांच्यासाठी आयोजित प्रशिक्षणामध्ये साहाय्य करणे.
- **नकार कौशल्य :** मुलांना असुरक्षित प्रसंगी 'नाही' असे म्हणायचे ते शिकवणे आणि असुरक्षित परिस्थितीबाबात तक्रार करण्यासाठी मदत करू शकणारी व्यक्ती (मदतशील व्यक्ती) कशी निवडायची या विषयी विविध उपक्रमांच्या माध्यमातून मार्गदर्शन करणे.

## ३) पूर्व-माध्यमिक स्तर (इ. सहावी ते इ. आठवी)

- **सर्वसमावेशक सुरक्षितता प्रशिक्षण :** गुंडगिरी, सायबर, सुरक्षा, समवयस्कांचा दबाव आणि सुरक्षित नाते यांसारख्या विषयांवर शिक्षक व पालक यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करणे.
- **कायदेशीर जागरूकता :** बालकांचे हक्क (POCSO) कायदा आणि उपलब्ध अहवाल यंत्रणा या विषयी शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांना शिक्षित करणे.
- **किशोरवयीन मानसिक आरोग्य साहाय्य :** चिंता, ताणाव आणि मानसिक आघात यासाठी समुपदेशन आणि मानसिक स्वास्थ्य, शारीरिक बदल, मासिक पाळी व्यवस्थापन याबाबत मार्गदर्शन करणे.
- **पीअर-स्पोर्ट नेटवर्क्स :** सुरक्षितेतच्या प्रश्नांवर खुल्या चर्चेसाठी गाव, शहर, शाळा पातळीवर पीअर-स्पोर्ट गट स्थापन करणे.
- **पालकांचा सहभाग :** किशोरवयीन सुरक्षा, इंटरनेटचा सुरक्षित वापर आणि मुक्त संवाद यांवर पालकांसाठी कार्यशाळा आयोजित करणे.

## ४) माध्यमिक स्तर (इ. नववी ते इ. बारावी)

- **ऑनलाइन नातेसंबध आणि सुरक्षितता :** शाळा महाविद्यालय स्तरावर किशोरवयीन विद्यार्थ्यांना सायबर गुन्हे, सोशल मीडियाचे धोके आणि सुरक्षित नातेसंबंधांबद्दल प्रशिक्षित करणे.

- **लैगिंक आणि पुनरुत्पादक आरोग्य जागरूकता :** किशोरवयीन आरोग्य, लैंगिक शिक्षण, लैंगिक संबंधातून संक्रमित होणारे रोग, शारीरिक व मानसिक आरोग्याची काळजी व त्यांचे संतुलन यावर मार्गदर्शन व संवाद साधणे.

## ९.८) पोलीस :

बालकांच्या सुरक्षिततेसंबंधी पोलिसांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. पोलिस विभाग विविध स्तरांवर बालकांच्या संरक्षणासाठी काम करत असतो. त्यांची प्रमुख भुमिका खालीलप्रमाणे आहे :

### १) बालकांच्या अधिकारांचे संरक्षण :

पोलिसांनी बालकांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण करणे आवश्यक आहे, ज्यात शिक्षण, सुरक्षिततेचा अधिकार आणि शारीरिक आणि मानसिक शोषणापासून संरक्षण यांचा समावेश आहे.

### २) बालकांवर होणारा अत्याचार थांबवणे :

बालकांवर होणाऱ्या शारीरिक, मानसिक किंवा लैंगिक अत्याचारांविरुद्ध कठोर कारवाई करावी.

### ३) बालकल्याण समितींचे सहयोग :

पोलीस बालकल्याण समितींसोबत काम करून बालकांच्या संरक्षणासाठी योग्य निर्णय घ्यावेत.

### ४) बाल तस्करी आणि बालमजुरी विरोधी कारवाई :

बाल तस्करी आणि बालमजुरी विरोधात कठोर कार्यवाही करून दोषींना कडक शिक्षा देण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया सुरू करावी.

### ५) शाळांमध्ये जनजागृती कार्यक्रम :

शाळांमध्ये बालकांसाठी सुरक्षिततेसंबंधी जनजागृती विषयक कार्यक्रम आयोजित करावेत. ज्यामुळे ते आपले हक्क आणि कार्ये ओळखू शकतात.

### ६) समुपदेशन आणि पुनर्वसन :

पीडित बालकांच्या समुपदेशन आणि पुनर्वसनासाठी मदत करावी.

## ९.९) दामिनी पथक :

'दामिनी पथक' हे महिलांच्या आणि बालकांच्या सुरक्षिततेसाठी स्थापन केलेले विशेष पोलीस पथक आहे. २०१२ मध्ये दिल्लीत निर्भया प्रकरणानंतर भारतातील विविध राज्यांमध्ये महिलांच्या व बालकांच्या सुरक्षिततेसाठी 'दामिनी पथक' सुरू करण्यात आले. हे पथक मुख्यतः शाळा, कॉलेज परिसर, सार्वजनिक ठिकाणे, वाहतूक व्यवस्था आणि संवेदनशील भागांमध्ये गस्त घालून सुरक्षितता सुनिश्चित करते.

## १) बालकांच्या सुरक्षिततेसाठी गस्त व देखरेख :

**शाळा व महाविद्यालयाच्या आसपास गस्त :**

- शाळा, महाविद्यालये आणि कोचिंग सेंटर परिसरात गैरवर्तन, छेडछाड किंवा शोषणाच्या घटना रोखण्यासाठी नियमित गस्त घालणे.
- बालकांना सुरक्षित वाटावे यासाठी त्यांची सतत निगराणी करणे.

**सार्वजनिक ठिकाणे सुरक्षित करणे :**

- बस स्थानके, रेल्वे स्थानके, उद्याने आणि गर्दीच्या ठिकाणी महिलांवर व बालकांवर होणारे गैरवर्तन थांबवणे.
- या ठिकाणी छेडछाड करणाऱ्या व संशयास्पद लोकांवर लक्ष ठेवून कारवाई करणे.

## २) तक्रारींचे त्वरित निराकरण :

**त्वरित कारवाई :**

- मुलींना किंवा बालकांना कोणतीही गैरसोय वाटल्यास त्यांची तक्रार त्वरित नोंदवून योग्य ती कारवाई करावी.
- गरज पडल्यास तक्रारी नोंदवण्यासाठी मदत करावी.

**आपत्कालीन मदत :**

- महिलांसाठी हेल्पलाइन किंवा स्थानिक पोलीस ठाण्यांशी संपर्क साधून तातडीने मदत पुरवावी.

## ३) बालकांवरील छेडछाड व शोषण थांबवणे :

**तपास व कारवाई :**

- शाळा, कॉलेज परिसरात व सार्वजनिक ठिकाणी अश्लील चाळे, छेडछाड किंवा गैरवर्तन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे.
- छेडछाड करणाऱ्यांवर तातडीने कायदेशीर कारवाई करणे.

**शोषण रोखणे :**

- बालकांवर होणारे शारीरिक व मानसिक हिंसाचार रोखण्यासाठी सतर्क राहणे.
- अशा प्रकरणांमध्ये बालकांना मानसिक आधार देणे व त्यांना न्याय मिळवून देणे.

## ४) जागृती अभियान :

**बालकांना शिक्षण :**

- 'चांगला स्पर्श आणि वाईट स्पर्श' याबाबत बालकांना माहिती देणे.

- संकटात असताना काय करावे व कोणाकडे मदत मागावी याबद्दल मार्गदर्शन करणे.

**जनजागृती मोहिमा :**

- शाळा व महाविद्यालयांमध्ये सुरक्षिततेच्या उपाययोजनांबाबत कार्यशाळा आयोजित करणे.
- महिलांच्या व बालकांच्या सुरक्षेसाठी हेल्पलाइन क्रमांक (जसे की १०९१ व १०९८) यांचा प्रचार.

### ५) पालक व शाळेसोबत समन्वय :

- शाळा प्रशासन, पालक आणि विद्यार्थ्यांशी संपर्क ठेवून सुरक्षिततेसाठी उपाययोजना आखणे.
- शाळा–कॉलेजमधील संभाव्य त्रासदायक घटकांविषयी सतर्क राहून त्यावर वेळेत कारवाई करणे.

### ६) मानसिक व कायदेशीर मदत :

- मुलींना व बालकांना भावनिक आधार देणे आणि कोणत्याही त्रासातून सावरण्यासाठी त्यांना प्रेरणा देणे.
- तक्रारी नोंदवण्यासाठी कायदेशीर सल्ला व मदत उपलब्ध करून देणे.

महिलांप्रमाणेच बालकांच्या सुरक्षिततेसाठी विशेष लक्ष देणे.

## ९.१०) संस्था संचालक मंडळ :

शाळा, महाविद्यालये, बालगृहे किंवा कोणत्याही संस्थांमध्ये बालकांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी संस्था संचालक मंडळाची महत्त्वाची जबाबदारी असते. संस्थेच्या धोरणात्मक, व्यवस्थापकीय आणि देखरेखीच्या भूमिकेतून ते बालकांसाठी सुरक्षित व अनुकूल वातावरण तयार करतात.

### १) सुरक्षिततेसाठी धोरण आखणे व अंमलबजावणी :

- सुरक्षित वातावरण तयार करण्यासाठी आवश्यक त्या सर्व सोयी–सुविधा उपलब्ध करून देणे.
- शाळा स्तरावरील विविध समित्या व विद्यार्थी–पालक यांच्यासोबत नियमित बैठका आयोजित करून शालेय वातावरण सुरक्षित व विश्वासार्ह राहील यासाठी संवाद सुस्थापित करणे.
- बालकांच्या सुरक्षाविषयक कार्यरत असणाऱ्या सर्व प्रकारच्या स्वयंसेवी संस्था, कायदेतज्ज्ञ, मानसोपचार तज्ज्ञ, वैद्यकीय आणि प्रसार माध्यमांविषयी विशेष अभ्यास असणाऱ्या व्यक्तींची मार्गदर्शन शिबिरे चर्चा सत्रे, व्याख्याने आयोजित करण्यासाठी पुढाकार घेणे.

- बालकांच्या सुरक्षाविषयक शासनाने वेळावेळी दिलेल्या निर्देशांचे संस्थेकडून पालन होईल याची दक्षता घेणे.
- शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करताना महिलांना प्राधान्य देणे.
- शाळांमध्ये स्वतंत्र मार्गदर्शन व समुपदेशन व्हावे याकरिता मानसशास्त्रीय समुपदेशकाची नियुक्ती करणे.
- विद्यार्थी व पालकांच्या तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन वेळीच उपाययोजना करणे.

## ९.११) जिल्हास्तरीय देखरेख :

कोणत्याही शाळेची तपासणी सक्षम प्राधिकारी/राष्ट्रीय किंवा राज्य बालहक्क संरक्षण आयोगाने अधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडून केली जावी. त्यांना आवश्यक वाटेल ती निरीक्षणे योग्य सक्षम प्राधिकारी (DEO/DM) यांना कळवावीत.

- तपासणी दरम्यान आढळलेल्या काही त्रुटी असतील तर, ते निर्धारित वेळेत दुरुस्त करण्याचे निर्देश सक्षम अधिकाऱ्यांनी व्यवस्थापनाला द्यावेत.
- जिल्हा दंडाधिकारी/जिल्हाधिकारी शाळांच्या नियतकालिक आणि नियमित तपासणीसाठी एक देखरेख समिती स्थापन करतील.
- जिल्हा दंडाधिकारी/जिल्हाधिकारी दर तीन महिन्यांनी देखरेख समिती आणि सक्षम अधिकाऱ्यांसह तपासणी अहवालांचा आढावा घेतील.
- तपासणी अहवालांमधून आढळलेल्या त्रुटी आणि कमतरता जिल्हा दंडाधिकारी योग्यरित्या विचारात घेतील आणि अशा अहवालांमधून उद्भवणाऱ्या सर्व त्रुटी दूर करतील.
- सर्व शाळांमध्ये या नियमावलीची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्याची जबाबदारी जिल्हा शिक्षणाधिकारी यांची असेल.

## ९.१२) राज्यस्तरीय देखरेख :

राज्य बालहक्क संरक्षण आयोग वेळोवेळी राज्य पातळीवर या नियमावली अंतर्गत विविध पैलूंच्या अंमलबजावणीचे निरीक्षण करतील.

## ९.१३) राष्ट्रीय स्तरावरील देखरेख :

राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोग वेळोवेळी या नियमावली अंतर्गत विविध पैलूंच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवतील.

❖❖❖

# १०. अनुचित घटना घडल्यानंतर अनुसरावयाची कार्यपद्धती व पुनर्वसन

## १०.१) अनुचित घटना घडल्यानंतर/समजल्यानंतर अनुसरावयाची कार्यपद्धती :

### बालकाने शोषणाबद्दल सांगितल्यानंतर काय करावे? :

बालशोषणाच्या घटना हाताळत असताना कोणत्या उपाययोजना कराव्यात हे समजून घेणे महत्त्वाचे आहे.

- मुलांच्या साहाय्यभूत यंत्रणा ओळखा.
- तुमच्या स्वत:च्या साहाय्यभूत यंत्रणा ओळखा.
- **भाषा :** बालकाला समजायला, अर्थ लावायला अत्यंत सोपी आणि सुलभ भाषा वापरणे आवश्यक आहे. त्यामुळे बालकाशी अत्यंत सहजपणे संवाद साधून त्याच्या भावना, समस्या जाणून घेतल्यास बालक योग्य प्रतिसाद देईल.
- **गोपनीयता :** बालकाने तुम्हांला जे काही सांगितले आहे त्याबाबतीत गोपनीयता ठेवा. फक्त विश्वासातील जी मोठी माणसे आहेत त्यांची मदत घेऊन बालकाला सुरक्षितता देणे आवश्यक आहे.

### बालकाला व्यक्त होण्याची संधी देणे :

सुरक्षित वातावरण निर्माण करा. जर बालकांच्या भावना अनावर होऊन त्याला रडू कोसळले, तर त्याला मुक्तपणे रडू द्या. त्याला रडणे थांबवायला, भावनांवर ताबा ठेवायला सांगू नका. अशा वेळी मुलाला थोडे पाणी प्यायला देऊन त्याच्यासोबत रहा. न बोलता त्याला विश्वास द्या. त्याला जेव्हा बोलावेसे वाटेल तेव्हा त्याच्याशी बोलायला, ऐकायला कोणीतरी उपलब्ध हवे. 'तुला हवा तेवढा वेळ घे', 'मी इथे तुझ्याबरोबर आहे'. घाबरू नकोस, तुझी काही चूक नाही असा धीर द्या. बालकाशी बोलताना खूप मोठ्या आवाजात बोलू नका. बालकावर वर्चस्व गाजविण्याच्या स्वरात बोलू नका. बालकाला आक्रमकपणे, त्याचा उपहास करणारे प्रश्न विचारू नका. त्याची चूक झाली आहे असे समजून बोलू नका.

- एखाद्या वेळेस जर मुलाने कोणताही आक्षेपार्ह किंवा अयोग्य मजकूर तुमच्या निदर्शनास आणून दिल्यास तो नष्ट करू नका. (डिलीट करू नका) तर तो पुरावा म्हणून जतन करून ठेवा.
- बालकाकडे काळजीपूर्वक लक्ष देऊन ते सुरक्षित असल्याची खात्री करा.

- जे घडले त्यात तुझा दोष नाही हे सांगा. खास करून लैंगिक शोषण झालेल्या बालकांच्या मनात अपराधीपणा, लज्जा अशा भावना प्रामुख्याने दिसून येतात. त्यांना आलेल्या शोषणाच्या अनुभवामध्ये ते स्वतःला दोषी ठरवितात. जे काही घडले त्यात त्यांचा काहीही दोष नाही हे मुलांच्या मनावर सातत्याने बिंबवणे अत्यंत गरजेचे आहे.

- **बालकाच्या भावना समजून घ्या :**

  बालक जे काही सांगते आहे त्यावर तुमचा विश्वास आहे. असा विश्वास बालकाच्या मनात निर्माण करा. त्यामुळे बालक मोकळेपणाने व्यक्त होईल. त्याच्या भावना समजून घ्यायला मदत होईल.

- **बालकाच्या बोलण्यातल्या महत्त्वाच्या मुद्‌द्यांचा पुनरुच्चार करणे :**

  बालकाने काय सांगितले आणि प्रतिसादकाने काय ऐकले याविषयी दोघांच्या मनात सुस्पष्टता येण्यासाठी महत्त्वाच्या मुद्‌द्यांचा पुनरुच्चार करा. उदाहरणार्थ, तू सांगितल्याप्रमाणे कुणीतरी तुला अशा पद्‌धतीने स्पर्श केला ज्यामुळे तुला खूप अस्वस्थ वाटले. या सगळ्या प्रसंगांना सामोरे जाताना तुला खूप त्रास झाला इ.

- **जर बालकाला बोलायला संकोच वाटत असेल तर**

  पुढील गोष्टी लक्षात ठेवणे गरजेचे आहे. जोपर्यंत बालक बोलण्यासाठी आपल्या मनाची तयारी करीत नाही तोपर्यंत थांबण्याची आणि ऐकण्याची तयारी हवी. बालकाच्या मनावर नव्याने काही आघात होईल अशा गोष्टी टाळा टाळाव्यात. तीव्र प्रतिक्रिया देऊ नयेत.

- **बालकावर दोषारोप करू नका :**

  मला हे आधी का नाही सांगितलेस? तिकडे काय करत होतास? हे का नाही थांबवलेस? तिकडून पळून का नाही गेलास? असे आक्षेप घेऊन बालकावर दोषारोप करू नये.

- **सांगण्यासाठी बालकावर दबाव टाकू नका :**

  मला याबाबत अजून सविस्तरपणे सांगशील का? त्याच्यानंतर काय झाले हे तू मला लगेच सांग, अशी बळजबरी करू नये. बालकाला हवा तेवढा वेळ देऊन हळुवारपणे माहिती काढून घ्यावी. कधी कधी बालकाच्या सध्याच्या स्थितीबाबत जास्तीत जास्त माहिती गोळा करणे गरजेचे असते. परंतु बालकावर प्रश्नांचा सातत्याने भडीमार केल्यास, जाब विचारण्यास उलट तपासणी घेण्याचा प्रयत्न केला, तर ते बालकाला भीतीदायक, प्रतिकूल वाटू शकते. यावेळी आपण वेगळ्या कार्यनीतीचा वापर करू शकतो. उदाहरणार्थ, मुलाला बोलण्यास वाव देणारे प्रश्न विचारणे, चित्रकला, बोलक्या बाहुल्यांचा खेळ, गोष्टी, शरीराची माहिती देणारे तक्ते या बाबी मदत करतील. समुपदेशकाने सत्राची बैठक व्यवस्था, बोलण्याची पद्‌धत आणि देहबोली अशा गोष्टींकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

- **मूल सांगत नसेल, परंतु तुम्हाला संशय असल्यास :**

    अनेकदा बालक त्याच्यावर झालेल्या शोषणाविषयी बोलायला तयार नसते. एक जागरूक व्यक्ती म्हणून त्याच्या वर्तनात शोषणाची काही लक्षणे आढळून येतात. अशा परिस्थितीत त्याच्यावर दबाव टाकणे. शोषण झाल्याचा निष्कर्ष काढून मोकळे होणे अशा गोष्टी टाळल्या पाहिजेत. बालकाच्या वर्तनाचे सातत्यपूर्ण निरीक्षण केल्यानंतर त्याचे शोषण झाल्याचा संशय येत असेल, पुढीलप्रमाणे कृती अपेक्षीत आहे.

    ➢ बालकाला मानसिक व भावनिक आधार द्या.

    ➢ मुलाला खुले प्रश्न विचारा. तू सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत काय करतोस? मी निरीक्षण केले आहे, की तू थोड्या चिंतेत आहेस. मी तुझी मदत करू शकेन. तुला कोणी त्रास देत आहे का हे तू इथे निश्चिंतपणे मला सांगू शकतोस इ.

- **विशिष्ट गोष्टींवर लक्ष केंद्रित करणारे प्रश्न :**

    मूल शांत झाल्यावर व त्याचा विश्वास संपादन केल्यानंतर, शोषणाची संपूर्ण घटना, त्यावेळी मनात आलेल्या भावना अशा विशिष्ट गोष्टींवर अधिक लक्ष केंद्रित करणारे प्रश्न विचारता येतील, जसे की – माझ्या मनात हाच विचार चालू आहे, की शोषणाच्या घटनेविषयी सांगताना तुला नेमके काय वाटत असेल? शोषणापासून स्वतःला वाचविण्यासाठी तू काय प्रयत्न केलेस?

    ➢ जर मूल नाही म्हणाले, तर त्याला आधार द्या. त्याला सांगा, की तुम्ही त्याच्या जवळपास आहात. तुला हवे तेव्हा सांग. लगेच पुढील चौकशी करू नका.

    ➢ मुलाच्या वयानुसार, परिसरानुसार चित्र, गोष्टी या उपक्रमांचा वापर करू शकता. जर बालकाने काही सांगितले तर त्याच्यावर विश्वास ठेवा.

**बालकाला सुरक्षित वाटत आहे, त्याची अस्वस्थता दूर झाली आहे याची खात्री करा. बाललैंगिक शोषणाच्या प्रकरणात शाळा प्रशासनांची भूमिका.**

१) बाललैंगिक शोषणाबाबत कोणतीही तक्रार कोणाकडूनही प्राप्त झाल्यास अथवा बाललैंगिक शोषणाचा प्रकार निदर्शनास आल्यास शाळेतील प्रत्येक घटकाने त्याची गांभीर्याने दखल घ्यावी.

२) मुख्याध्यापक, शिक्षक, संबंधित पालक, पीडित बालक बालसुरक्षेशी संबधीत विविध समित्यांचे सदस्य, प्रकरणाची चौकशी करून शहानिशा करतील.

३) मुख्याध्यापक नजिकच्या प्रशासकिय नियंत्रण अधिकाऱ्यास घडलेल्या प्रकाराबाबत तात्काळ लेखी कळवतील.

४) तात्काळ वैद्यकीय सुविधा व मानसशास्त्रीय समुपदेशन उपलब्ध करून देतील.

५) शालेय प्रशासन/मुख्याध्यापक स्थानिक पोलीस स्टेशनशी तात्काळ संपर्क साधतील. गरजेनुसार विविध हेल्पलाईनची मदत घेतील.

- संपर्क क्रमांक :	पोलीस : १००
  आपत्कालीन : ११२
- National Commission For Of Child Rights. (NCPCR) : 011 23236640/23236641
- Childline India Foundation : 022 23096842/23096843

६) POCSO कायद्याअंतर्गत तक्रार दाखल करतील.

**एनसीपीसीआर-पॉक्सो-ई-बॉक्स येथे मुलांवरील लैंगिक गुन्ह्यांच्या प्रकरणांबाबत तक्रार निवारण प्रणाली :** मुलांना मदत मिळविण्यात आणि अशा गुन्ह्यांची तक्रार थेट आयोगाकडे करण्यास मदत करण्यासाठी POCSO ई-बॉक्स हा NCPCR चा एक प्रमुख उपक्रम आहे.

**पोक्सो ई-बॉक्सद्वारे तक्रार दाखल करणे :** एनसीपीसीआर वेबसाइटच्या होम पेजवर हा पर्याय ठळकपणे समाविष्ट केला आहे, जिथे वापरकर्त्याला फक्त POCSO ई-बॉक्स नावाचे बटण दाबावे लागते. जे एका विंडोमध्ये एक लघु ॲनिमेशन चित्रपट असलेल्या पृष्ठावर नेव्हिगेट करेल ज्यामध्ये मुलांना/तक्रारदाराला सांगेल की ही त्यांची चूक नाही आणि त्यांना वाईट वाटण्याची गरज नाही. जेव्हा तुम्हाला असुरक्षित स्पर्श मिळतो तेव्हा तुम्ही त्या व्यक्तीवर तक्रार दाखल करू शकता.त्यासाठी NCPCR च्या अधिकृत वेबसाइट (pocsoebox-ncpcr@gov.in) वरील होमपेजवर जाऊन

- e-box हे बटण दाबा.
- त्यानंतर दिसणाऱ्या सूचीतून किमान एक तक्रार श्रेणी निवडावी लागेल आणि तक्रार अर्ज भरावा लागेल.
- तक्रार नोंदवण्यासाठी सबमिट बटणावर क्लिक करावे लागेल.

  सर्व तपशील www.ncpcr.gov.in या वेबसाइटवर उपलब्ध आहेत.

  संपर्कासाठी अधिकृत इ-मेल पत्ता : pocsoebox-neper@gov.in

  प्रमुख कायदे आणि नियमांव्यतिरिक्त, शाळेतील मुलांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन आणि वर्तन बदलासाठी काही पद्धती आणि उपाययोजना कराव्या लागतील तसेच शारीरिक शिक्षा प्रतिबंधासाठी NCPCR च्या मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करावे लागेल.

## १०.२) पुनर्वसन :

लैंगिक छळानंतर बालकाचे पुनर्वसन ही एक नाजूक महत्त्वपूर्ण व अत्यंत संवेदनशील प्रक्रिया आहे. ज्याचा उद्देश बालकास शारीरिक, मानसिक व भावनिकदृष्ट्या बरे होण्यास मदत करणे हा आहे. यासाठी खालील उपाययोजना करणे गरजेचे आहे.

### १) तात्काळ सुरक्षा व धीर देणे :

पिडीत बालकास शोषण करणाऱ्यापासून दूर ठेवून त्यास एक विश्वासार्ह आणि सुरक्षित वातावरण प्रदान करणे गरजेचे आहे. जेणेकरून बालक शारीरिकदृष्ट्या सुरक्षित व मानसिक दृष्ट्या स्थिर राहून त्याच्या मनातील भीती कमी होईल.

### २) वैद्यकीय मदत :

तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली योग्य ती वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्यात यावी.

### ३) व्यावसायिक समुपदेशन :

पिडीत बालकाचे मानसिक पुनर्वसन अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यासाठी मानसोपचार तज्ज्ञ किंवा बालचिकित्सक यांच्या माध्यमातून थेरपी देणे गरजेचे आहे.

### ४) कुटुंब नातेवाईक व समाज यांच्याकडून आधार :

पीडित बालकाच्या शारिरीक, मानसिक, भावनिक व सामाजिक पुनर्वसनासाठी कुटुंबातील सदस्य, नातेवाईक व समाजातील इतर घटकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे अशा परिस्थितीत या सर्वांनी बालकाशी अत्यंत समजूतदारपणे व संवेदनशीलपणे वागून बालकाला धीर दिला पाहिजे.

### ५) पीडित बालकांच्या सक्षमीकरणास चालना देणारे उपक्रम राबवणे :

बालकाचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी त्याच्या आवडीनुसार विविध खेळ व उपक्रमांचे आयोजन करावे. त्याला छंद जोपसण्यास मदत करावी, सामाजिक कार्यामध्ये सहभागी घेण्याची संधी देऊन सक्षमीकरणास चालना द्यावी.

### ६) पुनवर्सन केंद्रे व संस्थांची मदत :

पीडित बालकास पुनवर्सनासाठी मदत करण्याकरीता विविध सामाजिक संस्था, पुर्नवसन केंद्र समाजामध्ये कार्यरत आहेत. त्या संस्थांशी संपर्क साधून आवश्यक ती मदत उपलब्ध करून द्यावी.

### ७) मनोधैर्य योजनेचा लाभ उपलब्ध करून देणे :

बलात्कार/बालकावरील लैंगिक अत्याचार व ॲसिड हल्ला यामध्ये बळी पडलेल्या महिला व बालकांना अर्थसाहाय्य व पुनर्वसन करण्यासाठी कार्यान्वित असलेल्या व मनोधौर्य योजनेचा लाभ पीडित बालकास मिळवून देण्यास मदत करावी.

❖❖❖

# ११. परिशिष्टे

## ११.१ संदर्भ सूची


१) लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा (POCSO) - २०१२ माहितीपुस्तिका महाराष्ट्र राज्य महिला आयोग.

२) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ अन्वये विद्यार्थ्यांसाठी मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत – १५ फेब्रुवारी २०१६

३) शाळेतील विद्यार्थ्यांना ने–आण करणाऱ्या वाहतूक बसबाबत मार्गदर्शक सूचना.

शासन निर्णय क्र. संकीर्ण – २०१४/(१७२/१४) एस एम –६ दि. १८ मार्च २०१६.

४) राज्यातील सर्व माध्यमाच्या व सर्व व्यवस्थापनाच्या प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये तक्रारपेटी बसविण्याबाबत – ५ मे २०१७.

५) बलात्कार/बालकांवरील लैंगिक अत्याचार व ॲसिड हल्ला यामध्ये बळी पडलेल्या महिला व बालकांना अर्थसहाय्य व पुनर्वसन करण्यासाठी कार्यान्वित असलेल्या 'मनोधैर्य योजने'च्या अर्थसहाय्याच्या निकषात सुधारणा करण्याबाबत – दि. १ ऑगस्ट २०१७

६) विद्यार्थी सुरक्षा संदर्भात मार्गदर्शक सूचना.

शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१७/प्र.क्र. (१७१/१७) एस.डी.६ दि. ०२ जून २०१८.

७) इयत्ता पहिली ते बारावी पर्यंतच्या विशेष गरजा असणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या अध्ययन शैलीनुसार मूल्यांकनाबाबत व शैक्षणिक सवलतींसंदर्भात मार्गदर्शक सूचना, १६ ऑक्टोबर २०१८.

८) बाललैंगिक शोषणास प्रतिबंध अधिनियम, (POCSO act) कायद्याच्या अंमलबजावणीबाबत – २ डिसेंबर २०१९.

९) राज्यातील सर्व शाळांमधील विद्यार्थी/विद्यार्थिनींच्या सुरक्षाविषयक उपाययोजनांची काटेकोर अंमलबजावणी करणेबाबत – २१ ऑगस्ट २०२४.

# ११.२ शासन निर्णय/कायदे/अधिनियम

| अ. क्र. | शासन निर्णय/कायदे/अधिनियम | क्यूआर कोड |
|---|---|---|
| १) | अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम – १९५६ | |
| २) | बालविवाह प्रतिबंध कायदा – २००६ | |
| ३) | माहिती व तंत्रज्ञान कायदा – २००८ | |
| ४) | महाराष्ट्र मोटार वाहन – शालेय विद्यार्थी वाहतूक नियमावली – २०११ | |
| ५) | राज्यातील विद्यार्थ्यांसाठी अपघात विमा योजना (राजीव गांधी विद्यार्थी सुरक्षा योजनाऐवजी राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजना) राबविण्याबाबत – ११ जुलै २०११ | |
| ६) | बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण कायदा (POCSO) - २०१२ | |
| ७) | बालन्याय मुलांची काळजी व संरक्षण कायदा – २०१५ | |
| ८) | बालकामगार (प्रतिबंध व नियमन) सुधारित कायदा – २०१६ | |
| ९) | बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ अन्वये विद्यार्थ्यांसाठी मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत – १५ फेब्रुवारी २०१६ | |

| अ. क्र. | शासन निर्णय/कायदे/अधिनियम | क्यूआर कोड |
|---|---|---|
| १०) | पर्यटन धोरण २०१६ अंतर्गत शैक्षणिक सहलींचे आयोजन करण्याबाबत – २० मे २०१७ | |
| ११) | राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदनिर्मित – बालकांचे हक्क व सुरक्षितता मार्गदर्शिका – २०२० | |
| १२) | राज्यातील सर्व शाळांमध्ये मुलामुलींच्या सुरक्षिततेसाठी व निकोप व समतामूलक वातावरण निर्मितीसाठी विविध स्तरावर सखी 'सावित्रीसमिती' गठीत करणेबाबत दि.१० मार्च २०२२ | |
| १३) | राज्यातील सर्व शाळांमधील विद्यार्थी विद्यार्थिनींच्या सुरक्षाविषयक उपाययोजनांची काटेकोर अंमलबजावणी करणेबाबत दि. २१ ऑगस्ट | |
| १४) | शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळास्तरावरील विविध समित्यांचे एकत्रीकरण करणेबाबत दि.१६ एप्रिल २०२५ | |
| १५) | राज्यातील सर्व माध्यमांच्या व व्यवस्थापनांच्या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षा व सुरक्षिततेच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजनांसंदर्भात सर्वसमावेशक सूचना दि. १३ मे २०२५ | |

# ११.३ शाळा सुरक्षा पाहणी नमुना

**प्रपत्र – अ**

## शाळा सुरक्षा पाहणी – नमुना साधन

**शाळेबाबत प्राथमिक माहिती :**

शाळेचे नाव व पत्ता : ....................................................................................................

मुख्याध्यापकांचे नाव : ....................................................................................................

युडायस : | | | | | | | | | | | दिनांक :

फोन : ...................................... पाहणीचा कालावधी : ......................................

पाहणी समिती माहिती : ......................................

| नाव | पद | मोबाईल क्रमांक |
|---|---|---|
| १) | | |
| २) | | |
| ३) | | |
| ४) | | |

**पाहणी करणाऱ्यांसाठी सूचना :**

१) प्रत्येक मुद्द्याबाबत पाहणी करावी, उत्तर हो अथवा नाही या स्वरूपात नोंदवावे. उत्तराबाबत खात्री करूनच नोंद करण्यात यावी.

२) मुद्द्याचे उत्तर हो असो अथवा नाही असो, त्यापुढे आवश्यक त्या नोंदी जरूर लिहाव्यात. पुढे काय सुधारणा करता येईल त्याचा विचार व्हावा.

३) गरज वाटल्यास प्रत्येक विभागात शेवटी असलेल्या रिकाम्या जागेत स्वतःचे मुद्दे मांडावेत.

४) खोल्यांच्या सुरक्षा पाहणीसाठी देण्यात आलेल्या मुद्द्यांच्या आधारे शाळेतील प्रत्येक खोलीची स्वतंत्र पाहणी करावी. त्यात वर्ग खोल्यांव्यतिरिक्त इतर खोल्या, वाचनालय, प्रयोगशाळा, सामानाची खोली, इत्यादी सर्व खोल्यांचा समावेश असावा.

५) विभाग २ मधील मुद्द्यांची माहिती ही निवडक (कोणताही निकष न लावता निवडलेले) विद्यार्थी व शिक्षकांकडून मिळवावी. शिवाय पाहणी करणाऱ्या गटाने या नोंदी शाळेतील आंतरक्रियांचा आढावा घेऊन व स्वतःच्या निरीक्षणातून नोंदवाव्यात.

## विभाग – १

### शाळेची इमारत व सभोवतालचा परिसर सुरक्षित व संरक्षित आहे का?

| अ. क्र. | परीक्षणाचा मुद्दा | होय | नाही | सुधारणेसाठी आवश्यक बाबींची नोंद |
|---|---|---|---|---|
| १) | शाळेच्या दर्शनी भागात 'सुरक्षित शाळा प्रतिज्ञा' लावली आहे का? | | | |
| २) | शाळेच्या इमारतीला 'शाळेसाठी सुरक्षित इमारत' रहिवास योग्य असे सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रमाणपत्र आहे का? | | | |
| ३) | इमारतीचे छप्पर सुरक्षित आहे का? | | | |
| | इमारतीचे छप्पर गळते का? | | | |
| ४) | इमारतीचे प्रवेशद्वार/द्वारे<br>i) कुलूपबंद, कुंपणाने संरक्षित आहेत का? | | | |
| ५) | इमारतीच्या बाहेर जाण्याचा मार्ग<br>i) कुलूपबंद कुंपणाने संरक्षित आहे का?<br>ii) सुरक्षारक्षक तैनात आहे का? | | | |
| ६) | इमारतीसाठी आपत्कालीन दरवाजे आहेत का?<br>उत्तर होय असल्यास हे दरवाजे दाखविणारे निर्देश फलक आहेत का? | | | |
| ७) | व्हरांडे आणि मोकळ्या जागा<br>i) सुयोग्य स्थितीत आहेत का?<br>ii) भिंती सुस्थितीत आहेत का?<br>iii) पाण्याचे व्यवस्थापन केलेले आहे का?<br>iv) आपत्कालीन परिस्थितीत बाहेर पडण्यासाठी व्यवस्था आहे का?<br>v) इतर नमूद करा. | | | |
| ८) | शालेय आवाराला तार/बांधकाम केलेली कुंपणाची भिंत आहे का? | | | |

| अ. क्र. | परीक्षणाचा मुद्दा | होय | नाही | सुधारणेसाठी आवश्यक बाबींची नोंद |
|---|---|---|---|---|
| ९) | विद्युतीकरण | | | |
| | i) अखंड वीज व्यवस्था आहे का?<br>ii) विजेचे मीटर सुरक्षित आहे का?<br>(बंदिस्त, कुलूपबंद, जबाबदार व्यक्तीकडे चाव्या असणे)<br>iii) शाळेतील-खोल्यांमधील व बाहेरील विद्युतीकरण सुरक्षित आहे काय?<br>(योग्य स्वीच, ISO प्रमाणित, प्लग पॉईंट बंद, वीज जोडणी सुरक्षित, इत्यादी.) | | | |
| १०) | पाणी | | | |
| | i) पिण्याचे पाणी शुद्ध आहे का?<br>ii) पिण्याचे पाणी सर्वांना पुरेसे आहे का?<br>iii) स्वच्छतागृहांसाठी पुरेसे पाणी आहे का?<br>iv) पाणी साठविण्याची व्यवस्था सुरक्षित, स्वच्छ आहे का? | | | |
| ११) | स्वच्छतागृह | | | |
| | i) मुले व मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे आहेत का?<br>ii) स्वच्छतागृहे स्वच्छ आहेत का?<br>iii) सुरक्षित आहेत का?<br>(जसे : दारांना कड्या, खिडक्या पारदर्शक नसणे, घसरडे नसणे, इत्यादी.)<br>iv) पुरेसा प्रकाश व दिव्यांची सोय आहे का?<br>v) बांधकाम सुरक्षित आहे का?<br>(जसे : छप्पर न गळणारे, भिंतींना तडे नसणे, ओल नसणे, इत्यादी.<br>vi) मलमूत्र व पाणी यांचे योग्य निःसारण होते आहे का? | | | |
| १२) | वर्गखोल्या, शिक्षकांची खोली व इतर सर्व खोल्यांचे प्रत्येक मुद्द्यांसाठी स्वतंत्र परीक्षण करावे. | | | |
| | i) सुरक्षित जमीन-खड्डे-ओबडधोबड-उखडलेली-ओली इत्यादी. | | | |

| अ. क्र. | परीक्षणाचा मुद्दा | होय | नाही | सुधारणेसाठी आवश्यक बाबींची नोंद |
|---|---|---|---|---|
| | ii) नैसर्गिक तसेच विजेच्या साहाय्याने प्रकाश योजना योग्य आहे का?<br>iii) नैसर्गिक तसेच विजेच्या साहाय्याने खोली हवेशीर आहे का?<br>iv) अध्ययन–अध्यापनाला मदत करणारी सजावट व वातावरण आहे का?<br>जसे : तक्ते, इत्यादी.<br>v) खोली बाहेर पडण्याचे दरवाजे पुरेसे मोठे आहेत का?<br>vi) खिडक्यांना लोखंडी तावदाने आहेत का? त्या आतून बंद होतात का?<br>vii) खोलीतील फर्निचर सुरक्षित आहे का?<br>(जसे : गंजलेले नसणे, खिळे बाहेर आलेले नसणे, तुटलेले, कोणाच्या अंगावर पडेल असे नसावे, इत्यादी.)<br>viii) गळके छप्पर–ओल आलेल्या भिंती. | | | |
| १३) | स्वयंपाकघर आणि जेवणघर | | | |
| | i) स्वच्छ व आरोग्यपूर्ण आहे का?<br>ii) जेवण करण्याची सुयोग्य व्यवस्था आहे का?<br>iii) सर्व मुलांना कोणताही भेदभाव न करता जेवणघरात प्रवेश, भांडी वापरण्याची संधी आहे का?<br>iv) स्वयंपाक घर शाळेपासून योग्य अंतरावर आहे का?<br>v) अग्निरोधक बसविलेला आहे का? | | | |
| १४) | प्रयोगशाळा, जर असेल तर | | | |
| | i) सर्व रसायने – काचेची उपकरणे व इतर धोकादायक सामान, इत्यादी कुलूपबंद कपाटात आहेत का? | | | |
| १५) | सुरक्षित फर्निचर (खोली बाहेरील) सुरक्षा निकष | | | |
| | i) व्हरांड्यातील<br>ii) सर्वांनी वापरावयाच्या जागांतील<br>iii) इतर मोकळ्या जागेतील | | | |

| अ. क्र. | परीक्षणाचा मुद्दा | होय | नाही | सुधारणेसाठी आवश्यक बाबींची नोंद |
| --- | --- | --- | --- | --- |
| १६) | शाळा परिसर | | | |
| | i) शाळा परिसर सुरक्षित आहे का?<br>(जसे : नदी, ओढे, रासायनिक कारखाने, बॉयलर, इतर धोकादायक व्यवसाय, निसरडे रस्ते, उघडी गटारे, कचऱ्याची जागा, ओव्हरहेड मोठी वीज वाहक तार नसणे, इत्यादी.)<br>ii) शाळा परिसर सुरक्षित आहे का?<br>जसे : गजबजाट, वाहनांची कोंडी, समाज विघातक लोकांचा वावर, इत्यादी नसणे. | | | |
| १७) | शाळा परिसर आरोग्यपूर्ण आहे का?<br>i) डासांना प्रतिबंध करणारे उपाय<br>ii) स्वच्छता<br>iii) परिसरात वृक्षारोपण<br>iv) औषधी वनस्पती | | | |
| १८) | शाळेचे पटांगण | | | |
| | i) सुरक्षित आहे का?<br>जसे : काचा-दगड-गोटे-काटेरी झुडपे नसणे, इत्यादी.<br>ii) स्वच्छता आहे का?<br>iii) खेळाची उपकरणे सुरक्षित आहेत का?<br>जसे : गंजलेली - तुटकी-खिळे बाहेर आलेली नसणे.<br>iv) झाडेझुडपे खूप वाढलेली नसणे, विषारी कीटक, प्राणी इत्यादींना लपण्यासाठी जागा नसणे.<br>v) पटांगण आणि खेळाची साधने वापरण्याची समान संधी असणे. | | | |
| १९) | शाळा कुंपणाच्या आतील कोणतीही जागा ही सुरक्षित आहे का? (वरील पटांगणाच्या निकषांप्रमाणे) | | | |
| | i) जिन्याखालील जागा<br>ii) स्वच्छतागृहाशेजारील जागा<br>iii) पडीक जागा<br>iv) कचराकुंडीजवळील जागा | | | |

| अ. क्र. | परीक्षणाचा मुद्दा | होय | नाही | सुधारणेसाठी आवश्यक बाबींची नोंद |
|---|---|---|---|---|
| २०) | सर्व मुलांचा घरापासून शाळेपर्यंतचा प्रवास पुढील मुद्द्यांनुसार सुरक्षित आहे का? | | | |
| | i) नदी–नाला–ओढा ओलांडावा लागणे.<br>ii) बस–रेल्वे प्रवास<br>iii) रेल्वे–रुळ ओलांडणे<br>iv) खराब रस्ते, उघडी गटारे, खोल खड्डे<br>v) कचरा–अनारोग्यपूर्ण परिसर<br>vi) गर्दी व गजबजाटाच्या जागा<br>vii) निर्जनवस्ती– जंगल वाट<br>viii) इतर नमूद करा | | | |

## सुरक्षा व्यवस्था चोख आहे का?

| अ. क्र. | परीक्षणाचा मुद्दा | होय | नाही | सुधारणेसाठी आवश्यक बाबींची नोंद |
|---|---|---|---|---|
| १) | **आपत्कालीन परिस्थितीत बाहेर पडण्याच्या मार्गांची रचना व ते निर्देशित असणे.**<br>i) नियोजन आहे.<br>ii) सर्वांना नियोजन माहीत आहे.<br>iii) सराव करून पाहिला आहे. | | | |
| २) | **आपत्कालीन परिस्थितीत सर्वांना बाहेर पडण्यासाठीचे नियोजन**<br>i) नियोजन आहे.<br>ii) सर्वांना नियोजन माहीत आहे.<br>iii) सराव केलेला आहे. | | | |
| ३) | **आपत्कालीन परिस्थितीची सूचना देण्यासाठी घंटा व्यवस्था आहे का?**<br>i) नियोजन आहे. सुविधा उपलब्ध आहे.<br>ii) सर्वांना नियोजन माहीत आहे.<br>iii) सराव केलेला आहे. | | | |
| ४) | अग्निरोधक आहे व तो कसा वापरावा याची माहिती शाळेतील नेमून दिलेल्या मुलांना व शिक्षकांना आहे. | | | |

| अ. क्र. | परीक्षणाचा मुद्दा | होय | नाही | सुधारणेसाठी आवश्यक बाबींची नोंद |
|---|---|---|---|---|
| ५) | **प्रथमोपचार पेटी**<br>i) प्रथमोपचार पेटी आहे.<br>ii) पेटीत सर्व उपयुक्त औषधे - वापरायोग्य आहे.<br>iii) औषधे कशी वापरावी याची माहिती शाळेतील शिक्षकांना आहे. | | | |
| ६) | **प्रथमोपचार प्रशिक्षण झाले आहे का?**<br>i) शिक्षक<br>ii) इतर कर्मचाऱ्यांचे<br>iii) विद्यार्थ्यांचे | | | |
| ७) | **आपत्कालीन परिस्थिती हाताळण्याचे प्रशिक्षण झाले आहे का?**<br>i) शिक्षक<br>ii) इतर कर्मचाऱ्यांचे<br>iii) विद्यार्थ्यांचे | | | |
| ८) | प्रवेशद्वाराशी शाळेत येणारे-जाणारे कर्मचारी व विद्यार्थ्यांव्यतिरिक्त इतर सर्वांच्या येण्याची व जाण्याची नोंद केली जाते का? | | | |
| ९) | i) आपत्कालीन संपर्कासाठी लागणारे दूरध्वनी क्रमांक दर्शनी भागात लावले आहेत का?<br>ii) आपत्कालीन संपर्कासाठी लागणाऱ्या दूरध्वनी क्रमांकाची नोंदवही/फलक अद्ययावत आहे का? | | | |
| १०) | स्वयंसुरक्षेबाबत खालील मुद्द्यांसाठी मुलांचे प्रशिक्षण झाले आहे का? त्या संबंधीची माहिती आहे का?<br>i) आगीच्या वेळी स्वयंसुरक्षा<br>ii) भूकंप<br>iii) पूर<br>iv) बॉम्बस्फोट किंवा इतर स्फोट<br>v) रस्तासुरक्षा<br>vi) अन्नसुरक्षा<br>vii) सुरक्षित-असुरक्षित स्पर्श<br>viii) लैंगिक अत्याचार<br>ix) व्यसनाधीनता | | | |

| अ. क्र. | परीक्षणाचा मुद्दा | होय | नाही | सुधारणेसाठी आवश्यक बाबींची नोंद |
|---|---|---|---|---|
| | x) सायबर गुन्हा<br>xi) आपत्कालीन प्रसंगी. | | | |
| ११) | शाळा सुरक्षा समिती<br>i) शाळा सुरक्षा समितीची स्थापना झाली आहे का?<br>ii) समितीला आपली कर्तव्ये व जबाबदाऱ्या माहिती आहेत का? | | | |
| १२) | सूचना पेटी / संवाद पेटी<br>i) सूचनापेटी आहे का?<br>ii) विद्यार्थ्यांना सूचनापेटीसंबंधी माहिती आहे. विद्यार्थ्यांना सूचना देण्यास प्रोत्साहन दिले जाते.<br>iii) सूचनापेटीतील सूचना, तक्रारींची दखल घेऊन त्यावर कार्यवाही करण्यात येते. | | | |
| १३) | समुपदेशनाची सोय (किमान समुपदेशनासाठी संबंधितांना पाठविण्याची सोय) आहे व त्याबाबत पालक व शिक्षकांना माहिती आहे. | | | |
| १४) | शाळेतील सर्व मुलांना शाळेला लागणाऱ्या सर्व शालेय शैक्षणिक वस्तू उपलब्ध होण्याची सुविधा आहे.<br>i) विद्यार्थ्यांना गणवेश उपलब्ध आहे.<br>ii) सर्व मुलांकडे क्रमिक पुस्तके, वह्या, पेन-पेन्सिल, इत्यादी उपलब्ध आहेत.<br>iii) शालेय सहल, क्षेत्रभेटी, कृती उपक्रम, प्रयोग, प्रात्यक्षिक, इत्यादींमध्ये सर्व मुलांना सहभागी होण्याची संधी मिळते.<br>iv) शालेय स्पर्धा : क्रीडा, गायन, वादन, नृत्य, चित्रकला, आदी स्पर्धांमध्ये मुलांची निवड ही त्यांची योग्यता पाहूनच केली जाते.<br>v) सर्व मुलांना दर्जेदार मध्यान्ह भोजन मिळते. | | | |

### शालेय घटकांमधील परस्परांमधील समस्या सोडविण्यासाठी व्यवस्था केली आहे का?

- या प्रपत्रातील मुद्द्यांसाठी पुढीलप्रमाणे उत्तरे नमूद करावी :
  १) सकारात्मक परिस्थिती
  २) साधारण – थोड्याफार प्रमाणात योग्य परिस्थिती

३) वाईट, अयोग्य परिस्थिती

४) फार वाईट, धोकादायक परिस्थिती.

| अ. क्र. | परीक्षण मुद्दे | उत्तरे (१, २, ३, ४) | सुधारणेसाठी सूचना |
|---|---|---|---|
| १) | एकात्मता आणि सहकार्य याला प्रोत्साहन देणारे उपक्रम राबविले जातात. | | |
| २) | परस्परांचा आदर करणे. वेगवेगळ्या लोकांच्या चालीरीतींचा स्वीकार करणे, कोणताही भेदभाव न करणे ही मूल्ये रुजविण्यासाठी उपक्रम राबविले जातात. | | |
| ३) | परस्पर संवादासाठी उपक्रम राबविले जातात. | | |
| ४) | गटकार्य, उपक्रम, कृती याला प्रोत्साहन दिले जाते. | | |
| ५) | शाळेत तक्रार निवारण व्यवस्था आहे.<br>१) व्यवस्था आहे.<br>२) व्यवस्थेबाबत सर्वांना माहिती आहे.<br>३) व्यवस्थेवर सर्वांचा विश्वास आहे. | | |
| ६) | इतर नमूद करा. | | |

**परीक्षणादरम्यान आढळून आलेले आणखी काही मुद्दे आणि त्याबाबत सुधारणेसाठी सूचना :**

१)

२)

३)

४)

५)

## शाळा सुरक्षा नियोजन करण्यासाठी मार्गदर्शक सूचना

**शाळेचे नाव आणि पत्ता :**

**नियोजन दिनांक :** / /२०२ **नियोजन कालावधी :**

अ) प्राधान्याने करावयाच्या सुरक्षाव्यवस्था (भौतिक सोयी-सुविधा, परस्पर संबंध सुधारण्यासाठी, आपत्ती नियोजनासाठी घ्यावयास लागणारी प्रशिक्षणे, उपक्रम इ.) प्रत्येक घटकासाठी स्वतंत्र नियोजन करावे.

| मुद्दा तपशील | बदलासाठी करावयाची कार्यवाही | जबाबदारी (मुख्य आणि सहायक) | कार्यपूर्तीचा नियोजित कालावधी/दिनांक |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

आ) शाळा सुरक्षेसाठीच्या आवश्यक व्यवस्था (ज्यांचा विचार या नियोजनात करण्यात आलेला नाही व त्यासाठी करण्यात आलेली पर्यायी सुरक्षा व्यवस्था.)

| सुरक्षाविषयक मुद्दे (ज्यांचा या नियोजनात विचार करण्यात आलेला नाही.) | पर्यायी सुरक्षा व्यवस्था | जबाबदारी |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |

**सर्व सुरक्षा समिती सदस्यांची स्वाक्षरी**

**नाव** **पद** **स्वाक्षरी**

१)

२)

३)

४)

**शाळेचा शिक्का** **मुख्याध्यापक स्वाक्षरी**

**दिनांक :** / /२०२

# श्रेयनामावली

| अ.क्र. | तज्ज्ञ सदस्याचे नाव | पद | कार्यालय |
|---|---|---|---|
| १) | श्रीम. मनिषा पवार | उपसंचालक | प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई |
| २) | श्री. सागर तुपे | वरिष्ठ अधिव्याख्याता | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रायगड, पनवेल |
| ३) | श्री. सुभाष बुवा | अधिव्याख्याता | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, जि. सोलापूर |
| ४) | श्रीम. रेणुका जाधव | अधिव्याख्याता | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, जि. सांगली |
| ५) | श्री. अरविंद पवार | मुख्याध्यापक | मनपा मराठी माध्यमिक शाळा, वरळी |
| ६) | डॉ. दत्तात्रय घुगरे | मुख्याध्यापक | स्व. से. मा. ग. पा. आदर्श विद्या निकेतन व ज्युनियर कॉलेज, जि. कोल्हापूर |
| ७) | श्रीम. सोनाली राख | उपशिक्षक | जि. प. प्राथ. शाळा घाटाव, आदिवासीवाडी, ता. रोहा, जि. रायगड |
| ८) | श्री. रामराव पवार | उपशिक्षक | माध्यमिक विद्यामंदिर, सांताक्रुझ, मुंबई |
| ९) | श्री. विनोद राठोड | उपशिक्षक | जि. प. प्राथ. शाळा सालनापूर, जि. अमरावती |
| १०) | श्रीम. अनिता खडके | सहाय्यक शिक्षक | जि. प. प्राथ. शाळा भादा, ता. औसा, जि. लातूर |
| ११) | श्रीम. आम्रपाली देवेकर | जिल्हा समन्वयक | जि. कोल्हापूर |
| १२) | श्रीम. गीता मोरे | सहशिक्षक | विद्यामंदिर हिटणी, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर |
| १३) | श्री. गणेश सांगळे | पदवीधर शिक्षक | जि. प. प्राथ. शाळा कऱ्हे, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर |
| १४) | श्री. कृष्णा सूर्यवंशी | सहशिक्षक | जि. प. प्राथमिक शाळा नं. २, वाळवा, जि. सांगली |
| १५) | श्री. विठ्ठल रेणूकर | सहाय्यक शिक्षक | गो. म. वेदक विद्यामंदिर तळी, जि. रायगड |
| १६) | श्री. नितीन शेलार | शिक्षक | राष्ट्रवीर संघ, महाराष्ट्र |
| १७) | श्रीम. शकुंतला झगडे | लीडर ट्रेनर गाईड | पुणे भारत स्काऊट्स आणि गाईड्स जिल्हा कार्यालय, सदाशिव पेठ, पुणे ३० |
| १८) | श्री. दिलीप नेवसे | जिल्हा प्रशिक्षणायुक्त | पुणे भारत स्काऊट्स आणि गाईड्स जिल्हा कार्यालय, सदाशिव पेठ, पुणे ३० |
| १९) | श्री. दिलीप चौधरी | मास्तर ट्रेनर स्काऊट गाईड | जि. प. प्राथ. शाळा कोंबडवाडी, जि. धाराशिव |
| २०) | श्री. समीर शिरपूरकर | समुपदेशक | पुणे |
| २१) | श्री. हरिदास गोविंद | कराटे | राज्य कराटे संघटना प्रतिनिधी |
| २२) | डॉ. प्रसाद कुलकर्णी | तायक्वांदो | राज्य तायक्वांदो संघटना प्रतिनिधी |
| २३) | श्री. योगेश धाडवे | ज्युडो | राज्य ज्युडो संघटना प्रतिनिधी |
| २४) | श्रीम. शिवानी गुप्ता | बॉक्सिंग | राज्य बॉक्सिंग संघटना प्रतिनिधी |
| २५) | श्रीम. कोमल पठारे | तायक्वांदो | राज्य ज्युडो संघटना प्रतिनिधी |